म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय स्त्री. वा.
दा. क्र. २७९२

IRBK-0102792
IRBK-0102792

नागपूर प्रकाशन क्र.—२९

# गोल देऊळ

ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रं. क्र. ... .. .. नों. दि ...............
वि. ......... .... ... क्र. ...... ..........

—लेखक—

सत्यवान नामदेव सूर्यवंशी

ग्रंथ संग्रहालय, ठाणे
३०५९
अनुक्रम वा.क.
विभाग २८८
नों. दि. ५।७।७५

किंमत

IRBK-0102792

नागपूर प्रकाशन, सिताबर्डी, नागपूर

—प्रकाशक—

दि. मा. धुमाळ,

नागपूर प्रकाशन, सिताबर्डी, नागपूर.

मुखपृष्ठावरील चित्र श्री. दिनानाथराव दलाल ह्यांचें आहे.

प्रथमावृत्ती : १९४८

( ह्या आवृत्तीनंतरचे सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन )

—मुद्रक—

ल. म. पटले,

रामेश्वर प्रिंटिंग प्रेस, सिताबर्डी, नागपूर.

प्रिय भगिनी

अ न सू या

हीस

# प्रकाशित वाङ्मय

## कादंबऱ्या

| | | | |
|---|---|---|---|
| १ वीणा | ३ रु. | ९ प्रत्यय | २॥ |
| २ दोन घडीचा डाव | २॥ | १० पुन्हां एकदां ! | ३। |
| ३ शककर्ता शालिवाहन | २॥ | ११ माझी शीला | १। |
| ४ प्रमद्वरा | २॥ | १२ म्हणे लढाई संपली | १॥ |
| ५ द्राविडी प्राणायाम | २। | १३ सखी | २॥। |
| ६ अमावास्या | २॥ | १४ सावलीच्या उन्हांत | ३ |
| ७ कंगाल | २। | १५ जीवन प्रवाह | २॥ |
| ८ अडेल तट्टू | ३। | १६ गोल देऊळ. | ३ |

## कथासंग्रह

| | | | |
|---|---|---|---|
| १ लढवय्ये | ३ | ४ तेरी चूप मेरी चूप | २ |
| २ मृगाचा पाऊस | २ | ५ इंदिरा | २॥। |
| ३ लांब लांब सावल्या | २ | | |

## इतर वाङ्मय

| | | | |
|---|---|---|---|
| १ माझे कादंबरी लेखन | १॥ | ५ नवीं मूल्यें | ३। |
| २ परामर्श | ३ | ६ मार्क्सवादी अभ्यासक्रम | १॥ |
| ३ सन् १८५७ च्या स्वा. यु. स्व. | ॥ | ७ हंसदूत | २। |
| ४ दोन प्रख्यात युद्धतंत्रें | २ | ८ तिसरें राज्य | ॥= |

नागपूर प्रकाशन, सिताबर्डी, नागपूर.

# ओळीमागून ओळी

गोल देऊळ ही कादंबरी लिहतांना मुंबईच्या पायरस्त्यांवरील अनेक दीन चेहरे माझ्यासमोर सारखें येत होते. त्यांचीं मूक पण अनंत अर्थांनीं भरलेलीं भाषा माझ्या कर्णावर आदळून ह्या पानांतून आम्हांला बोलकें कर म्हणून मला आर्जवीत होतीं. मी लिहूं लागलों. ओळींमागून ओळीं उतरल्या. पानांमागून पानें झालीं. त्यांतून हें पुस्तक तयार झालें. पण त्या दीनवदन जीवांची कहाणी अजून संपली असें वाटत नाहीं. पुस्तकांमागून पुस्तकें लिहिलीं गेलीं पाहिजेत. लेखकांमागून लेखक पुढें सरसावले पाहिजेत....आणि तरी देखील कुणास माहीत ती संपेल की नाहीं. ...सांगून सांगून सांगणार तरी किती ?

सत्यवान नामदेव सूर्यवंशी

# अनुक्रमणिका


| प्रकरण | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | ही कोण पोरगी ? ... ... ... | ७ |
| २ | " मला डोंगरीच्या तुरुंगांत नेणार ! " ... ... | १४ |
| ३ | सुंद्रीची करुण कहाणी ! ... ... ... | २१ |
| ४ | बिचारी बारकूची आई ! ... ... ... | २७ |
| ५ | सुंद्रीची पाठ नीट होणार ? ... ... ... | ३२ |
| ६ | " भीमजी हाडवैद–जुना अने जाणिता ! " ... | ३९ |
| ७ | पाठ तर नीट झाली ! ... ... ... | ४५ |
| ८ | बाबा पंखेवाला काम देणार ? ... ... | ५२ |
| ९ | जादु म्हणजे हात चलाखी...पण ! ... ... | ५८ |
| १० | बारकूच्या हातावर खूष ! ... ... ... | ६४ |
| ११ | सुंद्रीचं नवीन परकर-पोलकं ... ... ... | ६८ |
| १२ | नवीनच संकट ! ... ... ... | ७५ |
| १३ | कुठं आहे बारकू ? ... ... ... | ८१ |
| १४ | दादा मॅन्शन ... ... .. | ८६ |
| १५ | सिने–सुंदरी उषाराणी ! ... ... ... | ९१ |
| १६ | बारकूचें काय झालें ? ... ... ... | ९७ |
| १७ | सुंद्रीची " बेबी सौंदर्यप्रभा " झाली ! ... ... | १०१ |
| १८ | " आज आहे संधी तुला ! " ... ... | १०६ |
| १९ | सुंद्री कुठंय पण... ! ... ... ... | १११ |
| २० | उषाराणीच्या शोधार्थ– ... ... ... | ११६ |
| २१ | सुंद्रीची पुनर्भेट ... ... ... | १२१ |
| २२ | निराळी दुनिया ... ... ... | १२७ |
| २३ | " जिथं बारकू तिथं सुंद्री ! " ... ... ... | १३२ |

# प्रकरण १ लें

# ही कोण पोरगी ?

गोल देवळाच्या पायरीवर बसून खिशांतला खुर्दा त्यानें बाहेर काढला घामानें डबडबून गेलेलें तोंड कोटाच्या लांब बाहीनें पुसून काढलें. खुर्दा मोजून पाहातांना त्याच्या मुखावर समाधानाच्या रेषा झळकल्या. बारा वाजायला आले होते. पहाटेस उठून तो त्या दिवसाचे 'पेपर' आणायला गेला तेव्हांपासून त्यानें चहा सुद्धां घेतला नव्हता.

'अल् हिलाल', 'इन्किलाब', 'वतन' वगैरे उर्दू पत्रें भेंडीबाजार, पायधुणी वगैरे ठिकाणीं खपवून झालीं की मांडवी पोस्टासमोरच्या 'शाने इलाही' रेस्टॉरंटमध्यें चहा घ्यायचा नि मग गोल देवळावरून प्रार्थना समाजाकडे जाऊन तिकडे 'चित्रा', 'लोकमान्य', 'नवशक्ती' वगैरे पत्रें विकायची. हे 'पेपर' एक वाजेपर्यंत खपले की परत मागें फिरून गोल देवळाकडे यायचें नि जवळच्याच कुंभारवाड्याच्या गल्लींत शिरून तिथल्याच एका बोळांत 'पेटंट रेस्टॉरंट' म्हणून एक हॉटेल होतें त्यांत दुपारचें जेवण उरकून घ्यायचें. मग सुमारें चारपर्यंत मन मानेल तसें फिरायचें आणि चारला संध्याकाळचे 'इव्हिनिंग न्यूज', 'मुस्लिम टाईम्स', 'संध्याकाळ' वगैरे पत्रं खरेदी करून आणायला बाहेर पडायचें; हा त्याचा नेहमींचाच कार्यक्रम होता.

पोरगा दिसायला भारी चुणचुणीत दिसे. अंगांतले सर्व कपडे जुन्याबाजारांतून आणलेले असावेत हें त्यांच्या फाजील लांबी रुंदीवरूनच स्पष्ट होत असलें तरी त्या ओबडधोबड कपड्यांत देखील तो बरा दिसे. डोक्यावरचे केस कितीही वाढलेले असले तरी त्यांचा तांबूसपणा त्याच्या सरळ नाकाला नि गुबगुबीत गालांना छान शोभून दिसत. नळबाजार, गोल देऊळ ते थेट प्रार्थना समाजापर्यंत

किती तरी लोक रोजचीं वर्तमानपत्रें त्याच्याच जवळून खरेदी करीत. कधीं त्याला यायला उशीर झाला तर त्याची वाट देखील पाहात.

आपल्या गिऱ्हाईकांवर त्यानें चांगलीच छाप पाडून ठेवली होती. रोजच्या बातम्या ओरडून सांगण्यांत त्याच्या इतका पटाईत मुलगा त्या टापूंत नव्हताच म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. हिंदु मोहोल्ल्यांत ओरडतांना हिंदु गिऱ्हाइकें खूष होतील अशा आरोळ्या तो मारी तर मुसलमानाच्या भागांत त्यांना 'प्याऱ्या' वाटणाऱ्या गर्जना तो कंठ फोडून ओरडे. गिऱ्हाइकांची अचूक नाडी परीक्षा करण्याचें त्याचें कसब खरोखर प्रसंशनीय होतें. हिंदु मुसलमानांचा दंगा चालूं असतांना हिंदुंच्या वस्तींत "मुसंड्यांच्या राक्षसी लीला! कोंवळ्या मुलाच्या पोटांत खंजीर खुपसला!!" अशा वर्तमानपत्रांत न छापलेल्या बातम्या देखील ओरडून सांगून तो हां हां म्हणतां गिऱ्हाइकांच्या झुंडी आकर्षून घेई, तर लगेच मुसलमानांच्या मोहल्ल्यांत शिरून "बनियांची तिसरी शेंडी कापून काढली!" असें कांहीं लल-कारून उर्दू पत्रांचा भारा संपवून टाकी. विभाग हिंदुंचा असो की मुसलमानांचा असो, दोन्ही जागीं तो बेडरपणें हिंडे. हिंदुंना तो हिंदुसारखा दिसे तर मुसलमानांना तो 'पाक अवलाद' वाटे. त्याला स्वतःला मात्र तो खरा कोण याची माहिती नव्हती. कुंभारवाड्यांत एका भिकार चाळीच्या जिन्याखालीं रात्रभर झोपायचें, सकाळीं उठून सकाळचीं पत्रं खपवायचीं, दुपारी खाना खाऊन मनास येईल तसें भटकत फिरायचें नि संध्याकाळीं सायंकाळचीं प्रसिद्ध होणारीं पत्रं विकून पुन्हां कुठें तरी भटकायचें. कुठल्याही स्वस्त हॉटेलांत रात्रीचें जेवण जेवायचें नि थकवा आला म्हणजे त्या जिन्याखालीं येऊन पडायचें हा त्याचा दैनंदिन जीवनक्रमच होऊन बसला होता. खिशांतला खुर्दा मोजून झाल्यावर त्यानें तो पुन्हां खिशांत ठेवून दिला आणि देवळाच्या पायरीवरून उठून कुंभारवाड्याच्या दिशेनें चालूं लागला. 'पेटंट रेस्टॉरंट'ला तो येऊन पोंचला तेव्हां कांटा बाराच्या पुढें ढळत होता. गल्ल्यावर बसलेल्या लालभडक इराण्याकडे हसत हसत पाहून त्यानें डोळे मिचकावले आणि तो आंत शिरला. एका कोपऱ्यांतील दगडी टेबलाशीं रिकामी खुर्ची होती त्यावर तो ऐटीनें बसला आणि जवळच उभ्या असलेल्या पोऱ्याला 'फडका मारण्याची

खूण करून त्यानें एक आधा बैंगणगोश आणि फर्माशची दणदणीत ऑर्डर सोडली. भिंतीवरील आरश्यांत आपलीं निरनिराळ्या कोणांतील प्रतिबिंबें बघण्यांत जरा वेळ स्वारी त्यानंतर गुंग झालेली दिसली.

" काय बारक्या, आज लौकर ? "

' फडका ' मारतां मारतां पोऱ्यानें विचारलें.

बारकू नुसता हसला. तेवढ्यांत बैंगण गोश-फर्माश येऊन थडकलीं. जेवत असतांना त्यानें इकडे तिकडे पाहिलें नाहीं त्यावरून त्याला बरीच भूक लागलेली असावी असें वाटलें. जेवल्यानंतर बिलाचे पैसे गल्ल्यावर चुकते करून शीळ वाजवीत वाजवीत तो बाहेर पडला. आतां तीन साडेतीन पर्यंत तो जिवाचा राजा होता.

गोल देवळाजवळ तो पुन्हां आला आणि आपल्या व्यवसायांतील एखादें ओळखीचें पोर दिसतें का तें पाहूं लागला. कोणी दिसलें नाहीं. त्यानंतर उरलेला वेळ मजेंत जाण्यासारखें मनोरंजनाचे एखादें साधन आढळतें का तें तो पाहूं लागला. नळबाजाराच्या दिशेला एक लठ्ठ मारवाडी केळीच्या सालीवरून घसरून फूटपाथवर कोसळलेला त्याला दिसला. त्याची कळी खुलली. मौज वाटून त्यानें टाळ्या वाजवल्या व तोंडांत बोटें घालून शीळ देखील घातली. पण त्यानंतर गडबडीनें उठून तो मारवाडी गर्दींत दिसेनासा झाला.

पुन्हां कांहीं गंमतीचे आढळतें कां हें तो शोधूं लागला ट्रॅमच्या थाब्यावर एका ' जंटलमेन ' बरोबर ट्राम इन्स्पेक्टर बिगर तिकिटानें प्रवास का केला म्हणून हुज्जत घालीत होता. टुणदिशी उडी मारून तो तिकडे धावला. पण तेथें जाऊन पोंचायच्या आंतच त्यांचा समझौता झालेला दिसला. तिथेंही त्याची निराशा झाली. पण लगेच आणखी एक प्रकार त्याचा अगदीं जवळ घडला. एका गुटगुटित कोळणीला समोरून येतांना पाहून एका मियाभाईनें तिला डोळा घातला. तशी ती बिजली सारखी कडाडून त्यावर शिव्यांची लाखोली वहात धावली. मियाभाईनें पळ काढला आणि कोळीण देखील एखाद्या मालगाडीच्या एंजिनाप्रमाणें धुसफुसत निघून गेली.

ऊन बरेंच चढूं लागलें पण बारक्याला त्याचें काय ? त्याचें फिरणें कांहा संपणारें नव्हतें. सुट्टी असली की अगदीं मनमुराद भटकायचें नाहीं तर काय करायचें ?

गोल देवळाचा नाका सोडून सात रस्त्याकडे जाणाऱ्या ट्रॅमच्या पिच्छाडीला एखाद्या माकडासारखा तो लटकून राहिला. पण ती ट्रॅम पुरती दोन टाकीपर्यंत देखील गेली नाही तर कंडक्टर 'तिकीट-तिकीट' करीत व हातांत चिमटा वाजवीत त्याच्या टोकाला येतांना दिसला. अर्थात दोन टाकीला उतरणेंच भाग होतें.

खालीं उतरल्यावर तो आजुबाजूला पाहूं लागला. जवळच एकें ठिकाणीं माणसांची गर्दी दिसली. काय आहे तें बघायला तो तिकडे वळला. तिथें दोन जादुवाले आपापसांत जादूची लढत लढत होते. आणि त्याच वेळीं त्यांतल्या एकाला प्रेक्षकांतील "हुश्शार" पोऱ्याची गरज होती. बारकूनें त्यासाठीं जरा वेळ स्वयंसेवक बनून काम केलें. ह्या साऱ्या गडबडींत दोन वाजले. सायंकाळचे 'पेपर' आणायला अजून तब्बल दीड तास तरी अवकाश होता तोंवर काय करायचें ? पण हा प्रश्न बारकूला कधींच पडत नसे. तेव्हढ्यांत त्यानें प्ले हाऊसच्या दिशेनें रेंगाळत जाणारी एक रिकामी व्हिक्टोरिया पाहिली. आजुबाजूला पाहून तो तिच्या पिच्छाडीला लटकला आणि सहा सात मिनिटांतच प्ले हाऊसच्या नाक्यावर उतरून इकडे तिकडे फिरूं लागला. त्या नाक्यावरच्या ताज टॉकीज, आल्फ्रेड टॉकीज वगैरे सिने थिएटरांच्या बाहेर लावलेली चित्रें पाहात तो जरा वेळ रेंगाळला आणि ती पाहून झाल्यावर ताडदेवच्या दिशेनें जी ट्रॅम जाते तिच्या पिच्छाडीला लटकून तो फोरास रोडच्या जंक्शनवर उतरला.

फोरास रोडच्या जंक्शनवर एक बरीच मोठी धर्मशाळा आहे. मुंबईतील वाचकांनीं ती कदाचित पाहिलीही असेल. बारकू कुठें तरी जायचें म्हणून ह्या धर्मशाळेपुढें येऊन उभा राहिला.

संध्याकाळच्या वेळीं ही सर्व धर्मशाळा भिकाऱ्यांनी कशी गजबजून गेलेली दिसते. त्यावेळीं मात्र तिथें शुकशुकाटच होता. कारण सारे मुंबईभर भिक्षा मागायला गेले होते.

# ही कोण पोरगी ?

३०६२७
११
२६८०
५।७१

सहज कुतूहल म्हणून बारकू त्या धर्मशाळेंत शिरला चिंध्या आणि कचऱ्यांचे ढीग इतस्ततः पडले होते दुसरें काय असणार तिथें ? त्या साऱ्याचें लांबून निरीक्षण करून झाल्यावर आतां कोणत्या दिशेनें जावें याचा विचार करीत, बाहेर जायला निघाला.

पण तितक्यांत त्याला कोणी तरी हांक मारली—

कोण होतें ?......

त्यानें आजुबाजूला न्याहाळून पाहिलें. चार दोन टीनाचे डबे अस्ताव्यस्त पडले होते आणि बाकी जागजागीं नुसते चिंध्यांचे ढीग. दुसरें कांहीं नव्हतें. मग ? हांक कुणी मारली ?

"तिथं काय बघतोस ? इकडं या कोपऱ्यांत आहे मी." पुन्हा आवाज आला आणि त्या आवाजाच्या दिशेनें बारकूचीं पावलें व शोधक दृष्टी वळली.

कोपऱ्यांत मळीण चिंध्यांचा ढीग होता. आवाज त्या चिंध्यांतूनच येत होता.

बारकूनें जवळ जाऊन पाहिलें तेव्हां तेथें त्याला एक लहान मुलगी दिसली. असेल आठ नऊ वर्षांची. मुलगी आजारी असावी. अगदीं पिवळी फटक दिसत होती. डोळे अतिशय खोल गेलेले आणि कातडी हाडांना चिकटून बसलेली ! गालाचीं हाडेंही कितीतरी वर आलेलीं दिसलीं. अतिशय अशक्त होती ती मुलगी. पण अशक्त असली तरी मूळची ती सुंदर असावी. डोळे खोल असले तरी काळे काळे नि मोठे पाणीदार होते.

"तूंच मला हांक मारलीस ना ?" बारकूनें तिला न्याहाळून पाहात विचारलें. पण उत्तर देण्याऐवजी ती जणुं भीतीमुळें थर थर कापून अंग चोरूं लागली. तिची ती अवस्था पाहून बारकूला फार वाईट वाटलें. तो तिला धीर देत म्हणाला.

"मला हांक का मारलीस सांग ना. भितेस कशाला ?"

"तुला नाहीं भ्यालें मी—" ती मुलगी म्हणाली, "तुला भ्यालें असतें तर मग हांकच मारली नसती."

" मग अशी उंदरासारखी चिरगुटां खालीं जीव काय दडवतेस ? वेडी बिडी तर नाहींस ? "

" वेडी ? नाहीं नाहीं—" ती मुलगी हुंदके देत म्हणाली, " मी वेडी नाहीं मला त्यांची भीति वाटते म्हणून माझ्या अंगाचा असा थरकांप झाला. तूं नाहींना त्यांना सांगणार मला घेऊन जायला ? "

हें सारें बोलत असतांना त्या मुलीच्या अश्रुंनीं तिच्या मुळच्याच कारुण्यांत आणखी भर घातली. बारकूला तिची ती कारूण्यमूर्ती बघवेना. तो तिला कळवळून म्हणाला ...'

" अग, रडतेस कशाला ? मी नाहीं हो कुणाला कांहीं सांगणार तुझ्याविषयीं कधीं. मला काय करायचं ? तुला खरोखर माझी तशी भीति वाटत असली तर हा बघ मी आलों तसा पुन्हा चाललों. पड आपली तूं खुशाल एकटीच पडली होतसि तशी." बारकू इतकें बोलून जायला निघाला देखील......पण, तो पुरता दोन पावलें देखिल गेला असेल नसेल इतक्यांत ती मुलगी पुन्हा त्याला हांका मारून म्हणूं लागली—

' नको रे मला इथं सोडून जाऊंस ! "

बारकू गडबडलाच. ही आहे तरी काय भानगड ? कधीं ह्या पोरीला जन्मांत पाहिलें सुद्धां नाहीं, सहज इथं फिरत फिरत आलों; हिनंच आपण होऊन मला जवळ बोलावलें. काय हवं म्हणून विचारलं तर भीत भीत नि थरथर कांपत माझ्याकडे पाहूं लागली, आणि हिला आपली भीति वाटते म्हणून आतां निघून जाऊं लागलों तरी पुन्हा आपली ही मला हांका मारून म्हणते आहे की ' मला इथं सोडून नको जाऊं ! ' खासा न्याय ! जणूं मीच हिला इथें आणून साडलं आहे !! पण असले विचार मनांत येऊन गेले तरी त्याचीं पावलें त्या मुलीकडे आपोआपच पुन्हा वळलीं. पुन्हा तिच्याजवळ जाऊन तो तिला हलक्या आवाजानें हळूच म्हणाला,—

" ए पोरी, हें बघ अशी रडूं बिडूं नकोस बुवा ! मला नाहीं बघवत कुणाचं रडूं. कुणाला रडतांना पाहिलं की माझ्या पोटांत कसंसंच व्हायला लागतं. तुला काय हवं तें सांगायचं असलं तर सांग; नाहींतर मग मला जाऊं तरी दे. पूस बघूं डोळे. नांव काय तुझं ! "

" सुंद्री— " दाटलेल्या कंठानें ती मुलगी म्हणाली. आपल्या क्षीण हातांनीं तिनें आपले डाळे पुसले व आवंढा गिळून घेत रडूं दाबण्याचा प्रयत्न केला.

" सुंद्री होय ? नांव तर झक्कास आहे अन् अशी रडतेस कशाळा मग ? उगी राहा. सांग बघूं मला तुला काय पाहिजे तें ? "

" पण तूं कुणाला सांगणार तर नाहींस ना ? "

नाहीं. नाहीं. हा नांवाचा बारकू आहे. नाहीं म्हटला की नाहींच सांगायचा बघ पण रडूं नको हो आतां— "

" नाहीं रडायची मी आतां— " " सुंद्री म्हणाली, " पण बारकू, कसंही करून तूं मला इथून कुठें तरी घेऊन जा. मला फार भीति वाटतेय बघ इथं. ने रे मला बारकू इथून कुठें दूर. पाया पडतें बघ मी तुझ्या...... "

तिचे ते अनपेक्षित उद्गार ऐकून बारकू हत बुद्धच झाला. असलें कांहीं ती बोलेल अशी त्याची मुळीच कल्पना नव्हती. जरा वेळ काय बोलावें हेंच त्याला सुचेनासें झालें.

★

## प्रकरण २ रें.

# "मला डोंगरीच्या तुरूंगांत नेणार!"

"बारकू, जरा जवळ येरे माझ्या—" सुंद्री पुढें म्हणाली, "मला जागचें हालतां सुद्धां येत नाहीं. पाठीचीं हाडं मोडलीं आहेत वाटतं—"

"हाडं मोडलीं आहेत—" बारकू पुढें होत म्हणाला,—"कशानं ग! कुठं पडली बिडलीस वाटतं? अचपळपणा पोरीच्या जातीनं कशाला करावा? अचपळ-पणा केला की असंच व्हायचं!"

पडलें नाहीं मी कुठं अन् कुठल्या अपघातांत देखील सांपडलें नाहीं. माझी आजी होती ना, तिनं मारमारून माझ्या पाठीचीं हाडं मोडलीं बघ.

"आजीनं हाडं मोडलीं? आजीनं?"

"आईच्या आईनं माझ्या—" सुंद्री आपली कर्मकथा सांगत म्हणाली, "आई तर आठवत नाहीं मला. ह्या थेरडीजवळच मी होतें. भारी खराब होती रे म्हातारी!"

"होती म्हणजे? मेली की काय? तसं असलं तर बरं झालं!" बारकू दांत ओंठ चावीत म्हणाला, इतक्या लहान मुलीला पाठीचीं हाडें मोडेंपर्यंत मारणारी आजी एखादी राक्षसीणच असली पाहिजे असें जें त्याला वाटलें तें योग्यच होतें.

सुंद्री पुन्हा थरथर कांपत आजुबाजूला पाहूं लागली.

"मोठ्यानं नको बोलूं" ती म्हणाली,—"कुणी ऐकेल तर... येतील. रात्रीच माझी आजी मेली. एवढ्यांतच तिला नेलें म्युनिसिपालटीच्या काळ्या गाडींत घालून."

" अन् तुला आतां कुणीच राहिलं नाहीं का ? "

" त्या कैदासणीच्या तावडींतून मी सुटलें खरीं. आतां पुढें होईल तें होईल. भारी हाल केलें तिनें माझे. तिला घेऊन जाणारे लोक जातां जातां म्हणाले-" तुझी आम्ही डोंगरीला व्यवस्था करायला सांगतों. जरा वेळानं तुला घेऊन जायला परत येतों, तंवर इथेंच पडून राहा. बारकू, मला नको रे डोंगरीला जायला. आजी म्हणत होती की डोंगरीला मुलं कोंडण्याचा तुरुंग आहे म्हणून ! तिथं मुलांचे भारी हाल करतात, जेवायला देत नाहींत, सारखं काम सांगतात नि काम केलं नाहीं तर चाबकानं झोडपतात म्हणे. मला जर तिकडे नेलं तर माझं कसं होणार ? मला तर जागचं सुद्धां उठवत नाहीं. मग मी काम कसं करणार ?"

बारकू पुन्हा विचारांत पडला. सुंद्रीविषयीं त्याला अतिशय अनुकंपा वाटली. पण त्याला तसा विचारांत पाहून मात्र सुंद्रीला कांहीं निराळेंच वाटलें. तिला वाटलें हा आपणांस घेऊन जाण्याचें कसें टाळावें याचाच विचार करीत आहे. पुन्हा ती गयावया करून त्याची करूणा भाकूं लागली.

" मला थोडं उठून बसण्याची जरी ताकद् असती तरी मी माझ्यांतली सारी शक्ती खर्च करून कुठें तरी खुरडत खुरडत निघून गेलें असतें. मग नसती तुला इतकी गळ घातली. पण मला बघ जरा सुद्धां उठवत नाहीं. इथून जरा दूर एखाद्या निवाऱ्याला मला नेऊन ठेव म्हणजे पुरे. तिथं मी आणि माझं नशीब. भीक मागत पडून राहीन. पण आतां नाहीं म्हणूं नको. पाया पडतें बघ मी तुझ्या ! "

बारकू तरीही कांहीं बोलला नाहीं. तरीही तो विचारांतच गुंग होता. सुंद्रीचा जीव खालीवर घेऊं लागला. धीर सुटत चालला. मोठ्या प्रयासानें आवरून धरलेला हुंदका जोरानें बाहेर फोडून तीं रडूं लागली.

" बोल ना रे कांहीं तरी. आतां ते लोक येतील. नाहीं नको म्हणूं. मला कुणीसुद्धां नाहीं रे या जगांत आतां--"

सुंद्रीचे तें शेवटचें वाक्य ऐकतांच बारकू अतिशय अस्वस्थ झाला.

"इतकी कशी ग रडकुटी तूं!" तो तिला म्हणाला-" जरा विचार करायला सुद्धां तूं माणसाला फुरसद देत नाहींस की!"

"मला इथं ठेवूं नको म्हणतें मी"—सुंद्री हुंदका दाबीत आणखी केविलवाणी दिसत म्हणाली.

"आतां समजलं की तें" बारकू म्हणाला—"पण अशा रडक्या मुलीला कोण घेऊन जायला कबूल होणार? तूं जरा शहाणी झालीस तर कोण नाहीं म्हणेल?"

"मी रडलें नाहीं तर नेशील कां तूं मला?"

"मग तेंच तर म्हणालों मी आतां—"

बारकूचें आश्वासन ऐकतांच सुंद्रीची कळी खुलली. त्याचें आभार कसें मानावेत हेंच तिला समजेना. कृतज्ञतेचे अश्रु गाळून तिनें आपली अव्यक्त भावना त्याला सांगण्याचा प्रयत्न केला. पण लगेच तिला आठवण झाली. 'मला कुणी रडलेलं बघवत नाहीं......किती ग रडकुटी तूं!' आपण रडत तर नाहीं, पण आपल्या डोळ्यांतलें पाणी पाहून ह्या मुलाचा जर तसलाच गैरसमज झाला तर? तर मग आपल्याला रडकुटी ठरवून तो घेऊन जाणार नाहीं......

"बारकू, रडत नाहीं रे मी..." मी त्याला म्हणाली—तूं मला नेणार म्हणालास तें ऐकून माझ्या डोळ्यांतून का कुणास माहीत हें पाणी वाहूं लागलंय, मला तें थांबवतां येत नाहीं, बघ. रागाऊं नकोस माझ्यावर—"

"उचलतांना पाठ दुखली अन् त्यासाठीं थोडंसं रडलीस तर चालेल" बारकू म्हणाला—"तसंच कारण असलं तर रडलंच पाहिजे. कारणावाचून रडूं नये. अन् फार रडूं नये इतकंच मी म्हणालों. बरं, आतां मी तुला उचलतों हां—हळूंच उचलतों. दुखलं कांहीं तर सांग—"

इतकें बोलून बारकू खालीं वाकला आणि सुंद्रीच्या मानेखालीं हात घालुन तिला हळूहळू वर उचलूं लागला. सुंद्रीनें आपल्या क्षीण हातांचा बारकूच्या माने-भोवतीं विळखा घातला आणि त्याला म्हटलें, " उचल आं–हळू ऽ च उचल..."

बारकूनें तिला अगदीं जपून उचललें. क्षणभर त्याचे हात थरथरूं लागले. ' दुखलं नाहीं ना फार ? ' म्हणून त्यानें तिला कुजबुजून विचारलें आणि ती नाहीं म्हणाल्यावर हायसें वाटून तो तिला घेऊन धर्मशाळेबाहेर पडला.

रस्त्यावर माणसांचा पूर वाहात होता. त्या बजबजपुरींतून वाट काढायला त्याला बरेच प्रयास पडत होते. पण आपल्याला प्रयास पडतात असें सुंद्रीला दिसूं न देण्याची तो बरीच खबरदारी घेत होता. पण सुंद्रीही कांहीं कमी चलाख नव्हती.

" सांभाळून चल रे बारकू—" ती म्हणत होती. " नाहीं तर पडशील बघ मला घेऊन खालीं. केळ्याच्या सालीवर पाय घसरेल. जड वाटत असेल मी तुला हवं तर फूटपाथवर जरा वेळ ठेवून दे नि विसावा घे."

अशी तिची बडबड चालूच होती.

" ' आहेस कुठं जड तूं—" बारकू म्हणत होता—" तुझ्या अंगावर मांस असेल तेव्हां ना ! हलकी फूल तर वाटतेस. अन् कुठं लांब नाहीं जायचं; इथं गोल देवळाजवळच्या कुंभारवाड्यांत तर जायचं."

" गोल देऊळ ! गोल देऊळ मी पाहिलं आहे की. माझी पाठ नीट होती तेव्हां आम्ही माधव बागेकडे भीक मागायला जात होतों तेव्हां रोज तर बघे मी गोल देऊळ. तिथवर मला वाहून नेतांना कां तूं थकणार नाहींस ? "

" नाहीं थकणार ! " बारकू अधीक उत्साहानें पावलें उचलीत म्हणाला.

प्ले हाऊसच्या ट्रॅम जंक्शनपाशीं पुन्हां सुंद्री त्याला म्हणाली–

" किती रे घाम आलाय् तुला ! ठेव ना आतां जरा खालीं मला. थोडासा विसावा का घेत नाहींस ? "

" तुझी पाठ तर नाहींना दुखायला लागली ? तसं असलं तर सांग. मग थांबतों जरा." बारकू म्हणाला.

" पाठ नाहीं दुखत. इतकं अलगद चालवलं आहेस मग कशी दुखेल पाठ. पण तूं थकला असशील ना म्हणून म्हणत होत्यें ? "

बारकू कांहीं न बोलतां पुढेंच चालूं लागला. गोल पिठ्याच्या ट्रॅम जंक्शन-वरून गोल देऊळ दिसायला लागल्यावर तो तिला म्हणाला—

" तें बघ आलं गोल देऊळ. दिसलं कां ? "

पण त्याच्या त्या प्रश्नाचं उत्तर मुळींच न देता सुंद्री म्हणाली—

" तुझी छाती बघ किती धड धड करतेय् ! खूपच दम लागलेला दिसतोय् तुला. आहे तरी किती लांब अजून तें ठिकाण ? "

" आलंच बघ—" बारकू त्या पोरीच्या चाणाक्षपणाचें कौतुक करीत म्हणाला, आपण थकलों नाहीं असा आव आणण्याची तो अगदी शिकस्त करीत होता, पण तिनें तेंच नेमकें ओळखावें याचें त्याला नवल वाटलें.

शेवटीं एकदांचें तें ठिकाण आलें. सुंद्रीला खाली ठेवण्या आधीं जिन्याखालीं वळकटी करून ठेवलेली आपली मऊ गोधडी बारकूनें पायानेंच पसरून सरळ केल्यासारखी केली; आणि नंतर तिच्या कानाशीं कांहींसें कुजबुजून तो हळूच खाली ठेवूं लागला. सुंद्रीला जरा देखील त्रास होऊं नये म्हणून हळूच त्यानें तिला खाली ठेवलें. त्याच्या त्या काळजीबद्दल अतिशय आभारी नजरेनें सुंद्रीनें त्याच्या-कडे पाहिलें आणि ती जराशी हसली. तिला किती तरी बोलावेंसें वाटलें. पण तोंडांतून शब्दच बाहेर पडेनात.

" दुखली का पाठ ? " त्यानें विचारलें.

" थोडी सुद्धां दुखली नाहीं " ती म्हणाली. " खालची गोधडी चांगली जाड जाड आणि मऊ आहे ! "

ती गोधडी! .........

त्याच्या आईनें ती त्याच्यासाठीं मुद्दाम शिवली होती. माझ्या बाळाला सिमेंटचा गारवा लागूं नये; जमीन रुतूं नये म्हणून गोधडी शिवतें असें म्हणून तिनें ती गोधडी तयार केली होती. त्याला आईची आठवण होतांच त्याचें तोंड गोरें मोरें झालें. क्षणमात्र त्याच्या डोळ्यांत अश्रु बिंदूंही चमकले. पण ते सुंद्रीच्या लक्षांत येण्या आधीच गालावरच्या घर्मबिंदूंवर ठिबकून त्यांच्यांत मिसळूनही गेले.

" घाम पूस-" सुंद्री म्हणत होती. " अन् कोट काढून तो आंतला सद्रा सुकव तरी. भिजून चिंब झालाय् बघ."

पण सुंद्रीच्या सूचनेकडे लक्ष द्यायला आतां त्याला फुरसद तरी कुठें होती ? सायंकाळची पत्रें खरेदी करायला ताबडतोब गेलें नाहीं तर ती संपून जातील हें त्याला माहीत होतें.

" कांहीं खाल्लं आहेस का सकाळपासून. " त्यानें तिला गडबडीनें विचारलें. आणि जणूं त्या प्रश्नाला उत्तराची देखील गरज नाहीं असें करून तो टुणकन् उडी मारून दादराखालून बाहेर पडला आणि रस्त्यावरच्या गर्दींत दिसेनासा देखील झाला.

त्यानंतर अवघ्या चार पांच मिनिटांच्या आंतच ' पेटंट रेस्टॉरंटच्या' बार-वाला ' पोऱ्याबरोबर थोडेसे खाण्याचे पदार्थ घेऊन तो परत आला. सुंद्रीनें पडल्या पडल्या ते पदार्थ पाहून बारकूला म्हटलें-" माझ्यासाठीं उगाच खर्च झाला तुला ! तीन आणे तरी पडले असतील ? "

' वा ग तूं ! ' अशा अर्थाच्या दृष्टीनें पाहून बारकू तिला तिला ताकीद देत म्हणाला—

" सुंद्रे, तूं न मी असा परकेपणा नको हो दाखवूं. आतां तूं नि मी असे भेद आपल्यांत नाहींत. आतां तूं नि मी एकच झालों."

" पण—"

" मला हुज्जत घालायला वेळ नाहीं. पेपर आणायला जाण्याची वेळ झालेली आहे. तूं हें आणलेलं आधीं खाऊन घे भराभर की झालों मी मोकळा."

सुंद्री मुकाट्यानें पडल्या पडल्या खाऊं लागली. चहा मात्र बशींत थोडा थोडा ओतून बारकूनेंच तिला पाजला. सुंद्री टवटवीत दिसूं लागली. बारकूनें बिलाचे पैसे बारवाल्याला देऊन त्याला वाटेस लावलें. जातां जातां बारवाल्यानें बारकूला विचारलें—

" बारक्या, कुठली रे ही पोरगी ? "

" हिचं नांव सुंद्री " बारकू म्हणाला." आज हिची आजी मेली. फोरास रोडच्या धर्म शाळेंत पडली होती तेथून हिला मी उचलून आणली. इथंच ही माझ्या बरोबर राहणार आहे ! "

बारवाला निघून गेल्यावर सुंद्रीनें बारकूला आश्चर्यानें विचारलें—

" मला काय तूं इथेंच ठेवून घेणार म्हणतोस ? "

" मग तुला वाटलं तरी काय ? "

" मला वाटतं तूं आतां परत जाऊन माझीं ती चिरगुटं घेऊन येशील आणि नंतर कुठल्यातरी रस्त्याच्या कडेला निवारा बघून भीक मागतां येईल अशा बेतानें मला निजवून ठेवून परत निघून येशील ? "

" भारीच वेडी पोरगी आहेस तूं सुंद्रे. कुठं तरी तुला सोडून यायला तूं का कुत्र्यामांजरांचें पिल्लूं आहेस ? हीच का तूं माझी पारख केली मग ? तुझ्या मनांत असा विचार तरी कसा येऊं शकला ? "

सुंद्रीला आपल्या त्या ' वेड्या ' प्रश्नाचा नंतर फार पस्तावा झाला. आपल्या त्या प्रश्नामुळें बारकूला वाईट वाटलें. कशाला आपण असा प्रश्न विचारला असें तिचें मन तिला खाऊं लागलें. तिला एकदम मोठ्यानें गळा काढून रडावेंसें वाटलें. त्यामुळें तरी आपल्या मनांतील सारें दुःख बाहेर काढून टाकावें असें झालें. पण बारकूला रडलेलें आवडत नाहीं हें आठवून ती त्याला इतकेंच म्हणाली.

" नको रे रागावूं माझ्यावर असा. मला आतांपर्यंत तुझ्याइतकें प्रेमळ कुणीच भेटलें नाहीं. म्हणून मी तसं बोललें. आतां नाहीं हो वेडेपणा करायची. "

" शाबास ! अशी शाहाणी झालीस तर कोण रागावेल ? अच्छा. आतां मला जायलाच पाहिजे नाहींतर पेपर संपून जातील— "

बारकू इतकें म्हणून सुंद्रीच्या शद्बाची वाटही न पाहतां टुणदिशी उडी मारून बाहेर पडला देखील !

★

## प्रकरण ३ रें

# सुंद्रीची करूण कहाणी !

बारकू निघून गेल्यावर जिन्याखालीं पडल्या पडल्या सुंद्री आपल्या स्मृति-चित्रांची पाहाणी करीत विचार करूं लागली. बारकू विषयीं तिला कल्पनातीत जिव्हाळा वाटूं लागणें साहजीकच होतें. किती गोड स्वभावाचा पोरगा होता बारकूं! देवानंच त्याला आपल्या भेटीला पाठवलं. त्याला हांक मारण्याची सद्बुद्धीही देवा-नंच आपल्याला दिली. नाहींतर एव्हांना काम झालें असतें ? ते येतों म्हणून गेलेले लोक आले असते नि आपल्या इच्छेविरुद्ध आपणांस डोंगरीला त्या भयंकर तुरुंगांत घेऊन गेले असते. तिथं आपले किती हाल आले असते याची कल्पनाच न केलेला बरी. काम केलं तरी तिथं पोलीस दंडुक्यांनीं मारतात म्हणून आजी म्हणत असे न् आपण तर अशा अश्वु ! काम कसं होणार आपल्या हातून अन् काय नसतें झालें तर आपलें हाल तर कुत्र्यानें देखील खाल्लें नसते मग !

आजीची आठवण होताच तिच्या हृदयांत भीतीनें चर्रर् झालें. तिनें सुंद्रीच्या मनांत बुद्धीपुरस्सर भरवून दिलेल्या डोंगरीच्या साऱ्या दहशती तिला एका मागून एक आठवूं लागल्या.

"जेवायला देखील देत नाहींत आणि चाबकानं पाठ फोडून काढतात!" तिची आजी म्हणाली होती! "चहा तर मिळतच नाहीं. दिवसांतून एकदांच थोडासा भात घालतात, पण तो देखील खातां येऊं नये म्हणून त्यांत मुद्दाम वाळू मिसळन देतात!" सुंद्रीनें ती कल्पनाच असह्य वाटल्यामुळें डोळे बंद करून घेतले. डाक्यांतून तीं कल्पना चित्रेंच घालवून देण्याचा खूप प्रयत्न करून पाहिला. पण तीं चित्रें दूर न होता उलट अधिक स्पष्ट दिसूं लागलीं. कुणी तरी एका निरपराध मुलाला चाबकाच्या फटकाऱ्यांनीं झोडपीत आहे, फाड् फाड् आवाज आणि करुण किंकाळ्या आपण ऐकत आहोंत, फटकारे थांबतच नाहींत, नंतर तर ते त्या मुलाच्या पाठीवर ओढायला तो निर्दय चाबुकवाला आपल्याकडे हा वळला आहे. इतक्यापर्यंत त्या कल्पनाचित्रांची मजल गेली. सुंद्रीच्या तोंडून भीतीची अस्फुट किंकाळी बाहेर पडली आणि जोरानें दचकून तिनें डोळे उघडले...

डोंगरीचा तुरुंग म्हणजे नरकवास–त्याहून देखील भयंकर जागा––अशी, तिची बालंबाल खात्री पटली होती. तिच्या आजीनें मुद्दामच तिला दहशत घालण्यासाठीं अशी चुकीची कल्पना करून देऊन तिच्या मनांत ह्या गोष्टी भरवल्या होत्या. तिनें कधीं हट्ट केला, मारानें आणि उपासमारीनेंही ती ऐकेनाशी झाली की ती मग शेवटचा उपाय म्हणून "तुला डोंगरीचा तुरुंगांतच नेऊन देतें" असें म्हणे आणि तिला ताबडतोब वठणीवर आणीत असे.

"गेली एकदांची ती कैदाशीण! आणि तो डोंगरीचा तुरुंग देखील बारकुनें आपल्या नशीबीचा चुकवला!"

सुंद्रीनें उसासा सोडला. जरा वेळ डोळे मिटून घेऊन ती शांत पडून राहिली. आणखी कित्येक भयंकर आठवणी तिला आठवूं लागल्या.

सगळ्यांत जुनी आठवण होती. सुंद्री त्यावेळीं अतिशय लहान होती. म्हातारी मात्र तेव्हांही अशीच भेसूर दिसे. सुंद्रीला घेऊन ती माधव बागेला जाई. नि तिथें तिला घेऊन बसून भिक्षा मागे. सुंद्रीच्या अंगावर वोटभर चिंधी देखील नसे. कधीं खूप ऊन असे तर कधीं मुसळधार पाऊस असे. कधीं धुळींत तर कधीं चिखलांत दीनवाणें तोंड करून फार भूक लागली असें दाखवीत रडायचें हें सुंद्रीचें काम, आणि लोकांना दया येऊन त्यांनीं दिलेला पै पैसा गोळा करून कनवटीला लावायचा हे त्या थेरडीचें काम! पुष्कळ धर्मात्मे उदार हस्तें धर्म करीत. सुंद्रीसाठीं आणा दोन आणे देखील देत. पण त्या पैशांचा खुद्द सुंद्रीला मात्र कांही उपयोग नसे. तिच्या हालअपेष्टांत भार टाकण्यास मात्र धर्मात्म्यांचा तो धर्म कारणीभूत होई. सुंद्रीच्या दैन्यावस्थेमुळें चांगला पैसा मिळूं शकतो हें समजल्यापासून म्हतारी तिला अधीक जरत्कारू सारखी करण्याचा मुद्दाम प्रयत्न करी. ती अधीक दीनवाणी आणि भूक-रोग्यासारखी दिसावी म्हणून म्हातारी तिला सकाळीं एक सिंगल चहा आणि पावाचा लहानसा तुकडा इतक्याच अन्नावर ठेवून दुपारी आणखी एक सिंगल चहा देई व मग थेट संध्याकाळीं कुठल्यातरी भिकार हॉटेलांत तंदूरची रोटी खाऊं घाली.

रडायचें नुसतें सोंग करतां करतां सुंद्री कधीं खरोखरीच कळवळून रडत असें. पण त्यामुळें म्हतारीला मात्र अधीक पैसे मिळून सुंद्रीचे आणखी हाल करण्यास उत्तेजन येत असें. ती जितकी रडेल तितकी म्हतारीच्या धंद्याला तेजी येत असे. अशा परिस्थितींत कुठली दया ! कुठली माया !

रडून रडून घसा दुखूं लागला आणि थोडासाच विसावा घ्यायला रडे बंद केलें तरीही म्हातारी नुसती संतापून जाई. पाठीत एखादा धपाटा, कमरेंत लाथ आणि कधीं कधीं जोरानें चिमटे देखील काढी. म्हतारीनें जन्मांत कधी नखें कापलीं नसल्यानें तिचीं नखें घुबडाच्या नखांप्रमाणें वाढलेलीं दिसत. सुंद्रीला त्या नखांची अतिशय भीति वाटे.

रात्रीच्या वेळीं म्हातारी तिला घेऊन कुठल्यातरी पायखुटीवर कधीं कधीं नुसत्या थंड फरशीवरच निजत असे. दिवस भराच्या श्रमानें सुंद्रीला तिथें देखील

झोप येत असे पण तें सुख देखील तिला फार वेळ लाभत नसे. रात्रींतून कितिदां तरी गस्तवाले पोलीस येऊन विणाकारण त्रास देत व दमदाटी करीत. मधून मधून म्हातारीच इतकी खोकत बसे कीं तें ऐकून झोप लागणेंच अशक्य होत असे. सुंद्रीचा जीव नकोनकोसा वाटायचा तिला. पण तरीही कुरकूर करायची अगर रडायची सोय नसे. दिवसा रडली तर म्हातारीला पैसे मिळत आणि ती खूष होई. पण तेंच जर का ती रात्रीं रडली तर म्हातारी नुसती खवळून उठे आणि एखाद्या घारीप्रमाणें अभद्र शिव्या किंचाळत सुंद्रीवर तुटून पडे. तिच्या नाजूक अशा शरीरांत ती आपलीं तीं घुबडाच्या नखांसारखीं दिसणारीं नखें खुपसून तिला गप्प करी !

माधव बागेला त्यांच्या प्रमाणेंच कितीतरी भिकारी भीक मागत. सुंद्रीच्या वयाचीं इतरही कित्येक मुलींमुलें तिला तेथें दिसत. सुंद्रीला पुष्कळदां त्यांच्याशीं बोलावें असें वाटे. पण त्यांच्याशीं बोलण्याची अगर त्यांची ओळख करून घेण्याची संधी सुंद्रीला कधींच मिळाली नाहीं. एका धंद्यांतील. प्रतिस्पर्धी तीं मुलें, त्यांचे तें पालक—तीं गिधाडें—त्यांना तसें करूं देतील तेव्हां ना ?

लांबूनच सुंद्री ह्या मुलांच्याकडे पाही. त्यांतल्यात्यांत एक मुलगा सुंद्रीच्याच वयाचा असे. सुंद्रीहूनही तो अशक्त दिसे. त्याच्याही अंगावर बोटभर चिंधी नसे आणि सर्वांगावर कसले तरी लहान लहान फोड दिसत. सुंद्रीनें कधीं फार हट्ट केला, धपाटे, लाथा, चिमटे वगैरे कशालाही दाद दिली नाहीं म्हणजे तिची ती भयंकर आजी त्या मुलाकडे बोट दाखवून म्हणायची.

“ बघ सुंद्रे, आतां जर का ऐकलं नाहींस तर तुझी मी त्या पोरासारखी गत करीन. तुझ्याही सर्व अंगावर त्याच्यासारखे चटके देऊन फोड आणीन !”—आणि म्हातारी तसं म्हाणाली की सुंद्री मग तेव्हांच तिचें म्हणणें मान्य करीं.

कित्येक दिवसपर्यंत सुंद्रीच्या मनानें त्या फोडांचीच दहशत घेतली होती. स्वप्नांत देखील तिला त्या मुलाचे ते–फोड दिसत असत. कधीं कधीं आजी खरोखरीच बोलल्याप्रमाणें हातांतल्या जळत्या बिडीच्या थोटकानें आपल्या अंगाला चटके

देऊन फोड काढते आहे असेंही स्वप्न तिला दिसें, आपलें अंग फोडांनीं भरत आहे, त्या फोडांना पाहून माधव बागेंतील धर्मात्म्यांच्या दानधर्माला नुसता ऊत येत आहे. आजीला खूप खूप पैसे मिळत आहेत आणि त्यामुळें अधीकच शेफारून जाऊन आजी नवे नवे फोड काढण्यास आपल्या विणवणीकडे दुर्लक्ष करून भेसूर हसत सरसावत आहे असेंही स्वप्न ती पाहात असे. हीं भयाण स्वप्नें पाहून ती कधींतरी मध्येंच किंकाळी मारून जागीं होई आणि तसें झालें कीं म्हातारी मग तिला नखांनीं ओरबाडून बडव बडव बडवित असे....

माधव बागेंतील तो दुर्दैवी मुलगा पुढें पुढें त्या जागेवर दिसेना. कुठें गेला कीं मेला तो? सुंद्रीला कांहीं समजेना. ती भीत भीत त्याच्या जागेकडे पाहून मनाशींच खूप विचार करी. म्हातारीच्या नजरेंतून ही गोष्ट सुटली नव्हती. सुंद्रीच्या प्रत्येक हालचालीवर तिची अगदीं बारीक नजर असे. तिच्या धंद्याचें भांडवलच नव्हती का सुंद्री?

सुंद्री त्या मुलाविषयीं विचार करीत असावी असा संशय येताच म्हातारीनें नवीनच दहशत तिला घालून ठेवली—

"बघतेस काय त्या जागेकडे?" ती म्हणाली होती. "तें पोरगं गेलं डोंगरीच्या तुरुंगांत. अन् तिथें चाबकाचे फटकारे खा-खाऊन मेलं देखील म्हणतात! त्याची आजी त्याच्या अंगावर नुसते फोडच काढीत होती चिडीच्या थोटकानें. पण जीवंत तरी राहातां येत होतं ना त्याला? पण कारटंच हट्टी होतं तें म्हणतात! आजीनं वैतागून त्याला घातलं नेऊन डोंगरीला! काय करील बिचारी! तूं तर नको माझं ऐकूं, मी देखिल नेऊन घालीन बघ तिकडे तुला..."

त्या दिवसापासूनच सुंद्रीला डोंगरीच्या रेफरमेटरी स्कूलची धास्ती बसली होती मनांत. त्या फोडांपेक्षाही सुंद्री डोंगरीचें नांव काढलें की गर्भगळीत होते हें त्या म्हातारीच्याही चटकन् लक्षांत आलें; आणि ती मग तिला डोंगरीच्या तुरुंगांतील एकाहून एक भयंकर गोष्टी सांगण्यांत आपला बराच वेळ खर्च करूं लागली.

सुंद्री डोंगरीच्या तुरुंगाला पुढें पुढें इतकी कांही धास्तावली की एके रात्रीं तिला त्या तुरुंगांत घालण्यास आपली आजी आपणांस घेऊन जात आहे असें स्वप्न पडलें. तिनें आजीच्या हाताला हिसडा मारला आणि वाट फुटेल तिकडे ती पळत सुटली......

...आणि त्याबरोबर खरोखरीच ती जागी झाली आणि वाट फुटेल तिकडे पळत सुटली. म्हातारी देखील जागी झाली आणि तिच्या मागें धावूं लागली. म्हातारीनें तिला पकडलें आणि तिला ओढीत ओढीत धर्मशाळेंत घेऊन आली. आंत येतां येतां तिनें धर्मशाळेच्या दारांत सुंद्रीच्या पाठींत लाथ घातली. त्या धक्क्यानें कोलमडून ती धर्मशाळेच्या पायरीवर पडली. वरून आणखी लाथा बसतच होत्या. त्याच मारपिटींत त्या रात्रीं सुंद्रीच्या पाठीचें हाड मोडलें......

अशा असंख्य हाल अपेष्टांनींच सुंदरीचें तें चिमुकलें जीवन भरलेलें होतें. विश्रांति नव्हती, मायेचा शद्ब नव्हता, सहानुभूतिचा ओलावा नव्हता ! पण......
पण आज तिच्या आयुष्यांतला अंधार नाहींसा करायला सुवर्णभानु उगवला होता. आज नशीब तिला नव्याच प्रांतांतून घेऊन चाललें होतें. तिच्या मागची कृत्या—ती थेरडी आजी कायमची खलास झाली होती. तो माधवबाग आणि तेथील तो लाजिरवाणा दैनंदिन जीवनक्रम संपला होता—डोंगरीचा तुरूंग देखील आतां तिच्या जिविनांतून कायमचा नष्ट झाला होता ! आयुष्यांत प्रथम तिला मायेचा शद्ब ऐकूं आला होता. सहानुभूतीचा ओलावा लाभला होता. प्रथमच आपलें माणूस मिळालें होतें.......

" बारकू—माझा बारकू ! "

असें कायसें म्हणून तिनें डोळे झाकलें त्या बंद डोळ्यांच्या केसाळ पापण्या पान्हावून त्यांतून दोन टपोरीं आसवें तिच्या गालांवरून ओघळलीं. क्षणभर दोन रूपेरी ओघळ त्या गालावर दिसले. पण लौकरच तेही सुकून गेले. तिला त्यानंतर बराच वेळ गाढ झोप लागली असें दिसलें....

प्रकरण ४ थें

# बिचारी बारकूची आई !

बारकू सुंद्रीला सोडून बाहेर निघाला तो संध्याकाळचे 'पेपर' खरेदी करायला रस्ता शोधीत गर्दीतून वाट काढीत चालला. 'पेपर' मिळालें नाहींत तर हात हालवीत परत यावें लागूं नये म्हणून तो खूप घाईनें जात होता. चालतां चालतां सुंद्रीचाच विचार त्याचे मनांत घोळत होता. आपण आज सहज फिरत फिरत त्या धर्म शाळेंत गेलों काय, तिथें ही पोरगी आपणांस दिसली काय, तिनं आपल्याला हांक मारली काय, आपण तिची ती करूण स्थिती पाहून तिची पूसतापस केली काय ! सारेंच कांहीं अनपेक्षित. खरंच, काय दशा केलांय त्या पोरीच्या आजानें तिची ! जगांत मानसं कितीही स्वार्थी असली तरी त्या स्वार्थापायीं इतकीं निर्दय बनूं शकतात कां ! सुंद्री—सारख्या कोवळ्या पोरीची पाठ मोडे-पर्यंत मार देणारी ती थेरडी काय सुंद्रीची खरीच आजी असेल ? कीं तिचा नि सुंद्रीचा कुठलाही नाते संबंध नसता तिनें सुंद्रीला आठवत नव्हतें तेव्हांपासून कुठून तरी पळवून आणली असेल ? एखाद्या निराश्रीत भिकारणीची देखील सुंद्री पोरकी पोर असूं शकेल. आई मेल्या नंतर ती ह्या राक्षसणीच्या हातीं मिळाली असेल. कांहीं का असेना, पण सुंद्रीमागची ती ब्याद् आज पासून नाहींशी झाली हें एक बरेंच झालें. ह्या थेरडी सारखीं माणसें देव या जगांत जीवंत तरी का ठेवतो ? देव चांगल्या चांगल्या माणसांना का नाहीं असल्याचें आयुष्य देत ? चांगल्या माणसांना मात्र देव फार लौकर घेऊन जातो. त्यानं आपल्या आईला नाहा किती लौकर नेलं...आईची आठवण होतांच त्याच्या डोळ्यांत पाणी भरूं लागलें. मोठ्यानें हुंदके दे-देऊन रडावें असें त्याला वाटूं लागलें. पण······ तेवढ्यांत त्याला आठवलें. त्याच्या आईला त्यानें रडलेलें बघवत नसे. कधी तो रडला तर ती त्याला ओढून हृदयाशीं घेई आणि त्याला कुरवाळून म्हणे—

"बाळ रडूं नये हो—रडवीं माणसं जगांत सुखी होऊं शकत नाहींत केव्हां. कुठलीही आपत्ती आली तरी रडूं नये. धीरानें त्या आपत्तीला सामना द्यावा."

आईच्या त्या साऱ्याच बोलण्याचा अर्थ बारकूला कळत नसे. पण रडूं नये, रडणें चांगलें नाहीं इतकें त्याला कळून आलें होतें. त्याची आई पुढें म्हणत असे.

"तुला रडतांना पाहिलं की माझ्या पोटांत कसेंसें होतें. मला कुणालाही रडताना बघवत नाहीं—अन् तुला तर नाहींच नाहीं !"

आपण आईचें तें बोलणें पुन्हां एकदां प्रत्यक्ष ऐकतों आहों असा बारकूला भास झाला. त्यानें पटकन् डोळें पुसलें.

बारकूची आई स्वतः देखील अतिशय धाराची बाई होती. आयुष्यभर आपत्तीला ती तोंड देत आली होती. तिच्या पूर्व चरित्रा विषयीं कुणालाच कांहीं माहिती नव्हती. बारकूला देखील तिनें ती माहिती केव्हां दिली नाहीं अन् बारकूनेंही तिला ती कधीं विचारली नाहीं. लहान पोर बारकू. तो ती कशाला विचारील ? अन् कुणाला स्वतः होऊन ती सांगावी म्हटलें तर बारकूच्या आईला तरी कोण होतें जगांत जिवाळ्यांचें असें...! नळ बाजारांत ती पाटी घेऊन हमालीचें काम करी. ऊन पाहिलें नाहीं, वारें पाहिलें नाहीं, पाऊस म्हटला नाहीं की आजार म्हटला नाहीं. दिवसभर बारकूसाठीं ती कष्ट करीत राही. दिवसभर बोजे वाही. त्याचा जो रोजमुरा मिळेल तो प्रथम बारकूसाठीं कपडे घेण्यांत, दूध घेण्यांत आणि त्याला खाऊं घालण्यांत ती खर्च करी. स्वतः अर्धपोटी राहून ती बारकूला खाऊ घाली. किती अशक्त दिसे ती—सारी शक्ती एकवटून बोजे उचलतांना तिचें सर्वांग जीर्ण लतेच्या पुष्पाप्रमाणें थरथर कांपे. पण तिनें कधींही कुरकूर केली नाहीं. अंगांत ताप असो थंडी असो बारकूसाठीं निढळाचा घाम गाळून ती खपली.

दिवसभर काम करून तिला थकवा आल्यावर बारकू तिचें अंग दाबण्याचा प्रयत्न करी तेव्हां ती त्याला तसें करण्यापासून मना करीत व त्याच्या त्या चिमकुल्या हातांचीं चुंबनें घेत म्हणे—

"नको रे बाळा दाबूं तूं माझं अंग. हात दुखतील तुझे कोवळे !"

बारकूचा मग नाइलाज होई. तो तिच्या पुढ्यांत अगदीं तिच्या उराशीं चिकटून निजे. तसा तो निजला म्हणजे तिच्या अंगानें कधीं कधीं त्याला अगदीं कढत कढत चटके बसत. रोज पहाटे पहाटे तिला किती तरी घाम येत असे. नि नंतर नंतर तर तिला खूप खोकलाही लागला होता. आपल्या खोकल्यानें बारकूची झोप मोड होईल असें वाटून पहाटे पहाटे खोकल्याचा जोर जास्त झाल्यावर निजलेल्या बारकूला जिन्याखालींच सोडून ती जरा दूर जाऊन रस्त्यावर खोकत बसे. पण ती उठून गेली की बारकूला आपोआपच जाग येत असे. तो तिच्या पाठोपाठ त्या रस्त्यावर जाऊन तिच्या जवळ जाऊन तिच्या असहाय स्थितीकडे पाहून तळमळे. तिला वाटे, बारकूला अंगाखालची जमीन रुतल्यामुळेंच नीट झोंप लागत नाहीं. यावर उपाय म्हणूनच तिनें चोर बाजारांतून कांहीं जुने फाटके कपडे आणून त्यांची एक जाडजूड आणि मऊ गोधडी बारकू साठीं शिवून तयार केली. मघाशीं सुंद्रीच्या अंगाखाली घातलेल्या त्या जाड जूड आणि मऊ गोधडीचा हा गोड इतिहास होता. सुंद्रीनें "गोधडी चांगली जाडजूड आणि मऊ मऊ आहे" असें म्हटल्यावर बारकूच्या डोळ्यांत म्हणूनच पाणी भरलें होतें. आईची ती प्रेमळ पण व्याधीग्रस्त मूर्ति जशीच्या तशी त्याला आठवली होती. पण डोळ्यांत पाणी भरल्याबरोबर त्याला आईचा तो आदेशही आठवला. बारकूला आपल्या आईचें सान्नीध्य नेहमी भासे. त्याला वाटे आपली आई मेली असली तरी तिचा आत्मा अजून आपल्या आसपासच वावरत आहे. आपण वेळोंवेळीं कसें वागावें ह्याचें मार्गदर्शन करीत आहे. मघाशी देखील त्याला असा भास झाला होता. जणू त्याची आई त्याला म्हणाली होती—

"बाळा, तुला मी किती रे सांगूं—तूं रडूं लागलास कीं माझ्या पोटांत कसेंसेंच होतें. मला कुणाचीही रडवीं तोंडें बघवत नाहींत हें तुला माहीत आहे!" आतां देखील त्याला आपल्या आईचे ते शद्व पुन्हां आठवले आणि म्हणूनच त्यानें आपलें ते अश्रु चटकन् पुसून टाकलें. पण अश्रु पुसले म्हणून दुःखाचें कढ शांत

होतात का ? हुंदका दाबता येतो माणसाला, पण हृदयांतली खळबळ दाबता येते का ? तसं असतं तर आणखी काय हवं होतं ?

आईच्या आठवणी येतच राहिल्या बारकूला. तिनेंच त्याला वर्तमान पत्रें विकण्याचें शिकविलें. भीक मागण्याचा लाजिरवाणा धंदा करण्यापेक्षा अंग मोडून मेहनत करणें श्रेष्ठ असें तिचें ब्रीद होतें. आई नव्हती ती—देवता होती कोणी जणूं !

देवता ...!

देवता का अशा अपेष्टा आणि हालांत जगतात ? देवता का अशा मृत्यूशी झगडत असतात ? बारकूची आई जर देवता होती तर मग तिची अशी अवस्था का होती ? ती का शापीत देवता होती ? देवता अशा शापित कशानें होतात ? ह्या देवतेला असा शाप कशामुळें मिळाला होता ?

शेवटपर्यंत आपत्तीशीं झगडत होती बारकूची आई. पण तिनें सत्त्व सोडलें नाहीं. कधींही भिक मागितली नाही. जन्मभर स्वतः कष्ट केलें आणि बारकूलाही त्याचे बाळकडू पाजलें एवढासा छोटा छोकरा बारकू पण आपली रोजची भाकर स्वतःच्या कमाइनें मिळवूं लागला. तिनें त्या वयांत त्याला स्वावलंबी बनवून सोडला. आपण हें जग सोडून लौकरच जाणार हें भविष्य तर तिला अगावूं समजलें नव्हतें ना ? आपल्या मागें आपल्या मुलानें भुकेपायीं लाचार बनून दुसऱ्या पुढें हात पसरुं नये. भिकारी बनूं नये; ह्या दूर दृष्टीनेंच तिनें त्याला श्रम करण्याचें शिक्षण दिलें. कांहीं माणसांना आपलें मरण खरोखरीच समजून येतें का ?

जीवन संग्राम लढत लढतच तिनें आपला देह ठेवला. बारकूची आई साधी नव्हतीच. रुप्याच्या तुकड्यांच्या संख्येनें माणसाची पात्रता ठरवणाऱ्या दुनियेंत मात्र तिला स्थान नव्हतें. पण माणसाची योग्यता तत्त्वनिष्ठेवर असते. बारकूची आई तत्त्वनिष्ठ संत होती... - का देवता होती ?

आईच्या मृत्यूनंतर बारकूवर आकाश कोसळलें जगांतली त्याच्या वरची सावलीच परमेश्वरानें का काढून घेतली ? का त्याला पोरका केला ? त्याचा आधार संपला. मायेची ऊब नाहींशीं झाली त्याची. जिव्हाळ्याची सरिता आटून गेली. आतां कोण मायेनें कुशींत घेऊन झोंपणार ? कोण स्वतःच्या अंगातून ताप फणफणत असतांही बारकूला खालीं जमीन तर रुतत नाहीं ना, अशी काळजी करणार ? कोण त्याच्या अंगावरून आपल्या आशीर्वादाचा हात फिरविणार ?

दुसरा एखादा मुलगा अशावेळीं दुःखातिशयानें वेडा झाला असता, गांगरुन त्याला काय करूं नि कुठें जाऊं असें झालें असतें. जन्मभर तो रडत बसला असता. पण बारकू देखील सामान्य मुलगा नव्हता. वयानें लहान असला तरी त्याच्या आईनें त्याला तत्त्वनिष्ठेचें बाळकडू पाजून समर्थ केला होता. जीवन संग्रामांत त्यानें धीर धरून उडी घेतली.

पण मधून मधून त्याला आपला एकटेपणा अगदी असह्य होई. आपल्याला आपलें कुणीतरी असावें अशी भूक लागून त्याचें बालमन व्याकूळ होई. अशा वेळीं अश्रु आवरून धरणें त्याला अगदीं अशक्य वाटे. आईचा न रडण्याचा आदेश आठवेच पण तरीदेखील अश्रु थांबत नसत. तसें झालें मग तो मनमुराद रडे. रडतां रडतां जणूं आजु बाजूच्या वातावरणांत वावरणाऱ्या आईच्या प्रेमळ आत्म्याशीं बोलावें तसा तो बोलूं लागे. तो म्हणे—

"आई, मी मोठ्यानें नाहीं हो रडत. रडूं नये म्हणून स्वतःस आवरण्याचा मी किती किती प्रयत्न करतों आहे बघ—पण अश्रुच थांबत नाहींत त्याला मी काय करूं ? अन् मी असें रडूं नये असें जर तुला मनापासून वाटत होतें तर मग मला असा एकटा सोडून तूं का ग देवाकडे गेलीस ? मी आतां कुणाला आई अशी हांक मारूं ? कुणाला माझें हें सारें दुःख सांगून मन हलकें करूं ? कुणाच्या गळ्याला मिठी मारूं ?"

बारकुच्या ह्या मुक्या कढांना उत्तर म्हणून तर सुंद्रीची नि त्याची भेट देवानें करून दिली नव्हती ?

सुंद्री......

खरंच गोड पोरगी सुंद्री. अशी प्रेमळ आणि मधुभाषणी. आजारी असली म्हणून काय झालें ? माणूस का आजारी नसतें ? अन् आजार बरा होत नाहीं असें थोडेंच आहे ?

ह्या विचारा बरोबर बारकूनें चुटकी वाजवली सुंद्रीची पाठ बरी करतां येईल असा एखादा उपाय त्याला आठवला का ? चुटकी वाजवून तो झप झप पावलें टाकीत चालू लागला. कसला नवीन विचार त्याला सुचला असावा बरें ? प्रफुल्ल चेहऱ्या वरून तो विचार बराच आशादायी असावा असें वाटलें.

'पेपर' विकून परत कुंभारवाड्याकडे गेल्यावर बारकू तो विचार सुंद्रीला सांगितल्याखेरीज राहणार नाहीं. तोंपर्यंत आपण आपली जिज्ञासा ताब्यांत ठेवली पाहिजे.

## प्रकरण ५ वें

# सुंद्रीची पाठ नीट होणार ?

सुंद्रीचा डोळा बराच वेळ लागला होता. तिला जाग आली तेव्हां जिन्यावरून जाणाऱ्या येणाऱ्यांची गर्दी बरीच वाढलेली दिसली. अंधार पडल्यामुळें दिवे लागले होतें. पण त्यांचा प्रकाश मात्र जितक्यास तितकाच होता. अजून बारकू परतला नव्हता. विश्रांति मिळाल्यामुळें सुंद्रीला बरीच हुशारी वाटत होती. तिनं जरा हालचाल करून पाठीला आराम दिला व रस्त्यांकडे डोळं लावून ती बारकूची वाट पाहात पडून राहिली.

सुमारें आठाच्या सुमारास बारकू आला. बराच थकून गेलेला दिसला तो. तोंड उतरून गेलें होतें श्रमानें हातपायही गळाल्याप्रमाणें दिसत होतें. पण तरीही सुंद्री दिसतांच तो खुदूकन् हसला. त्याच्या डोळ्यांत आनंद चमकला. सुंद्रीनेंही त्याला सहास्य मुद्रेनेंच प्रत्युत्तर केलें.

" किती रे उशीर हा! अंधार पडून दिवे देखील लागले. रोजच इतक्या उशीरानें येत असतोस वाटतं?"

"रोज नव्हता इतका उशीर होत—" बारकू म्हणाला—"पण आजपासून मात्र असा उशीर होणारच."

" आजचपासून का होणार उशीर?"

रोज ठराविक पेपर विकले की काम भागे रोजचं काम. मी एकटा होतों. पण आतां मी एकटा थोडाच आहे? आतां जादा पत्रं विकून पैसे जास्त मिळवले तरच ना दोघांचं भागणार?"

सुंद्री कांहीं न बोलतां गप्प बसली. आपल्यासाठीं बिचाऱ्या बारकूला अधिक वेळ खपावें लागलें; याचें तर तिला वाईट वाटत नव्हतें? तोच विचार तिच्या मनांत आला असावा. पण आपण जर तसें बोलून दाखवलें तर बारकूला वाईट वाटेल. त्याला तें आवडणार नाहीं हें त्या चाणाक्ष पोरीनें ओळखलें. ती कांहीं बोलत नाहीं असें पाहून बारकूच पुढें म्हणाला—

" उद्यांपासून दुपारच्या फावल्या वेळांत किंवा रात्रीं एखाद्या सिनेमांत खारी शेंग वगैरे विकण्याचें काम मिळून जर थोडे पैसे अधिक मिळवतां आले तर तें देखील मी प्रयत्न करून बघणार आहे. आज कामावर असतांना सुंद्री, मी तुझाच विचार करीत होतों बघ—"

सुंद्री कांहीं न बोलतां बारकूकडे बघत त्याचें सारें म्हणणें ऐकून घेत होती. बारकू पुढें म्हणत होता—

"तुझी ही दुखरी पाठ आतां लौकर बरी झालीच पाहिजे. तुझे त्यामुळें होणारे हाल मला बघवत नाहींत. कांहीं तरी करून ही पाठ नीट करायचीच. हयगय केली तर......" पण इतकेंच म्हणून बारकू एकदम थांबला—"तर तूं कांहीं जगूं शकणार नाहींस फार दिवस" असें तर त्याला म्हणायचें नव्हतें? अन् खोटें का होतें तें म्हणणें? सुंद्रीचीं नुसतीं हाडेंच शिल्लक उरलीं होतीं. वेदना सहन करण्याला देखील मर्यादा आहेच कीं—झीज झीज तरी कुठवर होणार! अन् सुंद्री तर अशी बारीक पोरगी. त्याचा काय नेम?......

खरं तर सुंद्रीसारखी भिकार पोरगी मेली काय अथवा जगली काय, जगाच्या ती खिजगणतीस नव्हती. पण बारकू कुठें 'जग' होता? तो का लोक होता? आतां तो सुंद्रीला मुळींच परका नव्हता की सुंद्री त्याला परकी नव्हती. सुंद्री त्याची आणि तो सुंद्रीचा अशी भावना दोघांत परिस्थितीमुळें निर्माण झाली होती. नातें निर्माण व्हायला रक्त मांसाचेंच बंधन हवें नसतें. तें बंधन असूनही जिव्हाळा अगर आपुलकीचा लवलेश नाहीं अशीं उदाहरणेंही थोडीं थोडकीं नाहींत—प्रेमभावना, अपुलकी, जिव्हाळा उत्पन्न व्हायला जर प्रत्येक वेळीं रक्तमांसाचें बंधनच हवें अशी आवश्यकता जगांत असती तर जगांतली माणूसकी मेली असती.

परिस्थितीनें बारकू आणि सुंद्री एक जागीं आलीं—

परिस्थितीनेंच त्यांच्यांत आपलेपणा निर्माण झाला—

एकमेकांना लागलेली भूक भागली—

अवघ्या कांहीं तासांत त्यांच्या आपुलकीचा प्रचंड वृक्ष बनला.

आपली पाठ कधीं काळीं नीट होऊं शकेल ही कल्पनाही बिचाऱ्या सुंद्रीच्या मनाला कधी शिवली नव्हती—तिच्या नैराश्यपूर्ण जीवनांत असली आशा तिला कोण देणार? तिची सैतानी आजी तर मुद्दाम तिच्या मनांतून नाहीं नाहीं तें भरवून तिला भेडसावित होती. पाठीच्या वेदना असह्य झाल्या आणि ती तळमळूं लागली कीं म्हातारी खवळून म्हणे—

" कारटे, मरत का नाहींस ? इतकी कशी चिवट तूं ? इतक्या वेदना होता-हेत तर मरून जावें. आजीला बिचारीला त्रास द्यायला कशाला जगावं ? नाहींतरी आतां मरावं हें लागणारच आहे!"

' मरण ' ह्या शब्दाची सुंद्रीला फार भीति वाटे. आपणाला ह्या पेक्षां अधिक वेदना सहन कराव्या लागल्या तरी आपण त्या रडत रडत सहन करूं, पण मरण नको असें तिला वाटे—मरणासारखी भयंकर गोष्ट जगांत नाही अशी तिची समजूत होती. पण आपली आजी म्हणते त्याप्रमाणें खरोखर मारणार तर नाहीना ही तिची भीति दिवसेंदिवस वाढतच होती—आपण इतकें दिवस ज्याला भितों तें मरण ह्या दुखऱ्या पाठीमुळें आपणावर घाला घालणार ही कल्पना तिला मधून मधून फार बेचैन करी. पण आतां बारकूनें " तुझी पाठ बरी झाली पाहिजे " असें म्हटलें तें ऐकून तिला तिच्या निराशेच्या काळ्या कुट्ट काळोखांत आशा किरणांचें दर्शन झालें. ती अतिशय उत्सुकतेनें बारकूला विचारूं लागली—

" काय म्हणतोस बारकू, माझी ही पाठ खरोखर सुधारेल ? पुन्हा नीट होईल?"

बारकू तिच्याकडे बघतच राहिला. आपली ही पाठ जन्मभर बरी होऊंच शकणार नाहीं असें ह्या पोरीला वाटलें कीं काय ? असाच त्याच्या ह्या बघण्याचा अर्थ दिसला—पण त्याकडे विशेष लक्ष न देतां स्पष्ट उत्तर ऐकण्यासाठीं सुंद्रीनें पुन्हा त्याला विचारलें—

" सांग ना रे बारकू—होईल का माझी ही पाठ पुन्हा चांगली ? पुन्हा धट्टी खट्टी होईन का मी ? मोडलेलीं हाडं नीट सरळ होऊं शकतील ?

" किती ग वेडपट सारखी प्रश्न विचारतेस तूं सुंद्रे!" बारकू म्हणाला—" तूं अशीच जन्मभर अधू राहाणार असें तुला सांगितलें कोणी ? ही कल्पनाच किती मूर्खपणाची आहे! अधू झालेलीं माणसें का बरीं होत नाहींत ? ही शंका तरी तुला का वाटली ? "

" मला कुणी देखील चांगल्या गोष्टीं सांगून धीर दिला नाहीं रे बारकू. शिव्या, चिमटे, धपाटे, तुरुंग, मार आणि मरण यांशिवाय आजी माझ्याशीं कधीं

बोललीच नाहीं. बारकू, तूंच ह्या गोष्टी मला आज प्रथम सांगितल्या आहेत—मी स्वप्नांत तर नाहींना? आजच माझ्या आयुष्यांत ह्या चांगल्या चांगल्या गोष्टी मला कशा मिळताहेत?"

"वेडे पोरी, ही तर नुसती सुरुवात झाली—अजून किती चांगल्या चांगल्या गोष्टी घडायच्या आहेत! अजून तुला खरं खुरं बरी व्हायचं आहे—नुसतं तूं बरी होणार हें ऐकूनच तूं इतकी हुरळून गेली आहेस मग खरीच बरी होशील तेव्हां तूं काय करशील?"

"बरी झाल्यावर मी खूप मजा करणार! उड्या मारीन, तुझ्या गळ्याला मिठी घालून नाचेन. पण हें सगळं होणार का खरं? कसं होणार हें? मोडलेलं हाड जुळणार कसं? कोण जुळवून देणार? कसं जुळवणार?"

"हाडं जुळवून देणारी पुष्कळ माणसं आहेत हो सुंद्री. तुझ्या पाठीच्या हाडांपेक्षां देखील दुसरीं हाडं हीं माणसं सांधून देणारीं आहेत—"

"मग बारकू, अशीं हीं माणसं आहेत तरी कुठं? आपण केव्हां जाणार त्यांच्याकडे? तुटलेलीं हाडें जोडून देणारीं हीं माणसें देवा सारखीं असलीं पाहिजेत! साध्या माणसांना हाडं कशीं सांधतां येणार? बारकू, मला ह्या माणसांकडे लौकर चल रे घेऊन..."

"इतकी घाई करून नाहीं हो चालणार सुंद्री. हीं हाडं सांधणारीं माणसं कांहीं फुकट नाहीं हाडं सांधीत. त्यांना पैसे द्यावे लागतात. हें पैसे जमवायचें म्हणून तर मला आतां अधीक काम करावें लागणार-खूप खूप काम करून मी लौकर पैसे सांठवीन, अन् मग तुला नेईन बघ अशा माणसाकडे इलाज करायला—"

पैशांचें नांव निघतांच सुंद्री एकदम शांत झाली. जरा वेळ शांत राहून तिनें हळूच बारकूला विचारलें—

"किती रे पैसे जमवावे लागणार बारकू तुला!"

सुंद्रीच्या स्वरांतील स्पष्ट निराशा बारकूला असह्य झाली-तिला धीर देत तो म्हणाला—

“ फार नाहीं लागायचे कांहीं. थोडे जमले तरी आपलं काम होईल. पायधुणीला जुना भीमजी म्हणून एक हाडवैद्य आहे तो आपलं काम थोडक्यांत करून देईल—”

“ पण त्याला माझी पाठ नीट करतां येईल का खरंच?”

“ येईल म्हणजे! तुला थाप वाटतेय् कीं काय! असा तसा नाहीं तो जुना भीमजी! जुना अने जाणिता आहे म्हणतात तो!”

“ जुना अने जाणिता म्हणजे रे काय?”

“ जुना अने जाणिता म्हणजे जुना अने जाणिता.” बारकू म्हणाला. सुंद्री गप्प बसली—

रात्रींचें जेवण दोघांनीहिं दादराखालीं एकत्र केलें आणि एकमेकांना आपल्या कार्मकथा सांगत दोघेंही बारकूच्या त्या मऊ गोधडीवर बरीच रात्र टळल्यावर झोंपीं गेले.

पण झोंपी गेल्यानंतर बारकूची ती झोप मात्र फार वेळ टिकली नाहीं—त्याला एक स्वप्न पडलें—त्याची प्रेमळ आई त्याला स्वप्नांत दिसलीं. दोन्हीं हात पसरून ती त्याच्यापुढें उभी राहिलेली त्यानें स्वप्नांत पाहिली—एकदम झेप घेऊन तो तिच्या जवळ गेला. तिनें त्याला घट्ट उराशीं धरलें; पाठीवरुन हात फिरवला आणि त्याच्या गालाचीं खूप खूप चुंबनें घेतलीं. अतिशय गोड शद्बांत ती त्याच्याशीं कांहीं तरी बोलूं लागली. ती काय म्हणते तें ऐकण्यासाठीं त्यानें जिवाचा कान केला—पण आईचें तें बोलणें ऐकूं येण्याच्या आंतच एक अतिशय कर्कश किंकाळी त्यानें ऐकली. भेदरून जाऊन त्यानें जिकडून किंकाळी आली त्या दिशेला दचकून पाहिलें. एक अतिशय कुरूप अशी म्हातारी त्याला दिसली. अतिशय जरखड म्हातारी होती ती. तिच्या तोंडावर भयाण छाया होत्या. डोळे अतिशय जळजळीत होते......आणि ती म्हातारी बारकूलाच शिव्या-देत होती......

“ ह्याच कारस्थानं सुंद्रीला लपवून ठेवली आहे” ती किंचाळली—“ बच-तोस काय असा भेदरून? तुलाच सांगतेय मी! खबरदार त्या पोरटीला लाडावून ठेवशील तर!!”

बारकूला अधिक अधिक भीति वाटू लागली. तो खूपच भेदरून जाऊन आईच्या गळयाला चिकटला. आई त्याचें सांत्वन करीत आणि त्याला धीर देत त्याच्या पाठीवर थोपटू लागली.

" आई, सुंद्रीची आजी ती हीच ग! सुंद्रीला ती घेऊन तर जाणार नाहीं? नको ग आई, सुंद्रीला ह्या कैदासणीच्या हवाली आपण करणार नाहीं? सुंद्रीला ती जिवें मारील......आई, सुंद्रीची ही थेरडी आजी मेली होती ना ग? मग ही फिरून इथं कशी आली ?" बारकू रडत रडत म्हणाला.

आई त्यावर कांहीं बोलली नाहीं. म्हातारी मात्र फार भ्यायल्या सारखी दिसूं लागली. आईनं बारकूला हृदयाशीं घट्ट कवटाळलें. म्हातारी हळूहळू अदृश्य होऊं लागली......

" भिऊं नको हो बाळ," कुणी तरी अज्ञात व्यक्ती म्हणाली. " ती म्हातारी नाहीं आतां तुला कांही करूं शकणार! भिऊं नको मुळीं सुद्धां—ऐकलेंस ना? "

कोण बोललें तें पाहावें म्हणून बारकू सगळीकडे पाहूं लागला. पण कुणी दिसेना......आई देखील दिसेना. " आई, आई, कुठं आहेस तूं ? मला सोडून जाऊं नको. आई, ए आई......" बारकू ओरडला—

" बारकू, ए बारकू—" सुंद्री त्याला हलवून जागा करीत म्हणाली—" काय रे झालें ? अशा हांका काय मारतोस ? तुला स्वप्न पडलें का ? झोपेंत रडतोस का ? ऊठ जागा हो. झालास का जागा ! "

बारकू जागा झाला—आपणांस नुसतें स्वप्नच पडलें. स्वप्नांतच नुसतें आईचें दर्शन झालें हें त्याला समजून आलें.

" सुंद्री, नुसतं स्वप्नच होतं का ग तें ?" तो निराश होऊन म्हणाला.

" कसलं स्वप्न ? काय म्हणतोस ?" ती म्हणाली—

" फार गोड स्वप्न होतं ग सुंद्री. आई दिसली मला स्वप्नांत. तिनं माझ्या पाठीवरून हात फिरवला. मला उराशीं धरलं. "बाळा" अशी गोड हांक मारली.

अतिशय गोड स्वप्न होतं तें......पण जितकं सुंदर तितकंच भयंकर दृष्यही मी त्या स्वप्नांत पाहिलं ..."

"गोड आणि भयंकर ! जागा झाला आहेस ना तूं नीट ?" सुंद्रीनें त्याला गद् गद् हलवून म्हटलें

"हो, आई दिसली त्यांत म्हणून गोड स्वप्न. पण सुंद्री, काय सांगूं, तुझी ती भयंकर थेरडी आजी देखील मीं त्या स्वप्नांत पाहिली......"

"काय आजी......!" सुंद्री भिऊन किंचाळली—"चारकू, तुझं तें स्वप्न मला कृपा करून आतां सांगूं नको रे. मला फार भीति वाटते आतां! .."

"अग नुसतं स्वप्न तें. त्यांत कसली भितेस ! .....बरं बरं. नाहीं हो त्या गोष्टी सांगत आतां—नीज नीज तूं गप्प अंगावर घेऊन. हें बघ मी आहे तुझ्या जवळच बसलेला."

चारकूनें असें म्हणून तिच्या अंगावर घातलें आणि पाठीवर हातानें हळू हळू थोपटीत तो जरा वेळ तिच्या शेजारीं बसून राहिला. नंतर जरा वेळ त्याप्रमाणें थोपटून झाल्यावर तिला झोप लागली असें पाहून तोही तिच्या शेजारीं पुन्हा लवंडला व त्यालाही जरा वेळानें पुन्हा झोपेनें घेरलें

★

## प्रकरण ६ वें

# "भीमजी हाडवैद–जुना अने जाणिता"

चारकूला पहाटेस नेहमीप्रमाणेंच लौकर जाग आली. सुंद्रीही त्याच्या-बरोबरच जागी झाली. चारकूनें तिला नळावर नेऊन हळुहळू तिचें सर्वांग ओल्या-कापडानें पुसून काढलें.

" इतकी सुंदर पोर तूं, नि अंगावर हें मळाचे काळे काळे डाग ! आतां बघ कशी लख्ख दिसायला लागलीस." एकीकडे तिला पुसून स्वच्छ करीत तो तिला खुलवीत होता. सुंद्रीलाही त्या नंतर बरेंच अंग हलकें वाटूं लागलें. 'पेपर' आणायला बाहेर पडतांना त्यानें सकाळच्या चहा रोटी पुरते पैसे तिच्या स्वाधीन करून तो बाहेर पडला. जातांना पेटंट रेस्टॉरंट मधील बारवाल्या पोराला भेटून सात साडे सातला चायू आणि डबल रोटी सुंद्रीला न चुकतां नेऊन देण्यास त्यानें त्याला बजावून सांगितलें.

आज रोजच्या पेक्षां जास्त फिरून अधिक पत्रं खपवायचीं असा त्यानें निश्चय केला होता. आणखीही कित्येक कामें त्याला करावयाचीं होतीं. पायधुणीला जुना भीमजी होता त्याची जाऊन भेट घ्यायची होती. " जामे जमशेद " हें पत्र जुना भीमजी रोज त्याच्याकडूनच विकत घेई, भेंडी बाजारांतून पायधुणीकडे जाऊन "जामे जमशेद" जुन्या भिमजी पुढें टाकून १९ नंबरच्या ट्रामच्या रस्त्यानें नळ बाजाराकडून गोल देवळाच्या बाजूला पत्रं विकीत यावयाचें हा त्याचा रोजचा मार्गच होता—पण आज जुन्या भीमजीला विचारून सुंद्रीच्या पाठीविषयीं एकदांचा सोक्ष मोक्ष करून टाकायचाच असें त्यानें ठरवलें होतें.

" जामे जमशेद " त्यानें जुन्या भीमजी पुढें टाकला. त्यानें तो नेहमीप्रमाणें चाळून बघायला सुरवात केली. अंकाचे पैसे अगाऊच चुकते केले असल्यामुळें बराच वेळ त्याचें तिथेंच गुटमळत असलेल्या बारकूकडे लक्ष गेलें नाहीं. " जामे जमशेद " सर्व बाजूंनीं चाळून झाल्यावर त्यानें वर दृष्टि केली तों वर्तमानपत्राचा गठ्ठा हातांत घेऊन बारकू अजून उभा आहे असें त्याला दिसलें. आपण पैसे द्यायला विसरलों असें त्याला वाटलें म्हणून त्यानें खिशांत हात घातला व म्हटलें— ' पैसा कसा दिला नायू ? थांब हा बाबा, आतां देते—"

" पैसे दिले शेठ तुम्ही पेपरचे—" बारकू म्हणाला.

" मग कशाला उभा ऱ्हाने ? " त्यानें विचारलें.

" एक विचारायचं होतं शेठ—"

"इच्यारायचं ? काय इच्यारायचं ? इच्यार ना काय तें ? मूंग कसाला गिळते ?"

"एक छोकरी आहे शेठ—" बारकू सांगूं लागला—"आज तिची आजी मेली. तिनं त्या छोकरीला बेदम् मार मारून तिची पाठ दुखावली. पाठीचा हाडं मोडीपर्यंत तिनं त्या छोकरीला मारलं बघा—"

"काय सांगते ?" भीमजी ओरडला—"असी आजी कवा कुणाला न्हाते काय ? तूं सुद्मंदी बोलते का नाय् ? असी आजी असेल तर तेला मंग पोलीसामंदी कसाला नाय् दिला ?"

"मेली शेठ ती थेरडी आजच—" बारकू हुरूप येऊन म्हणाला. शेठजीला सुंद्रीविषयीं दया आली आहे हें त्यानें तेव्हांच ओळखलें.

"त्या पोरीला मीं फोरास रोडच्या धर्मशाळेंतून बघा उचलून आणली. कुणी देखील नाही हो तिला. अन् पाठीमुळं उठतां येत नाहीं कीं बसतां येत नाहीं अशी दशा झालीय् बिचारीची—मला एकद्म तुमची आठवण झाली शेठ. इतक्या लोकांचीं हांड तुम्ही सांधून देता ! ह्या गरीब पोरीला बरी करा ना शेठ. त्याच्यासाठीं मी पैसे सांठवून तुम्हांला देइन बघा. पण नाहीं नका म्हणूं—"

"आधीं ते पोरगी कुठं हाये तें सांग ? तिला कवा आणेल ? लई दूर असली तर कसा आणेल ?"

"सांभाळून आणीन शेठ—" बारकू म्हणाला—"तुम्ही नुसतं पैसे किती सांठवूं तें सांगा. तेवढे पैसे सांठले की तिला मी असा अलगद् उचलून आणीन पाहा."

"अरे पैसा पैसा कसाला म्हनते ? मला का तूं ज्यानवर समजते ? पैसा बिसा काय नको. गरीबाला मी फोकट मंदी विलाज करते आं बाबा. आंधी आतां जाउनश्यान् तेला जल्दी इकडं आण, नायतर पोरगी मरेल बिरेल—"

"पण शेठ—"

"आतां वार्ता नको करूं—" भीमजी म्हणाला. "जा, आधी तिला घेऊन ये. उचलून नको आणूं. हे गाडीला रुपाया घे जा. गाडी मंदी घालूनश्यानू घेऊन ये."

जुना भीमजी हें सारें सांगत असतां बारकूचा आनंद गगनांत मावेना. प्रेमळ भीमजीचे कसे आभार मानावेत हेंच त्याला कळेना.

"रूपिया नको शेठ—" बारकू म्हणाला— "हीं माझीं वर्तमानपत्रें इथें ठेवा, मी आतां तिला अलगद उचलून आणतों. फार लांबून नाहीं आणायची. इथं तीं आहे कुंभारवाड्यांत. गाडींत घालून आणली तर हिसके बसून तिची पाठ दुखेल."

"बरं बर जा. तसा कर."

वर्तमानपत्रांचा गठ्ठा तिथंच टाकून बारकू उड्या मारीतच निघाला. सुंद्री आतां नक्कीच बरी होणार ह्या कल्पनेनें तो नुसता हुरळून गेला. कुंभारवाड्यांत तो सुंद्रीपाशीं येऊन पोंचला तेव्हां सुंद्री चहागेटी येऊन उगीच पडून राहिली होती. बारकूला लौकर आलेला पाहून तिला बरेंच नवल वाटलें. कारण जातांना आपण जवळजवळ एकवाजेपर्यंत येणार नाहीं असं तो तिला सांगून गेला होता.

"काय रे बारकू असा घाईघाईनें मध्येंच का आलास? किती दम लागला आहे तुला. पळत आलास वाटतें?" सुंद्री म्हणाली

"सुंद्रे, आज तुझं नशीच जोरावर आहे हें सांगायला मी आलों आहें. तुझी पाठ आजच नीट करून द्यायला भीमजी तयार आहे. चल, चल, तावडतोब त्यानं तुला आणायला सांगितलं आहे."

"काय? आजच जुना भीमजी माझी पाठ नीट करणार?" सुंद्री हर्षातिशयानें ओरडली. "पण बारकू, तूं तर तो पैसे घेतो म्हणून म्हणत होतास? त्याला द्यायला पैसे कोठून आणलेस? एकदम तुला कुठले पैसे मिळाले?"

"पैसे नाहीं मिळाले मला सुंद्रे कुठून—" बारकू मानेखालीं हळूच हात घालून तिला वर उचलीत म्हणाला. ' जुना भीमजी लोकांपासून पैसे घेऊन त्यांचीं मोडलेलीं हाडें सांधून देतो हें खरें आहे. पण ज्यांच्याजवळ पैसे असतील त्यांच्या-कडूनच तो पैसे घेतो. गरीबांना फुकट इलाज करतो जुना भीमजी नांवाचा ' जुना अने जाणिता ' म्हणून प्रसिद्ध आहे तो उगीच नाहीं ! त्यानें तुझं दुःख जाणलं हो सुंद्री ! ताबडतोब त्या मुलीला घेऊन ये म्हणून तो मला म्हणाला. "

सुंद्रीला अलगद उचलून तो पायधुणीच्या रोखानें चालूं लागला.

" बारकू, हें सारं खरं आहे का ? खरं आहे असं अजून मला वाटत नाहीं. अजून वाटतं की हें एक स्वप्नच मला पडत आहे. खरंच का मी बरी होणार ? मला स्वतः उठून बसतां येईल का ? हिंडतां फिरतां येईल का ? खरंच का मी पळूं देखील शकेन ? "

" होय-होय-होय—! " बारकू हुरळून म्हणत होता. " तूं खरीच बरी होणार, उठून बसणार, पुन्हा चालूं शकणार आणि पळूं देखील लागणार ! "

" मला इतका आनंद झालाय रे बारकू की काय बोलूं नि काय नाहीं असें झालें आहे ! "

" मला देखील खूप खूप आनंद झालाय् हो सुंद्री. केव्हां तूं बरी होशील असें मला झालें आहे."

त्या दोन मुलांना आपल्याकडे येतांना पाहून जुना भीमजी अधिकच गंहिवरला. त्यानें व त्याच्या मदतनिसानें सुंद्रीला उतरून घेतलें आणि वेळ न दवडता तिची तपासणी करण्याच्या उद्योगाला तीं दोघें लागलीं. त्यांनीं समोरून आंतल्या बाजूच्या पार्टिशन घातलेल्या खोलींत गेलें. बारकू मात्र धडधडत्या अंतःकरणानें पुढच्याच भागीं बांकावर बसून राहिला व पुढें काय होतें तें पाहूं लागला.

सुमारे अर्धा तासपर्यंत जुना भीमजी आणि त्याचा तो साथीदार सुंद्रीला घेऊन आंत काय करीत होतें तें बारकूला कळायला कांहींच मार्ग नव्हता. उत्कंठे-मुळें तो अर्धा तास त्याला अर्ध्या वर्षासारखा दीर्घ वाटला. आंतून कुठला

आवाजही येईना. सुंद्रीचें कण्हणें अथवा रडणें ऐकूं येतें का म्हणून त्यानें कितीदां तरी कानोसा घेऊन पाहिला. पण कांहीं नाहीं. सारें शांत !

शेवटीं एकदाचा जुना भीमजी हसत हसत बाहेर आला....

" होईल ना पाठ नीट ? फारच हड्डी बाहेर नाहीं ना गेली ? "

बारकूनें उत्कंठेनें विचारलें.

" बरी होईल नाय तर काय होईल ?" प्रेमळ भीमजी हसत हसत म्हणाला—" हे भीमजी हाये भीमजी. जुना अने जाणिता ! ते हाड तर जुळवला ची ! "

'आं' वासून बारकू बघतच राहिला....

हाड जुळवलं ? अन् तें जुळवतांना सुंद्री कण्हली सुद्धां नाहीं ! भीमजीचा हात लोण्याचा तर नाहीं ना ? असेंच त्याला वाटलें असावें.

" अरे बघते काय असा ? सारा काम झ्याला पन ! तेला बगून घेयाचा तर जा बघ. अन् आपल्या कामाला, लाग जा; आंतमंदीं जायचं तर—"

" शेठ, सगळं हाड जुळलं देसील ? घेऊन जाऊं का मी तिला आतां परत ? "

" अरे काय दिवाना झ्याला का काय ? आतांच कसा नेल तूं तिला ? हाड जुळवला पर आतां तिला धा रोज हितच निजून र्‍हायला पायजेल—"

" दहा दिवस ? "

" मंग ? तें जुळलेला हाड मिळून तर गेला पाहिजे ना ? तेला आतां तूं बगून आपल्या कामाला जा. आतां काय धास्ती नाय् आं बाबा ! "

" पण शेठ, तुम्हीं का दहा दिवस तिला इथंच ठेऊन घेणार आहां ? "

" अरे र्‍हावा दे नी बाबा धा रोजांनीं घेऊन जा. आतां खाली बगून जा; लई वार्ता नग करूं आं···गिर्‍हाईकांचा टाईम हाय् ! "

बारकू आंतल्या भागांत भीत भीत गेला. सुंद्री जणूं गाढ झोपेंत असल्या-प्रमाणें पडलेली त्याला दिसली. क्लोरोफॉर्मचा उग्र दर्प तिच्या जवळून येत होता.

" ही तर झोपली आहे ! " बारकू आश्चर्यानें म्हणाला. पाठीचं हाड सांधलं जात असतां सुंद्रीला झोप लागावी याचें त्याला आश्चर्य वाटलें.

" निजूं दे—निजूं दे तिला—" भिमजीचा तो सहाय्यक म्हणाला "आतांच नाहीं ती उठायची. "

बारकू हळूच मागें आला. सुंद्रीला उठवूं नये ही सूचना त्यालाही सयुक्तिक वाटली असावी. तो समोरच्या भागीं आला. भीमजीकडे त्यानें अतिशय आभारी नजरेनें पाहून म्हटलें,

" मी लौकरच परत येतों शेठ. सुंद्री तंवर उठेल ना पण ? आतां कांहीं धोका तर नाहीं ना शेठ ? "

" अरे कांहीं नाहीं. आतां तूं खुशाल जावा—तुझं काम करून मग परत ये. तंवर ती जागी होऊन जाईल. "

'पेपर'चा जुडगा घेऊन बारकू बाहेर पडला. पण सुंद्रीला झोप कसली लागली याचा कांहीं त्याला अर्थबोध होईना. त्या विषयींच विचार करीत तो आपला उगीच रेंगाळत चालला....

★

## प्रकरण ७ वें

# पाठ तर नीट झाली !

पेपरचा गठ्ठा काखोटीस मारून बारकू पायधुणी सोडून निघाला खरा—पण रोजच्याप्रमाणें तो विकण्याकडे त्याचें लक्षच लागेना असें दिसलें. सारखे सुंद्रीचेच

विचार त्याच्या मनांत येत राहिले, सुंद्रीच्या नशीबानें पैशांची अडचण आलीच नाहीं. जुना भीमजी तिच्या पाठीवर फुकटांतच इलाज करायला तयार झाला. त्यानं आज इलाज करायचा तो करून तिचं तें मोडकं हाड जुळवलं देखील. आतां त्याच्या सांगण्याप्रमाणें सुंद्री दहा दिवस नुसती पडून राहिली कीं तें हाड पक्कें होणार! मग सुंद्री उठूं शकेल, बसूं शकेल, हिंडूं फिरूं शकेल. मजाच मजा! ...

पण बारकूला एकाच गोष्टीचं नवल वाटत होतें. हाड दुरुस्त केलें जात असतां सुंद्री जरा सुद्धां रडली नव्हती ......कण्हली सुद्धां नव्हती. ती त्या वेळीं जरा जरी रडली अगर कण्हली असती तरी बारकूला तें ऐकूं गेलें असतें इतक्या जवळ तो त्यावेळी होता. सुंद्रीच्या नि त्याच्यामध्यें एक लांकडी 'पार्टिशन' मात्र होतें. तेव्हां सारें कांहीं ऐकूं यायला कांहीं हरकत नव्हती. सरकलेलें हाड व्यवस्थित बसवायचें म्हणजे तें हालवूनच बसवावें लागणार आणि भीमजी 'जुना अने जाणिता' असला तरी त्याचाही हात कांहीं लोण्याचा नव्हता...

मग...?

सुंद्रीनें हूं की चूं केलें नाहीं हें कसें?

सुंद्री कण्हली वगैरे तर नाहींच उलट हाड बसवून झाल्याबरोबर बारकूनें तिला पाहिली ती देखील गाढ झोपलेली! बारकूला तें तर अगदींच असंभाव्य व चमत्कारीक वाटलें...

खूप वेळ बारकूनें ह्या चमत्कारीक गोष्टीची कारणपरंपरा शोधण्याचा प्रयत्न केल्यावर त्याची बुद्धी काम देत नाहीं असें पाहिल्यावर आपल्या शंकाळू मनाचें समाधान करीत तो म्हणाला—

"कांहीं का असेना, कुठून तरी ती सुधरणार हें का थोडें झालें! आणखी दहा दिवसांनीं ती उठूं शकेल, हिंडूं फिरूं शकेल हीच केव्हढी मोठी गोष्ट आहे! जुना भीमजी होता म्हणूनच ही गोष्ट शक्य झाली. बिचारा दयाळू! म्हणून तर पैसे न घेतां उपचार करायला तयार झाला. नाहीं तर सुंद्रीला आणखी कित्येक दिवस खितपत पडावें लागलें असतें. जुन्या भीमजीनें तो प्रसंग येऊं दिला नाहीं..."

दहा दिवसांनीं तिला उठायची परवानगी...

पण दहा दिवस झाले तरी आपण तिला अधीक फिरूं देणार नाहीं असें बारकु मनाशींच विचार करीत ठरवूं लागला. सुरुवातीस थोडेंच फिरलेलें बरें. नवीन दुरुस्त झालेलें हाड कुठें जोराचा धक्का बसला तर पुन्हा सरकायचें ! अन् रस्त्यांत तर केळीची साल आहे, इतर कांहीं केरकचरा आहे; चिखल आहे! पाय घसरला तर ! . तें कांहीं नाही आपण नाहींच तिला फार फिरूं देणार. फिरणं हें तोंडचं थोडंच आहे. त्याला ताकद हवी. आपण सुंद्रीला चक्क बजावून ठेवणार, " सुंद्रे—चांगली ताकद आल्याशिवाय नाहीं हो फार फिरायचें. ताकद येऊं दे नि मग तूं हवी तितकी फिर ! "

सुंद्रीला ताकद आणायची म्हणजे तिला ताकद येणारें खाण्याचें मिळालें पाहिजे...

बारकू स्वतःशींच त्या बाबीचा सांगोपांग विचार करीत म्हणाला—आपण घालूं की तिला खाऊं ! खूप खूप पत्रं विकूं आपण नि तिला खाऊं घालूं. स्वतः आपण फार थोडं खाऊं पण तिला कमी पडूं देणार नाहीं. आपण तिलाच " खा—खा " म्हणूं लागलों तर ती कदाचीत् आपणांस म्हणेल— " हें रे काय बारकू, मलाच काय खा खा म्हणतोस—! स्वतः मात्र थोडं खातो नि मला अधीक खाण्याचा आग्रह करतो ! तें कांहीं नाहीं तूं खाशील तेव्हढंच मी खाईन. तूं खाशील तेंच मी खाईन..." पण सुंद्री तशी म्हणाली तरी आपण त्या बाबतींत मात्र तिचें बिलकूल चालूं देणार नाहीं. तिला ह्या बाबतीत आपण वेळ पडल्यास रागें देखील भरूं "मी नाहीं हो तुझ्यासारखा अशक्त. माझी कांहीं पाठ मोडली नव्हती. तुला जर नीट धट्टें खट्टें व्हायचें असेल तर असा हट्ट करून चालणार नाहीं. चैन म्हणून नाहीं हें खायचं. औषध म्हणून खा. हं...चल आटप ! "

सुंद्रीसाठीं आपणांस कितीही काम करावें लागलें तरी आपण तें करूं. वर्तमानपत्रांचे जुडगेच्या जुडगे खपवूं. सिनेमांत खारी शेंग विकण्याचें काम शोधूं.

दुसरेंही कांहीं करतां आलें तर करूं. पण सुंद्रीला आपण कांहींच कमी पडूं देणार नाहीं..."

विचार करतां करतां बारकू एकदम भानावर आला. आपण नुसतीं मनाचीं मनोराज्येंच करीत आहोंत हें त्याच्या एकदम लक्षांत आलें. अजून किती तरी पत्रं खपवायचीं शिल्लक होतीं. हातांत शिल्लक राहिलेला जुडगा कांहीं अशीं नुसतीं मनोराज्यें करून संपणार नव्हता. अन् हीं पत्रं विकलीं नाहींत तर मग कुठलीं तीं मनोराज्यें सत्य सृष्टींत उतरणार !...भानावर येऊन त्यानें एकवार शोधक दृष्टीनें आजूबाजूला निरीक्षण केलें आणि डाव्या हातानें वर्तमानपत्रांचा जुडगा सावरून धरीत उजव्या हाताचा पंजा कानशिलीवर ठेवून वर्तमानपत्रांत नसलेल्या बातम्या ओरडून सांगायला त्यानें सुरुवात केली—

"पायधुणीवर माणुसकी मेली नाहीं !"

"पोरक्या पोरीची पाठ दुरुस्त झाली !!"

"ताजी खबर ! एक आणा !! दोन आणे !!!"

बारकू ओरडूं लागला कीं गिऱ्हाईक नेहमींच तुटून पडे. भराभर गिऱ्हाईक मिळूं लागलें. उर्दू पत्रें तर हां हां म्हणतां खपलीं.

गोल देवळापासून प्रार्थना समाजाच्या दिशेनें मराठीचा प्रांत सुरू झाला. पूर्ववत् एका हातानें 'पेपर' चा गठ्ठा सावरीत आणि दुसऱ्या हातानें कानावर हात ठेवीत उंच स्वरानें त्यानें ओरडायला सुरुवात केली बातम्या अर्थातच 'पेपर' मध्यें नसलेल्या !......

"माधव बागेतील भयंकर अत्याचार !"

"आठ वर्षांच्या मुलाच्या सर्वांगावर फोड आणणारी आजी !!"

"नातीची लाथेनें कंबर मोडली !!!"

"एक आणा ! दोन आणे !!"

एकच्या सुमारास त्याचीं सारीं पत्रें खपून गेलीं. पत्रें खपवून नेहमीप्रमाणें गोल देवळाच्या पायरीवर बसून त्यानें खुर्चाचा हिशेब केला आणि सुंद्रीला बघायला तो पायधुणीच्या रोखानें निघाला.

उठली असेल का सुंद्री ? आपणांस पाहून ती काय म्हणेल ? पाठ जरा सुद्धां दुखत नाहीं म्हणून सांगेल का ? कीं अजून थोडी थोडी दुखते म्हणून म्हणेल ? कदाचित "थांब हां बारकू, तुला मी आतां जरा चालूनच दाखवतें !" असेंही म्हणण्याचा संभव आहे—पण तिला दहा दिवस पडूनच राहायचें म्हणून भीमजी म्हणाला. तिलाही त्यानें तें सांगितलें असेल का ?

......सुंद्रीचें हाड नीट होत असतां ती जरा सुद्धां कशी रडली नाहीं ? कदाचित सुंद्रीच ह्या शंकेचें निरसन करील. काय सांगेल बरं ती ?

आतां ती जागी झाली असेलच. एक वाजलाच की......एक वाजून गेला. तिला भूक देखील लागली असेल. जेवण घेऊन जावें का ? पण तिला काय हवें काय नको तें कसें समजणार ?.. ...तिथं गेलों म्हणजे "काय मागवूं ?" विचारावें आणि ती सांगेल ते पदार्थ मागवावेत म्हणजे झालें......

वरीलप्रमाणें विचार करीतच बारकू पायधुणीला पोंचला. जुना भीमजी दुपारचें जेवण वगैरे घ्यायला घरीं गेला होता. त्याचा तो मदतनीस मात्र होता. सुंद्री जागी झाल्याचें त्यानें बारकूला तो तेथें येतांक्षणींच सांगितलें. आणि जेथें सुंद्री निजली होती ती जागाही दाखवली व बारकू तिकडे गेल्यावर तो परत समोरच्या भागाला येऊन बसला.

बारक दबकत दबकत पण अतिशय उत्कंठेनें पुढें गेला. बारकूला पाहातांच सुंद्रीच्या मुखावर आनंद झळकला. ती बोलली मात्र कांहींच नाहीं.

"झालीस का जागी ?" बारकूनें विचारलें सुंद्री नुसती हसली.

"झाली ना तुझी पाठ नीट !" बारकू पुढें म्हणाला. "जुना भीमजी असल्यावर मग काय पाहिजे ? काय लौकर त्यानं हाड जुळवलं देखील ! आतां

फक्त दहा दिवस पडून राहिले की तुला हिंडतां फिरतां येणार ! मग काय मजाच मजा... ... ! ! "

सुंद्री पुन्हा एकदां नुसती हसली ! पण तिच्या डोळ्याकडे बघणारांस मात्र त्यांत संशयाचीं अभ्रें तरंगत असावींत असें दिसलें. कसला संशय सुंद्रीला त्रस्त करीत होता ?

" सुंद्री, मला इतका आनंद झालाय् की सांगतां येत नाहीं ! " बारकू म्हणत होता—" तूं आतां खरोखर दुरुस्त झालीस ! तूं आतां उठून बसूं शकशील, चालूं शकशील, पळूं देखील शकशील ! ....पण हें ग काय ? सुंद्री, तूं अशी गप्प का ? बोलत का नाहींस ? "

" बारकू, हें सारं खरं खरं आहे की नुसतं स्वप्न आहे ह्याचा मी विचार करीत आहें......"

सुंद्री म्हणाली.

" वेडी रे वेडी ! भीमजी शेठनं नीट केलं तरी कुठली ही शंका ?......" पण लगेच बारकूच त्यानंतर साशंक होत्साता पुढें म्हणाला—" पण सुंद्री, तुझी पाठ अजून दुखत तर नाहींना ? तूं अशी मुक्यासारखी राहून कुठला विचार करतेस ? शंका कां घेतेस ? तुला आराम वाटत नाहीं का जरा सुद्धां ? "

" आराम आहे रे बारकू—" सुंद्री म्हणाली—" पाठ तर मुळीच दुखत नाहीं बघ. खरं सांगूं, मला दुखरी पाठ होती असें सुद्धां वाटत नाही...... "

" पाठ आहे असं सुद्धां वाटत नाहीं ? असं कसं झालं बुवा ? " बारकूनें आश्चर्यानेंच विचारलें.

" कुणाला माहीत । " सुंद्री म्हणाली " सकाळीं आपण इथं आलों तेव्हां पाठ ठणकत होती. त्यानंतर भीमजीनें मला आंत नेलं, तूं बाहेर बसलास, आंत नेल्यावर मला वाटलं हाड सरकवून बसवतांना आतां माझी पाठ चांगलीच दुखणार म्हणून. पण तसं मुळींच घडलं नाहीं... . "

म. ग्र. सं. ठाणे.
क्र. ........ दि. ५१........

## पाठ तर नीट झाली !

"जरा सुद्धां दुखली नाहीं पाठ तुझी ?"

"भीमजीनं माझ्या पाठीला हात लावल्याचं मला तरी आठवत नाहीं !" सुंद्री सांगू लागली बारकू आश्चर्यानें आं वासून ऐकूं लागला.

"माझ्याशी ते अतिशय प्रमानें बोलला रे बारकू" सुंद्री पुढें म्हणाली—

"भिऊं नको आं पोरी—" भीमजी म्हणाला आणि त्याच्या सोबत्यानें एक पांढऱ्या सफेद् रंगाच्या जाळीदार कापडाची वाटी माझ्या नाकावर ठेवली !

"कापडाची वाटी !" बारकूनें मध्येंच विचारलें.

"टोपी म्हण हवें तर" सुंद्री म्हणाली, "एक कापडी टोपी त्यानें माझ्या नाकावर ठेवली आणि त्याच्यावर कसलेसें पातळ पातळ औषध टाकायला सुरुवात केली. मला त्याचा भपकारा असह्य झाला. मी "नको" म्हणून म्हणाल्याचें मला आठवतें. पण तदनंतर काय झालं कुणास माहीत—मला एकदम खूप खूप झोंप येऊं लागली. आपोआप डोळे बंद होऊं लागले. आणि मी झोंपीं गेल्यें ... "

"मीं पाहिलं तुला झोपलेलं" बारकू म्हणाला, "मला नवल वाटलं, मला वाटलं तूं रडशील, कण्हशील तरी. पण तसं झालं नाहीं . कांहीं का असेना; पाठ तर नीट झाली !"

बारकू हें म्हणाला खरें, पण पाठीचें हाड दुरुस्त करण्यासाठीं नाकांत औषध घालणारा जुना भीमजी त्याला चमत्कारीकच वाटला.

"एव्हढ्यांतच मी जागी झाल्यें. मी झोपेंत होत्यें तेव्हांच भीमजीनं माझं हाड सांधून घेतलं. माझी पाठ नीट झाली असं तो म्हणतो. पण मला दहा दिवस निजू-नच राहायचं म्हणून सांगतो ... "

"त्याचंच बरोबर आहे हो सुंद्री. हाड जडून पक्कं जुळून गेलं पाहिजे. तुला पडूनच राहिलं पाहिजे. मी तुला जेवायला वगैरे इथेंच आणून चारीन काय आणूं तें सांग म्हणजे घेऊन येतों"

"पण बारकू, मला अजून खावंसं वाटत नाहीं. अजून त्या औषधाचा वास नाकांत भरला आहे असा भास होतो. नि संध्याकाळपर्यंत तूं कांहीं खाऊं नाहींस तरी चालेल असं भीमजीचा तो माणूसही इतक्यांत मला सांगून गेला आहे. बरं जर लौकर व्हायचं तर त्याचं ऐकायला पाहिजे, नाहीं का ?"

"लौकर बरं व्हायचं तर त्याचं ऐकलंच पाहिजे" बारकूनें साथ देत म्हटलें. "तो सांगतो तें केवळ तूं लौकर बरी व्हावीस म्हणूनच सांगतो. त्यांत तुझंच हीत आहे......"

"मग मी नाहीं आतांच जेवणार. माझ्यासाठीं तूं नको उपाशीं बसूं अं संध्याकाळ पर्यंत. जा, कांहीं खाऊन घे जा. तुला भूक लागली असेल आतां"

इतकें म्हणून सुंद्रीनें पुन्हा डोळे झाकले.

तिनें डोळे झाकल्यावर बारकू जरा वेळच तिथें रेंगाळला नंतर हळूच पाय न वाजवतां तो तेथून बाहेर पडला .....

★

## प्रकरण ८ वें

# बाबा पंखेवाला काम देणार ?

दिवसांमागून दिवस जात होते. सुंद्री छान सुधारत होती. तिला बसतां उठतां येऊं लागलें. आठव्या दिवसापर्यंत तर हातांत काठी घेऊन ती दुकानांतल्या दुकानांत हिंडूं फिरूंही लागली. तें पाहून बारकूचा आनंद गगनांत मावेना !

सुंद्रीच्या प्रकृतींत सुधारणा पाहून बारकूचा उत्साह द्विगुणीत होत होता. त्यानें सुंद्रीसाठीं पैसे सांठविण्याचा चंगच बांधला होता. जुडगींच्या जुडगीं पत्रें खरेदी करून तो ती विकी. गोल देवळा पाशींच निशांत टॉकीज म्हणून एक सिनेमा

थियटर आहे त्यांत रात्रींच्या शेवटच्या खेळाच्या आरंभीं आणि मध्यंतरांत खारीं शेंग विकण्याचें काम देखील त्यानें मिळवलें होतें. आणि ह्या कामाचे सबंध पांच रुपये त्याला महिन्याचे शेवटीं मिळणार होतें.

पांच रुपये !

महिन्याला पांच रुपये म्हणजे बारकूच्या दृष्टीनें किती तरी पैसे होते. ह्या पांच रुपयांत सुंद्रीसाठीं किती तरी करतां येईल असें त्याला वाटलें.

हें काम लागल्यावर किती हुरुपानें त्यानें ती बातमी सुंद्रीला येऊन सांगितली !

" सुंद्री, पांच रुपये पगार ! आणि वरती रोज म्हटलं तरी आपल्या दोघांनाही सिनेमा फुकट !! " तो म्हणाला होता...

सिनेमा...

सुंद्रीनें अजून चालतीं बोलतीं चित्रें पाहिलीं नव्हतीं. तिची आजी तिला कांहीं दाखविल तेव्हांना ! सिनेमाचीं अनेक थियटरें तिनें केवळ बाहेरून मात्र पाहिलीं होतीं. आंत काय असतें ह्याची बिचारीला कल्पनाही नव्हती...

एखादे दिवशीं माधव बागेंत कमी भिक्षा मिळाली असें सुंद्रीच्या आजीला वाटलें कीं ती मग रात्रीचे वेळीं सुंद्रीला घेऊन प्रेहाऊसच्या नाक्यावरच्या सिनेमा थियटरासमोर भीक मागण्याची 'जादा डयूटी' करीत असे. सुंद्री दिवस भरांच्या ओरडण्यानें गळून गेलेली असे. कुठें तरी थंड फरशीवर अंग टाकायला मिळालें तरी बरें होईल असें तिला वाटे. पण तिच्या आजीची दृष्टि मात्र निराळी असे. सुंद्रीच्या हाल अपेष्टांकडे ती कधींच लक्ष देत नसे. एकदां भीक मागूं लागली कीं तिला मग वेळचें वगैरे भान राहात नसे. तिला जणूं कैफ चढत असे. बिचाऱ्या सुंद्रीचे मात्र हाल...

किती माणसें त्या सिनेथियटरांत सिनेमा पाहण्यासाठीं जात. बिचारे ाची मुंबई करीत ! पण सुंद्रीचें भाग्य......! सुंद्रीला त्या साऱ्या लोकांचा

खूप हेवा वाटे—सारी दुनिया मजेंत खाते पिते, आपल्या वयाचीं मुलें हसतात खेळतात...पण आपण ..आपण रात्रंदिवस ह्या थेरड्या आजीच्या करड्या नजरे-खालीं भीकच मागायची ! का ? .....का ? आपणाला रोजची हक्काची विश्रांति देखील का नाहीं ? हें तिचे विचार मनांतल्या मनांतच अर्थात् धुमसत असत. बाहेर मात्र ब्र शब्द काढायची चोरी .........‥सारा संताप गिळायचा नि त्या आपणाला छळणाऱ्या थेरडीला पैसे मिळावेत म्हणून आपली मुळींसुद्धां दखल न घेणाऱ्या उद्दाम लोकांपुढें केविलवाणें तोंड करून हात पसरायचा !...... देवानें सारें दैव अनुकूल दिलेलीं ती माणसें देखील जणूं तिच्या मुळावर आलेलीं. कुणी रागाचे कटाक्ष टाकीत, कुणी शिव्या देत, कुणी हिडीस फिडीस करीत तर कुणी मुद्दाम दुर्लक्ष करून पाठ दाखवून निघून जात......

...सिनेमाच्या दारांत आणखीहि कित्येक जण भीक मागत. आल्फ्रेड टॉकीजच्या तिकीट ऑफीस जवळचा एक म्हातारा एका लहान मुलीला पाठीवर बांधून भिक्षा मागतांना सुंद्रीनें पुष्कळदां पाहिला होता.

"बच्चोंको भूक लगी है !"

हें त्याचें पालुपद. "भुकी बच्ची" मधून मधून रडावी म्हणून तो त्या पाठीशीं बांधलेल्या मुलीच्या ढुंगणाला चिमटे काढीत असे—'आपल्याप्रमाणें भीक मागणाऱ्या सर्वच मुलांच्या नशिबांत हे हाल आहेत का ?' सुंद्री मनांतून स्वतःच्या भाग्याला शिव्या शाप देत म्हणे...

...सिनेमा विषयक सुंद्रीचे असलेच अनुभव होते.

पण बारकू तिला अशा हाल अपेष्टा सहन करायला नव्हे, तर थिएटरांत आंत जाऊन खरी चालती बोलती चित्रें बघायला घेऊन जाणार होता. म्हणूनच सुंद्रीच्या आनंदाला पारावार उरला नाहीं. ती एकदम हुरळून जाऊन म्हणाली.

"खरंच का रे तूं मला सिनेमा आंत नेऊन दाखवणार आहेस ? केव्हां दाखवशील ?"

" आणखी दोन दिवसांनीं तूं हिंडूं फिरूं लागलीस कीं रोज हवा तर दाखवीन. " बारकू म्हणाला.

" काय रोज ? " सुंद्री ओरडली !

" हो हो रोज ! " बारकू पुढें म्हणाला—" तूं मला काय समजली आहेस !"

*   *   *   *

तें दोन दिवसही हां हां म्हणतां निघून गेलें.—सुंद्री पायधुनी वरून कुंभार वाड्यांतल्या त्या जिन्याखालीं आलीं. तिला आतां उठतां येऊं लागलें. चालतां येऊं लागलें. पण एकदम फार चालायचें नाहीं अन् फार वेळ बसायचें देखील नाहीं असें भीमर्जानें सुंद्रीला निरोप देतांना बजावलें होतें. बारकू त्या सूचनेकडे कडकपणें लक्ष देत होता.

सुंद्रीच्या अंगावरचे कपडें अगदीं विरून गेले होते. बारकूला तें कपडे अगदी बघवत नव्हतें. लौकरच तिला नवीन कपडे घ्यायचे असें त्यानें ठरवूनही टाकलें. सुंद्रीला त्यानें तो विचार कळवला तेव्हां तिला कोण आनंद झाला ! कपडें आणि तेही एकदम नवीन ! तिला अस्मान ठेंगणें वाटूं लागलें.

बारकूच्या आईनें शिवलेल्या त्या गोधडीला किती तरी रंगीबेरंगी ठिगळें लावलीं होतीं. त्यांतच एक लाल रंगाचें कापड असून त्यावर निळ्या रंगाचीं फुलें छापलीं आहेत असें एक ठिगळ होतें.. सुंद्रीच्या नवीन परकर पोलक्याचा रंग पसंत करतांच बारकूनें सुंद्रीला तें ठिगळ दाखवलें आणि सुंद्रीनें तो वाण एकदम पसंत केला !

पण येऊं घातलेलें हें परकर पोलक्याचें कापड केव्हां येणार ?

बारकूनें पैसे मोजून पाहिले. जे थोडे फार साचलें होतें ते पैसे सुंद्रीच्या खाण्यापिण्याला खर्च केलें तरच तिला शक्ती येणार तेव्हां त्या पैशांना कपड्यांसाठीं खर्चायचें नाहीं असें बारकूनें ठरवलें.

मग ? दुसरे पैसे कोठले आणणार !

"उं:, आपण एखादें नवीन काम त्यासाठीं शोधूं. दुपारी एक तें चार पर्यंत मोकळा तर वेळ आहे. त्यांत कांहीं करतां येईल तर पाहूं—" बारकू मनाशींच पुटपुटला, बाबा पंखेवाला त्याला जें म्हणाला होता तेंही त्याला आठवलें—

पगार देखील देईन मी तुला. पण बेटा, इमानानं वाग तूं माझ्याशीं!"

"हा कुठला आणला आहेस बाबा पंखेवाला ? सुंद्रीनें चौकशी केली,

दोन टाकीला भेटला बघ मला तो. त्याची नि एका बंगाली बाबूची मंत्रतंत्राची लढत लागली होती आज तिथं. मीही त्यांना सामील झालों. खूपच मजा आली! त्या बंगाली बाबूच्या प्रश्नांना मी अशीं कांही गमतीचीं उत्तरें दिलीं कीं सारी जमलेली मंडळी पोट धरधरून हसली.—"

"अशीं कुठलो रे उत्तरें दिलीस ?" सुंद्रीनें मध्येंच प्रश्न केला.

"छोकरा!" बारकू त्या जादुवाल्याची नक्कल सांगूं लागला. "छोकरा! तुम् हुश्शार है!' म्हणून त्यानें मला विचारलें. मी 'है' असें उत्तर दिलें. मग त्यानें विचारलें 'तुला बायको पाहिजे की नवरा पाहिजे ?' मी म्हणालों 'बायको पाहिजे' तो म्हणाला, "काळी की गोरी ?' मी म्हणालों 'गोरी पाहिजे' त्यानें त्यानंतर विचारलें 'बुढ्ढी की जवान ?' मी 'जवान' म्हणालों. माझं उत्तर मिळालें की तो बंगाली बाबू असे डोळे करी की लोक टाळ्या वाजवून खूप खूप हंसत ! अशी मजा आली बघ....."

"अरे वा ! अन् मग !"

"मग त्या बंगाली बाबूनं मला जमिनीवर बसवून माझ्यावर मंत्र घालण्याचा खूप प्रयत्न केला. पण मंत्र घालतांना तो बांसरी वाजवूं लागला की ती बांसरीच आपोआप बंद होई......"

"आपोआप ?" सुंद्रीचें तोंड आपोआप मोठें झालें!

"आपोआप म्हणजे मंत्रानें ग..." तो पुढें म्हणाला. "बाबा पंखेवाला माणसांच्या गर्दीत उभा राहून त्याची बांसरी मंत्रानें बंद पाडायला लागलान्."

" बापरे ! अन् मग ? "

" मग काय, हिंमत असली तर लढाईला मैदानांत ये म्हणून बंगाली बाबू म्हणाला. अन् बाबा पंखेवाला आलान् काय पुढें. "

" खरं ! "

" अग अजून तर सगळं पुढंच आहे सांगायचं. बाबा पंखेवाल्यानें त्याच्या-वर असा मंतर टाकला की बंगाली बाबूच्या नाकांतून न् तोंडांतून रक्ताची धारच लागली बघ ! क्षमा मागीतली त्यानं बाबा पंखेवाल्याची तेव्हां सुटला बिचारा ! "

" बापरे ! बराच मोठा जादुवाला दिसतोय् हा बाबा पंखेवाला म्हणायचा...." सुंद्री उद्गारली !

" अग मोठा म्हणजे काय समजतेस तूं ? पोलीस देखील त्याचा खेळ चालू असतांना आले पण दम न देतांना उलट त्याला सलाम करून गेले ! "

" अन् त्याची ती सारी जादु तो तुला शिकवणार होय ? "

" नुसतं शिकवणार नाहीं तर वर पैसे देखील देणार ! आहे की नाहीं मजा ! ! "

" कामावर सजूं केव्हां पासून होणार रे ? "

" उद्यां त्यानं दोन टांकीवर बोलावलं आहे. उद्यांपासून सुरूच झाला पहिला दिवस—" बारकू म्हणाला.

त्या रात्रीं निशांत टॉकीज मध्यें " सिंव्हलद्वीपकी सुंद्री " हा जादुच्या खेळानें भरलेलाच सन्सनाटी खेळ सुंद्री आणि बारकू यांनीं फुकटांत पाहून दादरा खाली जादूच्याच गोष्टी बोलत बिछान्यावर अंग टाकलें.

★

## प्रकरण ९ वें

# जादु म्हणजे हातचलाखी–पण !....

दुसरे दिवशीं बारकू दोन टांकीकडे गेला. तिथें बाबा पंखेवाला त्याचीच वाट पाहात उभा होता.

"आगया तुम् बेटा !—" बारकू आलेला पाहून तो खुशींत येऊन म्हणाला आणि बारकूच्या कांहीं प्रत्युत्तराची वाट वगैरे न पाहतां त्यानें चोरबाजाराच्या दिशेनें एकदम चालायालाही सुरुवात केली. बारकूही त्याच्या मागोमाग निघाला.

चोरबाजारांत 'दादा मॅन्शन' म्हणून एक बिल्डिंग आहे. बाबा पंखेवाला बारकूला घेऊन ह्या बिल्डिंगपाशीं आला. बिल्डिंगच्या दारांतच गाईला चारा विकणारी एक तरूण बाई येणाऱ्या जाणाऱ्या मवाल्यांशीं हसत खिदळत नखरे करीत बसली होती. बाबा पंखेवाल्यानें तिच्याकडे निरखून पाहात एक आणा तिच्या हातांत दिला आणि तिच्या पाटींतल्या हिरव्या चाऱ्याची पेंढी उचलून तिच्या गाईला चारली. त्यानंतर बारकूला घेऊन तो दादा मॅन्शनचा निरुंद जिना चढूं लागला. गाईला चारा घालणारा मुसलमान पाहून बारकूला मात्र अतिशय आश्चर्य वाटलें. पण त्याच्या आश्चर्यांत आणखी भर घालणाऱ्या कितीतरी गोष्टी अजून घडायच्या होत्या.........

दादा मॅन्शनच्या त्या निरुंद जिन्यानें बाबा पंखेवाल्याबरोबर बारकू एकदम वरच्या मजल्यावर गेला. निरुंद जिन्यांवरून कल्पना केली तर वरच्या खोल्या अगदी घाणेरड्या नि लहान खुराडेवजा असाव्यात अशीच कुणाचीही कल्पना होणें साहजीक. पण बारकूला घेऊन बाबा पंखेवाला खोलींत प्रविष्ट झाला, तेव्हां त्या खोलीनें मात्र ह्या अनुमानाला अगदी जबरदस्त धक्काच दिला. दार उघडून आंत गेल्याबरोबर आपण साधारण खोलीत नसून, एका प्रशस्त आकाराच्या व सामाना-

सुमानांनीं भरलेल्या अशा खोलींत उभे आहों असें त्याला दिसलें. त्या खोलीला लागूनच आणखीही आंत दोनचार खोल्या होत्या व त्यांचीं दारें ह्या समोरच्या प्रशस्त खोलींत उघडत होतीं. खोलींतील साराच थाट पाहिला तर तो विलासी होता. उंची फार्निचर होतें. जमिनीवर चटई होती, खुर्च्या, टेबलें, कपाटें होतीं. आणि भिंतीवर सुंदर सुंदर तरूणींचीं अर्धनग्न चित्रें होतीं. हें घर बाबा पंखेवाल्या-सारख्या फकीराचें असेल असें चुकूनही कोणास वाटलें नसतें. बारकूला देखील तसा संशय आला.

"बाबा, ये मकान किसका है?"

त्यानें विचारलें.

"अपनाही तो है—" त्याला उत्तर मिळालें होतें.

'फकीर आदमी, मसीदमें सोना हॉटेलमें खाना.' अशा थाटाचा माणूस एव्हढ्या सुंदर घरांत राहूं शकतो हा बारकूला दुसरा हादरा बसला... ......

"बैस ना बाळ!—" बाबा पंखेवाला हिंदींतच बोलत होता. "इथं कुणाला भिण्याचं कांहींच नाही."

"आज पासूनच माझ्या कामाचा दिवस मोजायचा ना बाबाजी!" बारकूनें विचारलें.

"हां-हां-आजपासून कामावरच तर आहेस!" बाबा पंखेवाल्यानें त्याला धीर देत म्हटलें. "तुझ्यासारखींच आणखी दोन मुलं आहेत. तीं आतां एव्हढ्यांत येतील. त्यांना येऊन जाऊं दे की आजचं काम मी तुझ्याकडून करून घेईन."

बाबा पंखेवाला हें बोलत आहे, इतक्यांत बंद दारावर बाहेरून धक्के बसूं लागले.—

"खोलो दरवाजा—" कुणी तरी ओरडलें.

बाबा पंखेवाल्याच्या तोंडावर समाधान झळकलें.

"आलींच बघ तीं मुलं—" तो म्हणाला. आणि लगबगीनें पुढें होऊन त्यानें दरवाजा उघडला.

उघड्या दरवाजांतून बारकूच्याच वयाचीं दोन मुलें आंत आलीं. त्यांच्या पेहरावावरून तीं जातीनें मुसलमान असावीं असें दिसलें. बारकूला त्यांचे ते खप्पड चेहरे तर बिलकुल आवडले नाहींत बघायला. अन् त्यांतच त्यांचीं आंत येतांना बाबा पंखेवाल्याशीं ती उर्मट वागणूक! बाबा पंखेवाल्याशीं बोलतांना त्यांतल्या एका पोरानं जें वाक्य वापरलें त्या वाक्यांत आरंभीं आणि शेवटीं त्यानें अशा घाणेरड्या शिव्या वापरल्या की त्या लिहून ठेवायला अगर वाचायला मुळीं शक्यच नाहींत! हा सर्व प्रकार पाहून बारकू अगदींच गोंधळून गेला. क्षणभर येथें तीं दोन पोरं मालक आणि बाबा पंखेवाला त्यांचा नोकर आहे कीं काय अशींही त्याला शंका आली. पण खुद्द बाबा पंखेवाल्याला मात्र त्याचें विशेष वाटलें नाहीं असें दिसलें. त्या मुलांच्या उर्मट वर्तनाकडे मुद्दाम दुर्लक्ष करीत उलट तो त्यांची खुशामत करीत आहे असें दृश्यही बारकूला पाहायला मिळालें.

आंत येतां येतां आज एक नवीन मुलगा बाबा. पंखेवाल्यानें आणलेला पाहून तीं मुलें एकदम जरा थबकलीं. त्यांना गोंधळलेले पाहून बाबा पंखेवाला एकदम पुढें झाला आणि हसत हसत बारकूचा त्यांना परिचय करुन देत म्हणाला—

"तुमच्याबरोबर काम करायला आपल्या या कंपनींत हा एक नवीन दोस्त मीं आणला आहे—हा बारकू. अन् बारकू, आपल्या ह्या "हुसन्या जमाल आणि पंखेवाला" या मंडळींतलि हीच ती पराक्रमी जोड गोळी. हा हुसन्या आणि हा जमाल......"

बारकूनें त्या दोघांचें आपादमस्तक निरीक्षण केलें. तो कांहीं बोलला मात्र नाहीं. कुणीच कांहीं बोलत नाहीं असें पाहून 'मामला' काबूंत ठेवण्याची कला असणारा बाबा पंखेवालाच त्या दोन पोरांना उद्देशून बोलूं लागला.

"हं, काय मंडळी, आजची काय खबरबात? कांहीं विशेष कामगिरी?"

हुसन्या आणि जमाल यांनीं एकवार एकमेकांकडे पाहून डोळ्यांनीं कसल्या संकेतिक खुणा केल्या अशा बारकूला संशय आला. त्यांनीं तशा खुणा करून एकवार बारकूकडे पाहिलें आणि नंतर बाबा पंखेवाल्याकडे पाहिलें—जें काम सांगायचे तें ह्या नवख्या पोरासमोर नको. आपण जरा एकांतात बोलूं असें तर हुसन्या-जमाल यांना सांगायचें नव्हतें ? कांहीं का असेना, बाबा पंखेवाल्याच्या त्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्यासारखे करून तें दोघेंही एका जवळच्याच दारानें जरा आंतल्या खोलींत शिरलें हें मात्र खरें. तें आंत गेल्यावर बारकूला जरा बसण्याची खूण करून बाबा पंखेवालाही आंत गेला. त्याचें त्या आंतल्या खोलींत कांहीं फार वेळ बोलणें झालें नाहीं. लौकरच तें तिघेंही बाहेर आलें.

बाहेर आल्यावर बाबा पंखेवाल्याच्या मुखावर अधीक आनंदाच्या छटा बारकूला आढळल्या. त्या पोरांच्या आढ्यतेंत देखील अधीकच भर पडलेली पाहून बारकूला कांहींच अर्थबोध होईना! काय आहे तरी काय ही सारी भानगड ? हे हुसन्या नि जमाल धन्याशीं अशा ताठ्यानें का वागताहेत ! तरीही त्यांची खुशामतच धनी का करतो आहे ? जें कांहीं त्यांना बोलायचं अथवा दाखवायचं असेल तें त्यांनीं आपल्या समोर का दाखवलं नाहीं, तें कांहीं तरी फार गुप्त असलें पाहिजे म्हणून तर तें आंत गेलें. बाबा पंखेवाल्याला हुसन्या जमालची ती गोष्ट ऐकून अगर पाहून बराच आनंदित दिसतो आहे. अन् आपण मोठीच बहाद्दुरी गाजवली असं त्या दोन पोरांना वाटतं आहे काय असेल बरं ती गोष्ट ? बारकू आपलीं अनुमानें बांधीत होता....

इकडे हुसन्यानें आणि जमालनें बाबा पंखेवाल्याचा निरोप घेतला. निरोप घेतला म्हणजे त्यांच्याकडे पाहून मिस्किलपणें डोळें मिचकावलें आणि जसे आंत आले तसेच हसत खिदळत आणि शिव्या देत देत तें घराबाहेर निघून गेले. बाबा पंखेवाल्यानें मात्र त्यांच्याशीं अदबीन बोलतच त्यांना निरोप दिला आणि पुन्हा पूर्ववत दार बंद करून तो बारककडे वळला—

"अच्छा बेटा, गेलीं तीं पोरं. आतां तूं—" तो बारकूला म्हणाला—

"क्यों बेटा, ऐसे क्यों देखते हो--? हां—हां—अशा गोष्टी बघायची तुला अजून सवंय नाहीं! मग बरोबर!!"

बारकूनें स्वतःस चटकन् सावरून घेत बाबा पंखेवाल्याला कांहीं तरी विचारलें. आपली खरी मनःस्थिति लपवावी म्हणून विचारलें—

"बाबा, ओ लडके गये?"

"गये," बाबा पंखेवाला म्हणाला—"भारी खट्याळ पोरं आहेत नाहीं! अब उनको छूटी मिल गई."

"मला कांहीं काम सांगणार होतेत ना तुम्हीं?" बारकूनें आपल्या कामाच्या मूळ पदावर येत बाबा पंखेवाल्याला जणूं आठवण दिली. "हे हुसन्या नि जमाल करतात तेंच काम करावं लागणार का मला?"

"आपल्या ह्या कंपनींत साऱ्यांना एकच काम करावं लागतं. तुला तें प्रथम नीट शिकलं पाहिजे. मी स्वतःच तें काम प्रथम साऱ्यांना शिकवतों—"

"जादू काम ना बाबा?" बारकूनें मध्येंच अधीर होत विचारलें.

"हा जादू काम—" बाबा पंखेवाला बारकूकडे रोखून पाहात म्हणाला—"पण बेटा, मला प्रथम हें सांग; माझ्याशीं ईमानदारीनं राहाशील ना?"

बारकूनं अतिशय जोर देऊन आपण बेईमान होणार नाहीं असें त्याला सांगितलें आणि नंतर जणूं गळ घालीत म्हटलें—

"शिकवा ना बाबा तुमची ती जादू मला--"

"अच्छी बात—" बाबा पंखेवाला जादूचा पहिला धडा बारकूला शिकवूं लागला—"प्रथम हें चांगलं लक्षांत ठेव बेटा, दुनियेंत जादू नांवाची चीजच नाहीं! मंत्र, तंत्र, खवीस, समंद, हडळ, भुत, पिशाच्च सारं सारं खोटं...दचकूं नकोस असां...बाबा पंखेवाला तुला खरं सांगतो आहे. चंडाळदास, त्याची कंवटी, हाडं, कालीकलकत्तेवाली नि तिचा मंत्र हें सारं खोटं आहे......

" खोटं आहे ? " बारकू ओरडलाच !

" हां बेटा—दुनियेंत हें सारं पैसा मिळावा म्हणून ढोंग उभं केलं आहे—जादू म्हणून आपण जें कांहीं बघतों तें सारं हातचं कसब आहे. जादू म्हणजे हात चलाखीच; दुसरं कांहीं नाहीं. लोकांना फसवायचं, त्यांच्या डोळ्यांत धूळ फेकायची, हातांना असं प्रवीण काम करायला लावायचं—इतकी चपळाई शिकवायची की ती इतरांच्या नजरेंत येऊं द्यायची नाहीं. समजलास ?"

बारकू तर चाटच पडला !

" बाबा, काल तुम्ही बंगाली बाबूशीं जादूची लढाई केली; त्याच्या तोंडांतून रक्ताच्या गोठी पाडल्या... ...ती सारी चलाखीच ?"

" तुला तें सुद्धां शिकवीन मी बच्चा. हें सारं चलाखीचंच काम. हळुहळू हें सारं तुला येऊं लागेल. मी सांगतों तसा शिकलास तर दुनियेंत भलता माणूस होऊन जाशील बघ. हात चलाखीचा आतां पहिला धडा मी तुला देतों. बघूं बरं कसा काय शिकतोस तें."

बाबा पंखेवाला आपणांस आतां काय धडा देणार याचा बारकू विचार करूं लागला. खरंच बाबा पंखेवाला आतां काय शिकवणार ? जादू म्हणजे हातचलाखी हें झालें...आतां हातचलाखीचा पहिला धडा कोणता ?

★

# प्रकरण १० वें

# बारकूच्या हातावर खूष !

बाबा पंखेवाल्यानें कलाबुतींनीं सुशोभित केलेला एक रुमाल बारकूला दाखवला.

" ये देखो बेटा, क्या है ये ?" त्यानें बारकूला विचारलें.

" रूमाल—" बारकूनें उत्तर दिलें.

बाबा पंखेवाल्यानें त्या रूमालाचा गोळा केला नि तो आपल्या गुडघ्या इतक्या लांब बंडीवर घातलेल्या वेस्ट कोटाच्या खिशांत ठेवून देत तो बारकूला पुढील सूचना देत म्हणाला—

" आतां बेटा, भिंतीवरचं हें चित्र मी बघत उभा राहातों, तेवढ्यांत मला समजूं न देतां हा रूमाल तूं हळूच काढून घे बरं ... रूमाल काढून घेत आहे हें मला समजूं द्यायचें नाहीं आं ?"

बारकूला गंमत वाटली. बाबा पंखेवाला भिंतीवरचें चित्र न्याहाळून पाहाण्यांत दंग झाला. बारकू हळूच त्याच्या मागून पाय न वाजवतां गेला. आणि हलक्या हातानें त्यानें तो रूमाल काढून घेतला. भूत, समंद, हडळ, खवीस, काली कलकत्तेवाली, चंडालदास, वगैरे सारें खोटें; हातांची चलाखी म्हणजेच जादू हें ऐकून खूपच नवल वाटलें होतें त्याला. हातांत आलेला रूमाल हवेंत फडकावीत तो विजयी स्वरांत ओरडला—

" ए देखो रूमाल ! हमारे हाथमें आया है ! ! "

बारकूनें तसें म्हणतांच जणूं आपणांस अतिशय आश्चर्य वाटलें असा अभिनय करीत बाबा पंखेवाला बारकूला कौतुक-मिश्रित स्वरांत म्हणाला—

" बेटा, किती ' प्यारा ' हात तुला खुदानें दिला आहे ! असला ' प्यारा ' हात मी माझ्या साऱ्या उमरभर पाहिला नाहीं ! किती हात मी आजवर पाहिले. पण इतका हलका हात खुदानें कुणाला दिलेला आढळला नाहीं ! त्या हुसऱ्याला नि जमालला देखील तूं पार मागें टाकणार बघ."

" खरंच कां मी लवकर शिकेन जादू ?" बारकू हुरळून जात म्हणाला. बाबा पंखेवाल्याच्या स्तुतीनें तो नुसता फुगून गेला.

" तुझ्या ह्या ' प्याऱ्या ' हातांवर मी निहायत खूष आहे बेटा ! " बाबा पंखेवाला त्याला आणखी हरभऱ्याच्या झाडावर चढवीत म्हणाला," हे हात—मी खात्रीनं सांगतो अशी करामत करतील की तशी करामत त्यांच्या गुरुला देखील कधीं साधली नाहीं ! "

बोलतां बोलतां बाबा पंखेवाल्यानें बारकूचे हात हातांत घेऊन ते मोठ्या प्रेमानें चाचपून पाहिले.

" खुदानेंच तुला माझ्याकडे पाठवून दिलं बेटा." तो पुढें म्हणाला—" मी सांगतों तें करशील तर जिंदगीभर ऐषआराम करशील."

बारकूला स्वर्ग आतां दोनच बोटें उरल्यासारखा झाला. बाबा पंखेवाल्याशीं आपली चांगलीच गट्टी असावी अशा भावनेनं तो त्याच्याशीं मग अगदीं मोकळ्या मनानें बोलूं लागला.

" ती सुंद्री आहे ना बाबा, तिला परकर-पोलकं घ्यायचं म्हणून मी तुमचं हें काम करायला तयार झालों. इथं आलों तेव्हां सारखी मनांतून भीति वाटत होती की काय होतें म् काय नाहीं..."

पण त्याला मध्येंच अडवून बाबा पंखेवाला म्हणाला—

" कुच्छ भी हो...लेकिन डरना नहीं आं बेटा. ज्यो डर गया वो मर गया ! हिंमत धरून काम करायला पाहिजे माणसानं. जिगर भी कोई चीज है न ?"

बारकूनें आपोआप होकारार्थ मान हलवली हें त्याच्या लक्षांत तरी आलें किंवा नाहीं कुणास माहीत? त्यानें हलवलेली मान पाहून बाबा पंखेवाला मात्र अधीक खुशींत आल्या सारखा झाला—

" तूं एव्हढ्यांत नांव घेतलीस ती कोण बेटा?" त्यानें बारकूला विचारलें.

" हां—हां—सुंद्री?" बारकू सांगूं लागला—" ती भारी गोड पोरगी आहे बाबा. पायधुणीवरचा तो जुना भीमजी आहे ना, त्यानें तिचीं पाठीचीं हाडं फुकटांत बसवून दिलीं बघा. तिला चालतां सुद्धां येत नव्हतं, आतां हिंडूं फिरूं लागेली आहे—अजून दुबळी खूपच आहे पण .....तिला खायला प्यायला चांगलं मिळावं म्हणून तर मी निशांत टॉकिज मध्यें खारे शेंग विकायचं काम धरलं. अन् तुम्ही पगार द्याल का, त्यांतून पहिल्यानं तिला एक छानदार परकर पोलकं शिवायचं......"

" बराबर है. बराबर है." बाबा पंखेवाला वेस्टकोटाचे खिसे चाचपीत म्हणाला—" एकदम दुरुस्त है बेटा. पण त्या साठीं पगारापर्यंत कशाला थांबतोस? आजच घेऊन टाक तिला परकर न् पोलकं......"

" पण पैसे......?"

" हां—हां—पैसेकी तो जरूरत है. लेकीन उसमें इतनी हैराण होनेकी क्या बात है. ए है पैसे—" असें म्हणत बाबा पंखेवाल्यानें एक पांचाची व तीन रुपया वाल्या नोटा बारकू समोर धरल्या.

" पण आजच तर मी कामाला लागलों. आजच्या आज महिन्याचा अगावूं पगार? महिना भरल्यावर द्याना. घाई नाहीं इतकी."

" ये पगार नहीं बच्चा!" बाबा पंखेवाला म्हणत होता. " एव्हढासा थोडा पगार असतो का कुठें? ही तर साधी बक्षीसी आहे! तुम्हारे बेहेन के लिए देता हूं."

" काय बक्षीसी?" बारकू दचकून म्हणाला—" इतकी बक्षीसी? बापरे!!"

“ तुझ्या ‘ ध्यान्या ’ हातांवर खूष झालों आहे ना मी बेटा; म्हणून; देतों घे. दिल नही तोडना बच्चा...ले ये पैसा...”

“ बारकूला शेवटीं त्या नोटा घ्याव्याच लागल्या.

बाबा पंखेवाल्या विषयीं आतां बारकूच्या मनांत प्रेमाला नि भक्तीला पारावार उरला नाहीं. जुना भीमजी जसा लाखांतला माणूस तसाच हा बाबा पंखेवालाही असला पाहिजे असें त्याला ठाम वाटूं लागलें. सुंद्रीचें नशीब बलवत्तर ! प्रत्येक ठिकाणीं तिच्यामुळें असें होतें :असेंही तो मनांतल्या मनांत पुटपुटला. बाबा पंखेवाल्यशीं तर काय बोलावें नि त्याचे कसे आभार मानावेत हेंच त्याला समजेना. —अतिशय भावना-विवश होऊन त्याच्या तोंडून शद्बही बाहेर फुटेना. बाबा पंखेवाल्याच्या लक्षांत ती गोष्ट पटकन् आली. तो बारकूला धीर देत म्हणाला—

“ कोई बात नही बेटा-रहम और ईमानदारी सबसे बडी चिज है मैंने रहम दिखाया. अब तुम ईमानदारी दिखाओ. ”

“ बाबा, मी तुमच्याशीं तरी कधीं सुद्धां बेईमान होणार नाहीं. तुम्हीं सांगाल तें सारं सारं करीन. तुम्हीं शिकवाल तें शिकेन. आणि शेवट पर्यंत तुम्हांला सोडणार नाहीं ! ”

बारकू हे शब्द अशा हिरीरीनं बोलला की ते ऐकून बाबा पंखेवाला तर त्याच्या कडे पाहातच राहिला. समाधानाचें स्मित त्याच्या चेहेऱ्यावर झळकलें.

“ शाबास बेटा ! खुष रहो ! ! ” तो म्हणाला—“ मला तुझं हें म्हणणं ऐकून फार आनंद वाटला. सुरूवात तर छान झाली. आजचं काम झालं. उद्यांला आजच्याच वेळीं ये. आतां निघूं या दोन टॉकीवर बंगाली बाबू आतां माझी वाट पाहात बसला असेल. ”

[illegible]ाली बाबू ? ” बारकूनें आश्चर्यानें विचारलें “ बंगाली बाबू म्हणजे तोच ना तो कालचा पळपुट्या ? अन् तो कशाला तुमची वाट बघेल ? तो तर रागावला असेल तुमच्यावर काल फजेति झाली म्हणून ! ”

" नही बेटा—बंगाली बाबू खफा नही होता. ओ भी अपनाही आदमी है. "

बाबा पंखेवाला इतकें म्हणून बाहेर जाण्यासाठीं तातडीनें उठला. अर्थात् बारकूलाही उठावें लागलें. तो अरूंद जिना चढून दोघेंही खालीं आलें. ती गाईला चारा विकणारी स्त्री बाबा पंखेवाल्याकडे पाहून हसली. पण तिच्याकडे दुर्लक्ष करीत आपल्या दाढी वरून हात फिरवीत तो चोरबाजाराच्या गर्दीत दिसेनासा झाला. "

बारकू आपल्या हातांतल्या त्या नोटा न्याहाळीत कुंभारवाड्याच्या दिशेनें आश्चर्य चकीत होऊन निघाला. बाबा पंखेवाल्याविषयीं त्याला भारीच कुतूहल आणि प्रेम वाटूं लागलें होतें. निःसंशय तो भारी दयाळू आणि प्रेमळ फकीर आहे असें त्याला वाटलें. पण फकीर असून त्याला इतकें सुंदर घर कसें ? हुसन्या आणि जमालचा तो मालक आणि ते नोकर असतां त्यांची त्याच्याशीं अशी वागणूक कां ? बंगाली बाबूचीं त्याच्याशीं खेळांत दुष्मणी होऊनही तो बाबाची वाट पाहात दोन टांकीला कसा थांबणार आहे ? बाबा त्याला " आपलाच माणूस आहे " म्हणून म्हणतो याचा अर्थ काय ? वगैरे हजारो प्रश्न त्याच्या डोक्यांत थैमान घालीत होते !

★

## प्रकरण ११ वें

# सुंद्रीचं नवं परकर-पोलकं

कुंभारवाड्याकडे बारकूला अवेळींच आलेला पाहून सुंद्रीला नवल वाटलें. ती वेळ बारकूचा ' पेपर ' आणायला जाण्याचा. बाबा पंखेवाल्याकडे जातों असें सांगून तो बाहेर पडला तेव्हांच तिकडून तिकडे मी पेपर आणायला जाईन असेंही तो सुंद्रीला म्हणाला होता. आणि तसें सांगून देखील मग तो का परतला ? सुंद्रीला समजेना.

बारकूच्या मुखावर आनंदाचा फुलबाग फुलला होता. डोळे हर्षातिरेकानें चकाकत होते. आपण आजच सुंद्रीला नवें परकर-पोलकें घेणार हें समजल्यावर सुंद्रीला किती आनंद होईल याचीं मनाशींच कल्पनाचित्रें काढीत तो परतला होता. आजच्या दिवस पेपर आणायला जायचं नाहीं. सुंद्रीला तावडतोब परकर-पोलकें घेऊनच टाकायचें असें त्यानें ठरवलें होतें.

"पेपर आणायला नाहींस का गेला ? मधूनच मागें का आला ?" सुंद्रीनें विचारलें.

"आज पेपर बंद." बारकू म्हणाला. "आजच्या दिवस सुट्टी ! चल आटप. आपण आतां बाजारांत जाणार. तुला आजच्या आज परकर-पोलकें घेऊन टाकायचें.

सुंद्री जरा वेळ गोंधळून उभीच राहिली.

"बघतेस काय अशी ?" बारकू पुढें म्हणाला—"ऐकलं नाहींस का मी काय म्हणालों तें ? आज काम बंद-आज तुला नवीन कपडे खरेदी करायचें. मग दोघांनीं मिळून 'निशात' टॉकीज मध्यें सिनेमा बघायचा. खारी शेंग सुकामेवा खायचा. खूप खूप मजा करायची !"

तरीही सुंद्री उभीच !

"अग आटप ना......तुला नवीन कपडें नकोत की काय ?"

"आज घेणार परकर-पोलकें ?"

"आज काय ? आतां घेणार ! चल नीघ...नीघ बाहेर. आतांच जायचं बाजारांत."

"अन् पैसे ?"

"हे काय पैसे !" अशा अर्थानें बारकूनें तिला बाबा पंखेवाल्यानें मघाशीं दिलेल्या नोटा काढून दाखवल्या.

"कुठून ?" ह्या अर्थानें सुंद्रीनें त्याच्याकडे पाहिलें.

" प्रथम चल तर खरी. सांगतों सारं चालतां चालतां." इतकें म्हणून बारकू चालूही लागला.

दोघेंहि ग्रँट रोडच्या दिशेनें निघालीं. रस्त्यांत बारकूनें बाबा पंखेवाल्याच्या घरीं जें जें घडलें तें तें सारें सांगीतलें. बाबा पंखेवाल्यानें नुसतें बारकूच्या हातावर खुष होऊन त्याला आठ रुपये बक्षीस दिलें. असें ऐकतांच सुंद्री एकदम त्याला थांबवून आणि त्याचे हात आपल्या हातांत प्रेमानें धरुन ती म्हणाली—

" बारकू, बाबा पंखेवालाच काय, कुणीही या हातांवर असेंच मोहित होईल. किती किती सुंदर हात आहेत तुझे हे ! त्यांत इतका हळुवारपणा आहे.... इतकं मार्दव आहे....इतका जिव्हाळा आहे. मी त्या धर्मशाळेंत कुठें पडलें होतें ! ह्याच हातांनीं मला तेथून हळुवारपणें पुढें होऊन वर उचललें. जरा सुद्धां माझी पाठ दुखवली नाहीं. ह्या हाताच्या मऊ मऊ स्पर्शांत त्या दिवशीं मला जगांतलं सारं प्रेम अनुभवायला मिळालं. सारा सारा जिव्हाळा मिळाला."

आपली स्तुति सुंद्रीच्या तोंडून ऐकत असतां बारकूला अस्मान ठेंगणें वाटूं लागलें. तरी पण का कोणास माहीत; त्याला खूप संकोचही वाटला. तो तिला ओशाळ्या आवाजांत म्हणाला—

" चल पोरी ! कांहीं तरीच काय बडबडतेस ! तूं तरी वरीच ही आहेस बघ."

" उगीच नाहीं मी हें म्हणत." सुंद्री पुढें म्हणाली. " खरोखरीच तुझ्या हस्तस्पर्शांत मला आपलेंपणा वाटला. दुनियेंत तूंच सर्वांत जवळचा असा भास झाला. एकदम जगावं असं वाटूं लागलं. तुझ्या जवळ... . तुझ्याचसाठीं जगावंसं वाटूं लागलं. खरंच ना......"

" मग तुला कोण दूर घालवणार आहे ? तूं तर माझ्याच जवळ राहणार आहेस ! कुणी तुला न्यायला आलें तरी मी नाहीं तुला दूर नेऊं देणार. तुला आणली तें कुणाच्या स्वाधीन करायला वाटतं !"

# आमची पुढील प्रकाशनें

(१) दुर कुठें तरी

(कादंबरी) लीला देशमुख.

(२) राम रहीम

(कादंबरी) शं. बा. शास्त्री.

(३) जगाला कळलं पाहिजे

(कादंबरी) वी. रघुनाथ.

नागपूर प्रकाशन, सिताबर्डी, नागपूर.

# उपयुक्त ज्योतिष ग्रंथ वाचा

## दैव-विचार माला

लेखक-ह. ने. काटवे

| | कि. रु. आ. | | कि. रु. आ. |
|---|---|---|---|
| रवि-विचार | १-० | भाव-विचार | ०-१२ |
| चंद्र-विचार | १-० | भावेश-विचार | १- ८ |
| मंगळ-विचार | १-० | गोचर-विचार | १- ८ |
| बुध-विचार | १-० | शुभाशुभ ग्रह नि. विचार | २- ० |
| गुरु-विचार | १-० | योग-विचार भाग १ ला | १- ० |
| शुक्र-विचार | २-० | ... ... ... २ रा | २- ० |
| शनि-विचार | २-० | ... ... ... ३ रा | २- ० |
| ग्रहण-विचार | २-० | ... ... ... ४ था | १- ० |
| हिंदुस्थानचे भविष्य मराठी | ०-६ | हिंदुस्थानचे भविष्य हिंदी | ०-१० |

—पुढील प्रकाशन—

—अध्यात्म ज्योतिष-विचार—

नागपूर प्रकाशन, सितावर्डी, नागपूर.

बोलतां बोलतां दोघेही ग्रँट गेडला आलीं ग्रँट रोडला काय, दुकानंच दुकानं कपड्यांचीं !

जवळच्याच एका दुकानांत तीं दोघेंही शिरलीं.

" काय रे ? कोण तुम्हीं ? काय पाहिजे ? "

" हिला परकर न् पोलकं घ्यायचं शेठ. "

शेठजींनी एकवार दोघांनाही निरखून पाहून म्हटलें—

" चला, चला व्हा चालते—इथं कपडे घेणार म्हणे ! "

" आहो पण...... "

" ए पोरा, जातो की नाहीं ? "

" आहो, पण असें रागावतां कां ? पैसे घ्या. आम्ही पैसे देतों. फुकट नाहीं मागत. विकायचं नाहीं, तर दुकान तरी कशाला घातलं ? पैसे घ्या मग कपडा द्या. "

शेटजींनी पुन्हां पोरांचं निरीक्षण केल. आणि विचारलं—

" काय-घेणार तरी काय ? दुसरी तिसरी गडबड तर नाहीं ना करणार ? "

" आम्हांला गडबड मुळींच करायची नाही. हिला परकर-पोलकं घ्यायचं कीं झालं काम ! "

मुकाट्यानें शेठजींनीं कपडे दाखवले. त्यांनीं दाखविलेल्या कपड्यांतून बारकूच्या गोधडीला ठिगळ होतें त्या फुलाफुलांच्या नक्षीची एक परकर-पोलक्याची जोडी त्यांना त्यांत आढळली. दोघांनी एकमेकांकडे विजयी मुद्रेनें पाहिलें. "पसंत !" अशा अर्थी खुणा केल्या—आणि बारकूनें शेठजींना किंमत विचारली.

" याचे पडतील चार रुपये. देणार ? "

शेठजींनी किंमत सांगितली.

मुळींच हुज्जत न घालतां बारकूनें पांचाची नोट शेठजीपुढें केली. शेठजींनीं उरलेले पैसे व ते परकर-पोलकें कागदांत गुंडाळून बारकूच्या हातीं दिलें. बारकूनें

पैसे खिशांत ठेवले. आणि दुकानांतून बाहेर पडण्या आधींच त्या पुडक्याच्या कागदाला रजा दिली व परकर-पोलकें बाहेर काढून ते सुंद्रीच्या हातांत दिलें.

सुंद्रीनें ते नवीन कपडें छातीशीं घट्ट धरलें. तिच्या आयुष्यांत पहिल्यानेंच तिला तसें नवीन कपडें स्वतःसाठीं मिळालें होतें ! आनंदाचे दोन अश्रु टप् टप् त्या नव्या परकर-पोलक्यांवर ओघळले. गालावरचे ओघळ पुसतां पुसतां तिनें त्या परकर-पोलक्याचा वासही घेतला नि ती खुदकन् हंसली. तिच्या त्या हसऱ्या आनंदाला तशीच साथ देत बारकू म्हणाला—

" सुंद्रे, तूं कशी हसतेस सांगूं ? "

" कशी हसत्यें ? "

" उन्हांत कधीं कधीं पाऊस पडतांना दिसतो ना. तशी हसतेंस ! "

" चल, कांहीं तरीच ! मी रे कधी तसं हसत्यें ? सुंद्री म्हणाली आणि पुन्हां एकदां तशीच हसली.

कुंभारवाड्यांत गेल्याबरोबर प्रथम तें परकर-पोलकें अंगावर घालून बघण्याचा विधी झाला. त्या कपड्यांत सुंद्री खरोखरच अतिशय सुंदर दिसूं लागली. त्यानंतर पेटंट हॉटेलांत दोघांनीं मिळून संध्याकाळचें जेवण घेतलें. आणि निशात टॉकीजचा रस्ता धरला. 'निशात'मध्यें दोघांनीं मिळून साडे नवाचा शो पाहिला. बारकूनें खारी शेंग विकली. सुंद्री बरोबर खारी शेंग, सुका मेवा, पानाच्या पट्या सुद्धां खाल्ल्या. आणि मजा मजा केली.

पुन्हां कुंभारवाडा लेन मधील त्या इमारतीच्या दादराखालीं परत यायला त्यांना एक वाजला. पण त्या नंतर देखील त्यांना दोघांनाही झोप कशी ती ध्यावीशीं वाटली नाहीं. सारख्या त्यांच्या गप्पा गोष्टीच चालू होत्या. तो बाबा पंखेवाला; त्याचे ते अजब नोकर हुसन्या नि जमाल; बारकूचे ते "प्यारे प्यारे" हात; तो बंगाली बाबू; ती गायवाली नखरेल बया; आणि सुंद्रीचे तें नवीन परकर-पोलकें.

खूप खूप बोलत होतीं दोघेंही जणें. अगदी थेट पहाटे चार साडे चार पर्यंत बोलत होते नि हसत खिदळत होते. पहाटे चारच्या साडे चारच्या सुमारास मात्र दोघेही पेंगूं लागलीं. आणि मग जरा वेळ झोपी गेलीं. साडे पांच वाजल्यावर उशिरानें झोपून सुद्धां नेहमींच्या सवयीनें बारकू जागा झाला. सुंद्री गाढ झोपेंतच होती. तिला जाग येऊं नये अशी खबरदारी घेत बारकू हळूंच उठला. आणि पेपर आणायला बाहेर पडला.

## प्रकरण १२ वें

# नवीनच संकट

दुपारीं पेन्टट रेस्टूरन्टमध्यें सुंद्री बरोबर जेऊन बारकु पुन्हा चोर बाजारांत बाबा पंखेवाल्याकडे निघाला. दोन टाकीवरुन जातां जातां सहज बंगाली बाबू जिथें जादूचे खेळ करी तिकडे त्याचें लक्ष गेलें. बंगाली बाबूचा खेळ चालू होता. लोकांची नेहमी प्रमाणें बरीच गर्दी दिसली आणि त्या गर्दींतच त्याला हुसन्या नि जमालची जोड गोळी देखील दिसली. सारी गर्दी बंगाली बाबूचे प्रयोग बघण्यांत दंग झालेली आहे अशी संधी साधून हुसन्या आणि जमाल ह्यांनीं मात्र तिथें कांहीं निराळेच प्रयोग चालू केले होतें. गर्दींत एका मारवाड्याला घेरून त्यांनीं एक मेकांना अर्थपूर्ण खुणा केल्या. आणि दोघें त्या मारवाड्याच्या एक उजविकडे नि दुसरा डावीकडे असे जाऊन उभें राहिले. आपणांस कोणी पाहात आहे याची त्यांना कल्पनाही नसावीसें दिसलें. बघतां बघतां त्या दोघांनीं त्या मारवाड्याला खेटून लगट करायाला सुरवात केली आणि हुसन्यानें तसें करतां करतां त्याच्या खिशांतून मोठ्या शिताफीनें पैशांचें पाकीट काढून आपल्या खिशांत घातलें. हा सारा प्रकार इतका चुटकीसरसा घडून आला की गर्दींत तें कुणालाच समजून देखील

७६७)

आलें नाहीं. केवल बारकूनें मात्र तें पाहिलें. त्याला भीति वाटली. काम ' फत्ते ' झालें तेव्हां हुसन्या आणि जमाल यांनीं काढता पाय घेतला. बारकू काय करीत आहे हें त्यांचें त्यालाच कळून येण्याचें आंत त्यानें " चोर-चोर " अशा आरोळ्या मारल्या. हुसन्या आणि जमालनें गंभीर परिस्थिती ओळखली आणि अतिशय चपलतेनें तें जवळच्याच एका गल्लींत शिरले. बारकू " चोर-चोर " असा ओरडताच लोकांचें त्याच्याकडे लक्ष गेलें. तो मारवाडी आपले खिसे चांचपून पाहूं लागला आणि " बापरे, माझें पैशांचें पाकीट मारलें " म्हणून ओरडूं लागला.

चोरी करणारे तर पळून गेले नि लोक मात्र आपणाकडेच संशयानें पाहांत आहेत असें पाहून बारकूला आणखी भीति वाटली. तो भिऊन एकदम पळूंच लागला. बघ्यानां काय, त्यांना बारकूच चोर वाटला. सर्वांनीं बारकूचाच पाठलाग सुरू केला. बारकू कसा तरी जीव घेऊन पळत होता. चोर बाजाराच्या दिशेनें त्याचे पाय आपोआप वळले होते. दादा मॅन्शन पर्यंत कसा तरी तो पळूं शकला. पण लौकरच त्यास लोकांनीं गांठलें.

किती लोक बारकूवर तुटून पडले. कुणी त्याला शिव्या दिल्या, कुणी चापटी मारल्या, कुणी लाथा हाणल्या.

" आहो, पण मी कुठं काय केलं ! ......मी नाहीं चोरलं पाकीट...मला ......का ......मा......र......तां ! "

" चौकीवर न्या खेचून साल्याला .. " कुणी तरी शिष्ट कडाडले- " चोरी करायला पाहिजे बेट्याला ......"

" आहो पण मी नाहीं हो चोरी केली. चोरी करणारीं तर मुसलमानाचीं दोन पोरं होतीं. त्यांना चोरी करतांना पाहून मी नुसता ओरडलों. मला का मारतां......"

आणखी जरा वेळ गेला असतां तर बारकूनें हुसन्या आणि जामाल यांचीं नांवें आणि त्यांचे व बाबा पंखेवाल्याचे परस्पर संबंध काय तें देखील सांगून टाकलें

३०८१७ वा. ५७ २८(५)

असतें. पण तशी संधी त्याला मिळालीच नाहीं. जवळच एका स्त्रीच्या कर्कश किंकाळ्या ऐकूं येऊं लागल्या. काय आहे तें सारींजणें पाहूं लागलीं.

दादा मॅन्शन समोर गाय घेऊन बसणारी ती नवरेल गायवाली किंचाळत रडत होती. आरडत ओरडत ती बारकूच्याच दिशेनें येऊं लागली.

"सोडा हो माझ्या बाळाला—" ती म्हणत होती. "का मारतां त्याला उगीच्या उगीच. त्यानं कांहीं केलं नाहीं. त्याला कशाला नेता चौकीवर ! सोडा त्याला—"

आरडत ओरडत ती जशी आली तशी तिनें बारकूला मिठीच मारली. कधीं जन्मांत ओळख देख सुद्धां नाहीं. नुसतीं आपण काल एकदां ही बाई पाहिली. आणि अशी ही अचानक येऊन आपल्या गळ्यांत कां पडते आहे ? बारकू तें सारें पाहून हतबुद्धच झाला !

"तुमच्या पायां पडतें रे दादांनो—" ती बाई ओरडतच होती—"ह्यानं तुमचं कांहीं सुद्धां चोरलं नाहीं. मी सांगतें चोरलं नाहीं ! सोडा त्याला. पदर पसरतें; सोडा त्याला ! "

ह्या वेळ पर्यंत ज्याचं पाकीट चोरीला गेलं होतं तो मारवाडी पोटाचा नगारा सांवरीतच तिथें येऊन पोंचला.

"ह्याच शेठजींचं पाकीट चोरलं ह्यानं—" कुणीतरी म्हणालं. आतां त्या गायवालीनें त्या शेठजींचीच विणवणी सुरूं केली.

"शेठजी, ह्यानं नाहीं हो—दुसरी पोरं असतील कुणी. माझा राजा नाहीं चोरायचा कांहीं. द्या सोडून ह्याला—"

सारीं माणसें आतां पुढें काय होणार तें पाहूं लागलीं. शेठजींनीं बारकूकडे पाहिलें व म्हटलें—

"अरे मारे बाप ! ये छोकरा नाहीं. इसकू छोड दो."

"म्हणजे हें पोरगं नव्हं का तें?" कुणी तरी अतिशय निराश सुरानें विचारलें. आपली ही फुकटांतली गंमत इथेंच संपुष्टांत येणार असें वाटून त्या विचारणाऱ्या व्यक्तीस भारीच वाईट वाटल्या सारखें दिसलें.

"अरे बाबा मुसलमानांचीं पोरं होतीं तीं।" शेठजी म्हणाले. खुद्द तक्रार करणाराच नाहीं होऊन पडल्यावर फुकट्या स्वयंसेवक तमासगिरांचें काय चालणार? बारकूचा कोवळा हात त्यानें घट्ट आंवळून धरला होता ती पकड मग आपोआपच ढिली पडली. बारकूनें तेव्हढीच संधी साधली. एक जोराचा हिसका देऊन त्यानें आपली सुटका करून घेतली आणि जवळच्याच एका निरुंद गल्लीत धूम ठोकली. बारकू तसा धावूं लागतांच ती गायवालीही त्याच्या पाठोपाठ झपाट्यानें निघाली आणि बघ्यांची पांगापांग झाली.

बराच वेळ बारकूची आणि त्या गायवाल्या बाईची पाठशिवणी चालू होती. अखेर बारकू थांबला. बाबा पंखेवाला, हुसन्या जमाल आणि मंडळी आणि तो बंगाली बाबू यांचें सत्य स्वरूप आतां कुठें बारकूला दिसून आलें! एकूण ही सारी एक बदमाशांची टोळी होती तर! बंगाली बाबूनें खेळ करायचे नि माणसें जमवावयाचीं. हुसन्या जमालनें त्या गर्दीचा फायदा घेऊन बेसावध लोकांचे खिसे रिकामे करायचे आणि तो सारा भार बाबा पंखेवाल्याकडे आणून टाकायचा नि ह्या साध्या कामगिरी बद्दल बाबा पंखेवाल्यानें त्यांना नगद पगार द्यायचा! आतां हुसन्या आणि जमालचा बाबा पंखेवाल्यापाशीं इतका रुबाब कां तें बारकूला समजून आलें! वा रे फकीर!.........अन् त्याच्या तावडींत आपण देखील सांपडणार होतों! त्याची ती सारी करामत तो आपणाला देखील शिकवणार होता!! ......आपणाला देखील हुसन्या—जमाल सारखा खिसेकापू चोर बनवणार होता तो डांबीस थेरडा!!! बारकू मनाशींच विचार करूं लागला...

बारकूच्या अंगावर शहारेच आले.

"जादु म्हणजे हात चलाखी !" बाबा पंखेवाला त्याची ती किमया शिकवतांना आपणांस म्हणाला होता, तेव्हां आपणांस त्याच्या त्या म्हणण्याचा अर्थ त्यावेळीं समजला नाहीं. पण आतां नीट समजला. आपलें नशीब म्हणून त्यां लंफग्यांच्या टोळींतून आपण शिरसलामत सुटूं शकलों. नाहीं तर आपलें काय झालें असतें ह्याची कल्पनाही त्याला करवेना. ही सारी हकीगत ऐकून आतां सुंद्रीला काय वाटेल. पुन्हां कद्धीं कद्धीं दादा मॅन्शनच्या बाजूला जाऊं नको असेंच ती म्हणेल. पण हें तिनेंच कशाला मला सांगायला हवें ? पुन्हां त्या बाबा पंखेवाल्याचं तोंड देखील मी पाहाणार नाहीं......

पण प्रत्येक सुविचार जर मनाप्रमाणें जुळून आला तर मग आणखी काय हवें ? बारकूनें हा सुविचार मनांत आणायला नि कुणी तरी त्याला एकदम घट्ट मिठि मारायला एकच गांठ पडली. बारकू केवढ्यानें तरी दचकला !

"मी तुला आज पोलीसांच्या तावडींतून सोडवलं आहे !" ती मिठी मारणारी व्यक्ती त्याला घट्ट आवळून म्हणाली—बारकूनें पाहिलें—तो ती मघाची नखरेल गायवाली !

"पण तूं आहेस तरी कोण ? तुझा माझा संबंध काय ? का तूं माझ्या पाठीशीं लागली आहेस ? सोड मला ?"

"माझी तुझी ओळख सुद्धां नाहीं कालच तर तूं आमच्या टोळींत आलास......"

"म्हणजे ? तूं देखील बाबा पंखेवाल्याच्या टोळींतलींच ?..."

"चूप . कुणी ऐकेल. चल चोर बाजारांत. तिकडे बाबा पंखेवाला तुझी वाट बघतो आहे. हुसन्या न् जमाल देखील आहेत !"

"हो दूर चांडाळणी !" बारकू जोरानें धडपड करून तिला लाथ मारीत म्हणाला—"त्या डांबीस माणसांचं तोंड बघायची माझी इच्छा नाहीं.—तुम्ही

सारे लुच्चे—चोर आहां. मला माहीत असतं तर मी कधींही इकडं फिरकलों सुद्धां नसतों."

वारकूचा आवेश इतका दांडगा होता की ती गायवाली क्षणभर हतबुद्धच झाली. तितक्यांत वारकूनें स्वतःची तिच्या तावडींतून सुटका करून घेतलीं व काय झालें तें त्या बाईच्या लक्षांत येण्याच्या आंत जीव घेऊन पळायलाही सुरूवात केली...

पण त्या दिवशीं वारकूचे ग्रह कांहीं नीट नव्हते असें दिसलें. त्यानें गाय वालीच्या मिठींतून आपली सुटका केली खरी पण आगींतून निघून फुफाट्यांत पडावें तसेंच झालें! भांबावल्यागत पळत असतां तो सरळ बंगालीबाबूच्या कवेंत जाऊन आदळला.

बंगाली बाबूच्या रांकट हातांची पकड तर इतकी जबर होती की वारकूचा जीवच कासावीस झाला. त्याच्या तोंडातून अक्षर फुटेना—

"वा दोस्त! शाबास!!" बंगाली बाबू त्याला अधीक दाबून धरून कासावीस करीत म्हणाला—"काय, झालं काय? पळतोस का असा?"

"कोण? बंगाली-बा-बू? ओय्! सोडा हो मला. का आवळून मारतां असें?

"आवळून मारतों? कधीं? तूंच तर माझ्या अंगाला येऊन धडक देतो आहेस!"

"मी मुद्दाम नाहीं आलों तसा......"

"बरं बरं, पुरें कर हें. चल, बाबा पंखेवाला वाट पाहात आहे तिकडे..."

पुन्हा बाबा पंखेवाला......!

पण ह्या खेपेस प्रतिकाराचें अक्षरही उच्चारण्यास त्याला अवसर मिळाला नाहीं. बाबा पंखेवाल्याचें नांव घेत बंगाली बाबूनें त्याला घट्ट आवळून असें गुद-मरून सोडलें की वारकूला श्वास देखील घेतां येईना—

" येणार ना ?" बंगाली बाबूनें विचारलें.

" ओ-य्‌ ! येतों हो. पण असें आवळूं नका- " बारकू नाइलाजानें कबूल झाला.

बंगाली बाबूनें बारकूचा एक हात घट्ट आवळून धरला. जणूं लोखंडी बेडीच त्याच्या हातांत पडली. बारकू मुकाट्यानें दुसऱ्या हातानें अश्रु पुशीत बंगाली बाबूच्या मागोमाग जांऊ लागला. मागें कांहीं अंतरावर ती गायवाली जणूं आपण त्या गांवचेच नाहीं अशा मुद्रेनें एखाद्या तिऱ्हाइतासारखी चालूं लागली......

काय झालें बारकूचें पुढें ?

★

## प्रकरण १३ वें

# कुठं आहे बारकू ?

संध्याकाळचे आठ वाजले तरी बारकू आला नाहीं. सुंद्रीला काळजी वाटूं लागली. इतका उशीर त्याला कधींच होत नसे. फ़ार तर सात नाहींतर साडे सात. आज पेपर लौकर खपले नसतील का ?

आठाचे साडे आठ झाले. सुंद्रीची काळजी वाढूं लागली. एव्हांना तर यायलाच पाहिजे होतें त्यानें. ह्या वेळ पर्यंत जेवण घेऊन निशात टॉकीजकडे खारी शेंग विकायला जाण्याची तयारी चालायची त्याची. मग आजच का उशीर झाला. कांटा नवाकडे सरकूं लागला घड्याळाचा. तसतशा अनेक शंकाकुशंका सुंद्रीच्या मनांत भीति घालूं लागल्या. तिला आतां कांहीं सुचेना रडें येऊं लागलें. पेपर विकतां विकतां कुठें त्याला अपघात तर झाला नसेल ? मुंबईत अपघातांना काय

तोटा ! ट्रॅम, बसेस, मोटारी ! किती गर्दीतून बारकूला रोज हिंडावें लागतें. कुठें तरी नाक्यावर उभा असेल. पैसे मोजीत असेल. नि तेवढ्यांत एखाद्या वेगानें येणाऱ्या मोटारीखालीं सापडला असेल. नाहींतर एखादा रस्ता ओलांडतांना लौकर लौकर चालतां चालतां केळीच्या सालीवर पाय घसरून तो मध्येंच चपकन् आपटला नि वरून एखादी राक्षसी बस गेली...... !

सुंद्रीला ह्या शंकाकुशंका असह्य झाल्या. ह्या अभद्र शंका आपल्या मनांत सुद्धां येऊं नयेत म्हणून ती त्या मनांतून घालवून देण्याचा प्रयत्न करूं लागली. पण जों जों तसा प्रयत्न करावा तों तों त्या अधिकच जोरानें येऊं लागल्या. बारकूला अपघात झाला किंवा दुसरी कांहीं खोटी झाली तेंच तिला समजेना.

नवाच्या सुमाराला ती निशात टॉकीजकडे जायला निघाली. कदाचित बारकूला कुठें कांहीं कारणामुळे दिरंगाई झाली असली तर तो सरळ टॉकीजकडे जाणें शक्य आहे असें तिला वाटलें असावें.

निशांत टॉकीजचा अजून पाहिला खेळ सुटला नव्हता. सुंद्रीनें तिथें खारी शेंग विकणारीं पोरं होती त्यांच्यापाशीं बारकूची चौकशी केली. पण अजून तो आला नाहीं. शेवटच्या शोंच्या वेळीं त्याची ड्यूटी असते असें तिला सांगण्यांत आलें. अजून अर्धा तास होता. बारकू अर्धा तास आधी कशाला येईल ? प्रथम तो कुठूनही आपणाला येऊन भेटेल नि मग पुढच्या साऱ्या गोष्टी. आपण आतां इकडे आलोंच कशाला. झाला असेल कांहीं करणामुळें त्याला उशीर, येईल एवढ्यांत किंवा आपण आतां इकडे आलों तेवढ्यांत आलाही असेल मागें. आला असेल तर तिकडे तो आपणास शोधीत असेल. आपण त्याला लौकर दिसलों नाहीं तर त्याला रागही येईल कदाचित्. आपणांस तो रागेंही भरेल मग...भरेना का रागें. पण त्याची नि आपली सुखाची एकदां भेट होऊं दे. बारकू, कां रे मला आज अशीं काळजींत ठेवून गेलास !

बारकू प्रथम कुंभारवाडा लेन कडे जाऊन आपली भेट घेईल असेंच सुंद्रीला वाटलें. तसा विचार मनांत येतांच कुंभारवाडा लेनकडे निघाली. गर्दीतून ती प्रत्येक माणूस न्याहाळीत चालली होती. आपण त्याची वाट पाहून थकल्यावर त्याचा शोध करायला निशात सिनेमाकडे गेलों असें त्याला वाटून तो कदाचित् ह्याच दिशेनें आला तर त्याची नि आपली रस्त्यांतच भेट होईल अशी तिला आशा वाटली असावी. पण कुंभारवाडा लेनमधील त्यांच्या त्या जिन्याखालच्या नेहमींच्या जागीं ती येऊन पोंचली तरी बारकूचा मागमूस लागेना. तेव्हां मात्र ती अतिशयच कष्टी झाली. तिला मग मात्र हुंदके आवरेनात. " बारकू, कुठं आहेस रेऽ" असें म्हणून ती हुंदके दे-देऊन रडूं लागली.

खूप खूप रडल्यावर तिला बरेंच समाधान वाटलें. ती पुन्हां उठली. पोटांत भुकेचें नांव नव्हतें. सारखी बारकूचीच काळजी. आतां जवळ जवळ सव्वा दहा तरी वाजले असतील. आणखी एकदां निशांतकडे जायचें असें ठरवून ती त्या दिशेनें पुन्हां निघाली. गोल देवळाच्या आसपासची गर्दी होती तशींच होती. गर्दीतून न्याहाळून पाहात आणि लोकांचे धक्के खात खात ती निशात जवळ येऊन पोंचली. शेवटचा शो सुरू होऊन गेला होता. खारी शेंग विकणारीं पोरं विश्रांतीच्या वेळेची तयारी करण्यांत मग्न झालीं होतीं. सुंद्रीनें भीत भीत आणि डोळ्यांत अश्रु आणून आंत थियटरच्या आवारांत प्रवेश केला. त्या झगमगाटांत तिची ती करूण मूर्ति अधीकच करूण भासली. दोन्ही हातांनीं तिनें आपळे डोळे चोळून अश्रु पुसण्याचा प्रयत्न केला. पण नवीन आंसवे तिथें सारखीं भरतच होतीं.

" बारकू—ए बारकू..."

तिनें रडत रडत हांक मारली.

" ए पोरी—" दरवाजावरचा डोअर कीपर पुढें होत म्हणाला " ए, गडबड मत मचा—"

" माझा बारकू आला का हो इथं ? "

"अरे ए—क्यूं रोती है? क्या शोर है ये सारा?" आणखी मंडळी जमूं लागली.

"बारकू ऽ—"

"अग ए बारके, कुठला बारकू म्हणतेस?" कुणी तरी 'इनोद' करून 'सवता'च हसून दाखवलें.

"इथेंच ह्या खेळाला असतो हो—" सुंद्री रडत रडत म्हणाली. "इथंच तो खारी शेंग विकायला रोज येतो."

"हां—हां—तो बारक्या होय!" कुणाला तरी ओळख पटली. 'तो नवा पोरगा म्हणतेय् ती."

"अरे पण आज नाहीं आला तो कामावर." दुसरा एक पोरगा सुंद्रीची निराशा करीत म्हणाला.

"आला असेल हो, नीट पाहा. आंत असेल तो खारी शेंग विकीत. मी आल्येय् म्हणून सांगा. सुंद्री माझं नांव, सुंद्री रडत्येय्, तुला हाक मारल्येय् म्हणून सांगा. माझा बारकू आतां धावत येईल."

"अग, पण आंत तर खेळ चालूं आहे. आतां कुठला शेंग विकणार!"

"आंत बसला असेल रे नाहींतर खेळ बघत." कुणी तरी शंका काढली. पण लगेच कुणी म्हणालें.—

"नाहीं रे—आलाच नाहीं तो आज—"

सुंद्री कांहीं केल्या तिथून हलेना.

"थांबायचं तर थांब. पण जर का रडलीस तर धक्के मारून घालवून देईन—इथं गडबड नकोय्—तो डोअर कीपर तिला दम देत म्हणाला.

सुंद्री आपला हुंदका कष्टानें दाबून धरीत तिथें उभी राहिली. तोंडांतून आवाज बाहेर पडूं नये म्हणून तिनें तोंडावर हात ठेऊन तें दाबून धरलें. पण अश्रू कांहीं केल्या थांबेनांत. हुंदकेही येतच होते.

विश्रांति झाली. किती तरी लोक बाहेर आले. पण त्यांत बारकू दिसला नाहीं. सुंद्री तशीच दीणवाणी रडत उभी होती. आपला बारकू गेला तरी कुठं ? तो आतां आपणांस पुन्हा भेटणार तरी केव्हां ? त्याला झालें तरी काय ? अपघातच झाला कां ? कुठें शोधायचें आतां त्याला ? बारकू...बारकू...बारकू...कुठें आहेस रे बाबा ? का माझ्यावर रागावलास तरी ? कुठे शोधूं आतां तुला ? एकीकडे हें विचार मनांत चालू होतें नि दुसरीकडे घळघळ घळघळ अश्रु वाहात होतें.

विश्रांति संपली. पुन्हा खेळ सुरू झाला.

"ए पोरी, अजून तूं उभीच कशी ? तो नाहीं आला जा." कुणी तरी म्हणालें. सुंद्री निराश हृदयानें परत फिरली. आतां तिची पावलें अतिशय कष्टानें पडत होती. आशेचा चक्काचूर झाला होता. नाहीं नाही ते विचार तिच्या मनांत येत होते. इतका वेळ उभी राहून राहून ती बरीच गळून गेली होती. कुंभारवाड्यापर्यंत अतिशय कष्टानें ती आली. दादराखालील वळकटी तिनें पसरली आणि त्यावर अंग टाकून दिलें. पुन्हा एकदां अश्रूंना पूर्ण वाट मिळाली. बारकूच्या खूप खूप आठवणी मनांत उसळल्या आणि त्या प्रत्येक आठवणी सरसे हुंदक्यांच्या उमाळ्यांनीं गर्दी केली.

त्या रात्रीं नाहींच आला सुंद्रीचा बारकू. रात्रभर तिनें त्याची वाट पाहिली. किती लांब आणि कंटाळवाणी रात्र वाटली तिला ती ! पण दर मिनिटाला बारकूची चाहूल घेत तिनं ती रात्र जागून काढली. निराशा झाली. सुंद्रीची खूप खूप निराशा झाली सुंद्रीच्या जीवनांत अशी निराशाच एथून तेथून भरली होती का ? असें दुःखच तिच्या वाट्याला देवानें मांडून ठेवलें होतें का ? काय पाप केलें होतें सुंद्रानें देवाचें ? काय अपराध घडला होता सुंद्रीच्या हांतून त्याचा ? देवाचा अपराध करणाऱ्यांच्याच नशीबी असले दुःखभोग येतात का ? की निरपराध गरीब दुबळ्यांना तें भोगणें प्राप्त पडतें ?

काय झालें बारकूचें ? त्या बंगाली बाबूनें त्याला दादा मॅन्शनकडे जबरदस्तीनें नेल्यावर पुढें काय घडलें ? बारकू त्यानंतर सुंद्रीकडे कां येऊं शकला नाहीं ? त्याचें तिकडे काय झालें याची खुंद्रीला कल्पना तरी कशी यावी ? ती आपली आपल्या समजुती प्रमाणें तर्क न् कुतर्क करीत बसली होती !

★

## प्रकरण १४ वें

# दादा मॅन्शन

बंगाली बाबूनें बारकूला दादा मॅन्शनकडे नेले तेव्हां बाबा पंखेवाला, हुसन्या आणि जमाल त्याचीच वाट पाहात होते. त्याला आंत येतांना पाहून बाबा पंखेवाला एकदम हसत हसत पुढें झाला—

" बोलो बच्चा, क्या तबीयत है ?"

" साला पळून जाऊं बघतोय ! " बंगाली बाबू त्याचा हात सोडून देतां देतां त्याला बाबा पंखेवाल्याच्या पुढें ढकलून देत म्हणाला.

" नहीं—नहीं—ऐसा नही—" बाबा पंखेवाला त्या आडदांडाला विरोध करीत म्हणाला—" बंगालीबाबू तुला तर बिलकूल आचर्पेच नाहीं. अशा हाणामारीनं कामं कशीं होणार !सारं कांहीं खुशीनं झालं पाहिजे. अन् ह्याची ना थोडीच आहे आपलं ऐकायला ? हा तरी आपलंच माणूस आहे ! "

" मुळींच नाहीं—" बारकू उसळून म्हणाला—" तुम्हीं सारे खिसेकापू नि चोर आहां ! मी तुमच्या ह्या भुक्कड टोळींत मुळींच राहूं इच्छित नाहीं. जाऊं द्या मला. नाहींतर मी तुमची खबर पोलीसला देईन."

बारकूच्या तोंडून हें वाक्य बाहेर पडायला नि बंगाली बाबूनें त्याच्या कमरेंत एक जोरानें लाथ हाणायला एकच गांठ पडली. त्या लाथेच्या मारासरशीं बारकू धपकन् तोंडावर पडला. बारकुची ती असहाय अवस्था पाहून हुसन्या आणि जमाल फिदी फिदी हसूं लागले. पण धूर्त बाबा पंखेवाला मात्र आपणांस तो प्रकार मुळीं सुद्धां आवडला नाहीं असा अविर्भाव करून बंगाली बाबूवर खफा झाल्याची मानभावी बतावणी करूं लागला.

" बंगाली बाबू, काय हें ! तुला पोलीस मुळीच आवडत नाहींत हें त्या बिचाऱ्याला काय माहीत ! कां त्याला मारतोस उगीच ! नुसतं शद्बांनीं जरी सांगितलें तरी तें त्याला सहज समजेल. तो कांहीं अगदींच मठ्ठ नाहीं. हुशार आहे चांगला. छे छे असं नको करूं—" बाबा पंखेवाल्याचें हें बोलणें ऐकून बारकूला त्याची भयंकर चीड आली. पण बंगाली बाबूची त्यानंतर त्याला इतकी दहशत कीं तो काहींच न बोलतां उभा राहिला.

" छोड दो ये बात बच्चा ! हा बंगाली असाच रानदांडगा आहे. त्याला राग येईल असें करूं नको म्हणजे झालें. सांग त्याला मी असें कांहीं करणार नाहीं म्हणून. " बाबा पंखेवाला पुढे साखर पेरणी करूं लागला.

काय वाटेल तें झालें तरी त्या बदमाश टोळीला आपण सामील व्हावयाचेंच नाहीं असा बारकूनें निश्चयच केला होता. बाबा पंखेवाल्याचें तें शेवटचें वाक्य जणूं त्याच्या दोन्ही कानांतून आरपार गेलें.

" बोल बेटा, बोल......" बाबा पंखेवाला तरीहि वटवट करीतच होता. तिकडे हुसन्या आणि जमाल ह्यांच्या खोडकर हास्याला सारखी भरती येत होती तर बंगाली बाबूच्या संतापाचा पुन्हां एकदां भकीय परिस्फोट होणार अशींहि लक्षणें दिसूं लागलीं होतीं !

" बोल, नहीं तो वो फिर मारेगा, बडा घुस्सेवाला आदमी है. उसको घुस्सा आगया तो फिर बस ! "

" नाहीं, मी तुमचं मुळींच ऐकणार नाहीं. इथं मुळींच थांबणार नाहीं. सोडा वाट. जाऊं द्या मला. "

बारकूनें तेथून निसटण्याचा शेवटचा प्रयत्न करून पाहिला. पण व्यर्थ— बंगाली बाबू त्यावर तुटून पडला. लाथांनीं आणि बुक्यांनीं त्यानें बारकूला बेदम मारलें. आणि शेवटीं तंगडीला धरून ओढीत ओढीत आंतल्या एका खोलींत फेकून देऊन त्या खोलीचें दार बाहेरून बंद करून घेतलें. बारकू आंतून ओरडला, रडला, दारावर त्यानें बुक्के व लाथा मारल्या पण तें दार उघडलें गेलें नाहीं. बुक्के मार मारून थकल्यावर बारकू त्या खोलीच्या एकाकोपऱ्यांत अश्रू ढाळीत पडून राहिला.

बाहेर बंगाली बाबू, बाबा पंखेवाला, आणि हुसन्या व जमाल यांचा हसण्या खिदळण्याचा आवाज बराच वेळ येत होता. बारकूची बंगाली बाबूनें छान जिरवली हाच त्यांच्या त्या हसण्या खिदळण्याचा विषय असावा. बऱ्याच वेळानें मुद्दाम बारकूला ऐकूं जावें ह्या हेतूनेंच जणूं बाबा पंखेवाला बंगाली बाबूला म्हणाला.

" सालेकू ऐसाही बंद रखना. खाना और पीना नहीं देना. फिर देखो क्या करता है ! माना नहीं तो मरने दो... ! ! "

आणि त्यानंतर हुसन्या आणि जमालच्या हसण्याच्या दणदणाटानें तें घर पुन्हां एकदां दणाणून उठलें.

बाहेर शांत झालें. सर्व मंडळी आपआपल्या " उद्योगाला " पुन्हा बाहेर पडली असें बारकूनें ओळखलें. आतां आपलें होणार तरी कसें ? ही मंडळी आपणास सोडून देत नाहीं असें वाटतें. आपण पोलीसांत खबर देऊं या भीतिनें त्यांनीं आपणांस कोंडून ठेवलें हें उघड आहे. पण असें कोंडून तरी कोठवर ठेवणार ? इथंच जर खूप दिवस असें राहावें लागलें तर आपलें कसें होणार ? तिकडे बाहेर सुंदरीचें काय होणार ? ती काय काय तर्क कुतर्क करलि ? आपण परत आलों

नाहीं असें पाहून ती किती हैराण होईल. जेवणार नाहीं. सारखी वाट पाहात राहील ती. आपण असें अचानक नाहींसें झालों. तिला आकाश फाटल्या सारखें होईल. बिचारी गरिब पोरकी पोर ! आहे कोण तिला साऱ्या जगांत आतां आपल्या शिवाय ? कुठें जाणार ती ? कुणाच्या तोंडाकडे पाहील ? आतांच कुठें जरा धड झालेली, आतांच कुठें हिंडूं फिरूं लागलेली. हातापायांत अजून नीट ताकद नाहीं. तिच्यानें कुठें जाववणार नाहीं. कामधंदाही करवणार नाहीं. सुंद्रीचे हाल होणार ! तिला मग उपासही पडतील कदाचीत् ! कशाला आपल्याला ही या चोरांच्या टोळीकडे येण्याची बुद्धी झाली ! कशाला आपण त्या डांबीस माणसावर विश्वास ठेवला ? काय होणार तरी काय आतां आपलं···

बाहेर सर्वत्र शांत होतें. खोलींतली ती शांतता बारकूला अतिशय असह्य वाटत होती. खूप खूप वेळ झाला तरी कोणीही आल्याची चाहूल ऐकूं येईना. 'पेपर' विकून परत कुंभारवाडालेनकडे जाण्याचा समय झाला असेल का ? सुंद्री आतां आपली वाट पाहात असेल का ? तिचा चेहरा आपण दिसत नाहीं म्हणून निराशेनें कोमेजून गेला असेल का ? सुंद्री एखाद्या सुकलेल्या जाईच्या कळी-सारखी मलूल आणि दुःखी दिसत असेल का ? बारकूच्या डोक्यांत विचारांचे काहूर माजलें !

किती तरी युगें लोटल्यासारखा दीर्घकाळ अशा प्रक्षुब्ध मनःस्थितींत गेल्यावर बारकूला खोली बाहेर कुणाची तरी चाहूल ऐकूं आली. कोण आलें होतें ? त्याच्या त्या खोलीचें बंद दार हळूच उघडूं लागलें. बारकू सावरून बसला. दार उघडतांच आंतला अंधार निवळून बाहेर असलेल्या त्या मोठ्या खोलींतला विजेच्या दिव्याचा प्रकाश आंत आला, त्यावरून तो दिवस संपून रात्र झाल्याचें त्याच्या लक्षांत आलें.

दार उघडून ती रस्त्यावरची नखरेल बाई—ती गायवाली आंत आली. तेव्हां बारकूच्या कपाळावर आंठ्या पडल्या. पण त्यांच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करीत ती गायवाली हसत हसत त्याला म्हणाली—

"अजून कुणी आलेलं नाहीं, तोंवर मी तुझ्यासाठीं थोडंसं जेवण आणलं आहे तें खा. मघापासून इथं पडला आहेस. तुला भूक लागली असेल. तोंड कसं सुकून गेलं आहे तुझं !"

"पण बाई, तूं आहेस तरी कोण ? कां तूं माझ्या पाठीशीं लागली आहेस ?"

मी कुणीही असो, त्याची विचारपूस करूं नको. मघाशीं मी तुला त्या पोलीसांच्या हांतून सोडवलं तें बाबा पंखेवाल्याच्या नि बंगालीबाबू वगैरेंच्या सांगण्यावरून सोडवलं असलं तरी तुला तें अशा निर्दयतेनें उपाशीं मारूं बघतात हें मला पसंत नाहीं."

क्षणभर ही बाई बोलतें तें सर्व खरें की बनावट नाटक याचा बारकूला कांहींच उमज पडेना. तो गोंधळून पाहूं लागला. त्या बाईच्या लक्षांत बारकूचा तो गोंधळ तेव्हांच आला असें दिसलें. ती त्याला पुढें म्हणाली—

"तुझा अजून माझ्यावर विश्वास बसत नाहीं. असें दिसतें. बघ, मी तुला तुझ्याच हिताचं सांगतें आहे. तुझ्या अनहिताचं मी कशाला कांहीं करीन ! मी का तुझी दुष्मण आहे. हे लोक तूं जर त्यांचं ऐकणार नसशील तर तुला असेंच उपाशीं मारून टाकायला कमी करणार नाहींत. पाहा, तूं चांगला समंजस मुलगा मला दिसतो आहेस. तूं तुझें हित पाहा नि काय तें ठरीव. तें सांगतील त्याला हो म्हण. बाबा पंखेवाला शिकवील तें शीक आणि हुसन्या नि जमाल सारखा चैनींत राहा.'

"शक्य नाहीं तें." बारकू तिरस्कारानें ओरडला. "त्या पेक्षां मी इथं उपाशीं मेलों तरी बेहेत्तर. मी मुळींच चोऱ्या करणार नाहीं."

"तुझी इच्छा. मी तुला तुझ्या हिताचा सल्ला दिला आहे. मला हीं माणसं माहींत आहेत म्हणून मी तुला हा सल्ला दिला. तूंच पुढें पस्तावशील. माझं काय जातं आहे !"

पुन्हा ती बाई आली तशी मागें फिरली. जातां जातां तिनें पुन्हा एकदां बारकूचें तें दार बाहेरून पक्कें बंद करून घेतलें. आणि पुन्हा एकदां त्या लहानशा खोलींत काळोखाचें साम्राज्य सुरू झालें.

★

## प्रकरण १५ वें

# सिने-सुंदरी उषाराणी !

रात्र भर सुंद्रीच्या डोळ्याला डोळा लागला नाहीं की डोळ्यांचें पाणी खळलें नाहीं. बारकूच्या किती किती आठवणी तिला सारख्या होऊं लागल्या. तिचं पूर्वींचं सारं सारं दैन्य आठवलं. त्या म्हाताऱ्या थेरडीनं तिला किती छळलं. तिच्या शरीराची कोण दशा केली. जन्म आपला असाच रडण्यांत नि वेदना सहन करण्यांत जाणार का ? बारकू तिच्या जीवनांत आल्या पासून तिला केवढी आशा वाटूं लागली होती. आकांक्षेचें काय प्रचंड मनोरे त्या चिमकुल्या जीवानें रचले होते. आपलें नष्टचर्य संपलें. आतां आपणांस बारकू मिळाला. बारकू आपणांस काय कमी पडूं देणार ? हातांतल्या फोडा प्रमाणें तो आपली काळजी घेतो. नेत्राचा दिवा करून त्यानं आपली शुश्रुषा केली. आपण जन्मांत बिछाना सोडणार नाहीं असें आपणांस वाटत होतें, पण ह्याच बारकूनं जुना भीमजी शोधून काढून आपली ती दुखरी पाठ होती की नव्हती अशी केली. आपण पुन्हां हिंडूं फिरूं लागलों. किती किती आग्रह कर करून त्यानं आपणांस खा—खा करून काय काय खाऊ घातलं—कुठं गेला आपला बारकू ? देवा, कुठं आहे रे माझा बारकू ?

बारकूनें कालच घेतलेलें परकर-पोलकें सुंद्रीनें हलक्या हातानं मांडीवर घेतलें. आपल्या अश्रूंनीं तें भिजवून काढलें. बारकूच्या तिच्यावरील प्रेमाचें तें प्रतीक. किती वेळ ती त्या परकर-पोलक्याकडे तशा साश्रु नयनांनीं पाहात बसली. त्याला कुरवाळीत बसली.

हेंच परकर-पोलकें काल आणायला जातां जातां रस्त्यांत बारकू म्हणाला होता.

"आपण आतां जन्मभर एकत्रच राहाणार हो सुंद्री. तुला नि मला आतां कोण दूर करणार एकमेकांपासून !"

बारकू काल इतका आत्मविश्वास दाखवून तूं बोलत होतास, मग रात्रीं-तूनच तें बोलणं कसं रे फोल ठरलं ? कुठली शक्ती आली नि तिनें तुझी नि माझी ताटातूट केली ?

"सुंद्री, कुणी तुझी माझी ताटातूट करूं लागला त्याला तशी ताटातूट करूं देऊं तेव्हां ना ? आपण मुळींच एकमेकांपासून दूर राहाणार नाहीं।" बारकू पुढें म्हणाला होता. बारकू, ये ना रे लौकर. तुझ्या सुंद्रीला तुझ्या वाचून फार वेळ ठेवूं नकोस या पुढें. अगदी लौकर लौकर ये......

टप् टप् टप् टप् !......

सुंद्रीच्या गालावरून मोत्याचा अभिषेक चालूंच होता. पण नाहींच आला त्या रात्रीं बारकू.

दुसरा दिवस उजाडला रोजचीच मुंबई होती पण सुंद्रीला आज वाटलें हीः मोठी नगरी आज आपल्या सारखीच शोकविव्हल झालेली दिसत आहे. रस्त्यानें जाणारी माणसें आपल्या शेजारच्या माणसांकडे न बघतां न बोलतां चाललीं आहेत तें बारकूच्या विरहानें व्याकूळ होऊन व्यग्र मनःस्थितींत तशीं चाललीं आहेत, दूर अंतरावरून ट्रॅम गाडीचा चीत्कार ऐकूं येत आहे, ती देखील बारकूचा भिरी भिरी शोध करीत त्याला आर्त स्वरानें हांका मारीत म्हणत आहे—"ए ऽ ऽ ऽ बारकू, कुठं आहेस ? लौकर ये ऽ ऽ—"

दादराखालून ती रेंगाळत बाहेर पडली. रात्रीं रडून रडून तिचें डोळे सुजले होतें. गालावर अश्रुंचे ओघळ पुसून गाल लालबुंद झाले होतें. पाय नेतील तिकडे ती जात होती. बारकू कुठें तरी अपघातांतच सांपडला. त्याची आणि आपली भेट आतां या जन्मीं नाहीं. असें तिचें एक मन अतिशय विव्हळून रडक्या आवाजानें तिला सांगत होतें. पण दुसरें मन तिला तशा निराशेंतही धीर देत होतें. अपघातांत सांपडला तरीं बारकू एकदम मेलाच असेल असें नाहीं. नुसता जखमीच झाला असेल. त्याला कदाचीत् मोठी जखम झाली असेल नि चालवत नसेल. कुणी तरी

त्याच्या त्या असहाय अवस्थेंत दया येऊन आधारही दिला असेल. जरा आराम पडतांच तो पुन्हा येईल. पुन्हा त्याची नि आपली भेट होईल......

ह्या आशादायक विचारा सरशीं सुंद्रीच्या मलूल चेहेऱ्यावर जरा टवटवी आली. तसें असलें तर किती छान होईल. जरा उशिरानें का होईना, पण तो आपणांस भेटेल. आपण त्याला मग घट्ट धरून ठेवूं आणि सांगूं आतां नकोरे मला सोडून जाऊस एकटा ! मी तुझी किती किती वाट पाहिली. किती किती रडलें मी तुझ्यासाठीं आतां तूं जिकडे जाशील तिकडे मलाही बरोबर घेऊन जा. 'पेपर' आणायला देखिल मी तुझ्या बरोबर येईन. मी देखील पेपर विकूं लागेन. हसतोस काय असा ! खोडकर कुठला ! खरंच मी विकूं लागेन पेपर. खारी शेंग देखील विकूं लागेन तुला सिनेमांत. अन् बाबा पंखेवाल्याला तूं सांग. म्हणावं आतां आज पासून आमची सुंद्री देखील येणार माझ्या बरोबर. जिथं बारकू तिथं सुंद्री. बारकू सलामत तर सुंद्री सलामत. आणि अपघातांतच सांपडायचं तर असं नको. एक एकी कडे तर दुसरें भलतीकडेच ! ..."

विचार करतां करतां सुंद्री गोल देवळापाशीं आली. गोल देवळापाशीं बारकूच्या वयाचीं किती तरी मुलें सकाळचीं पत्रें विकीत फिरत होतीं. ह्या मुलांनीं काल संध्याकाळीं बारकूला पाहिलें असेल का ? त्याला अपघात वगैरे झाला असला तर ह्यांना माहीत असेल का ? सुंद्री भीत भीत त्यांना विचारूं लागली "ए पोरांनो, बारकू पाहिला का रे कुठें ?" "बारकू ? कोण बारकू ? हां–हां–तो पोरगा होय ? तो होता की काल. आज नाहीं दिसला. काल पाहिला सकाळीं...संध्याकाळीं नाहीं बुवा आठवत...नाहींच पाहिला त्याला काल संध्याकाळीं...कुठं गेला ? तूं कोण त्याची ?"

वरील प्रश्नांचींच उत्तरें सुंद्रीला मिळत गेल्यानें तिची सारखी निराशा होत गेली.

सुंद्री गोल देवळाभोवतींच सुमोर एक वाजेपर्यंत फिरली. काल पासून तर आतां पर्यंत जवळ जवळ २४ तास तिच्या पोटांत कांहीं गेलें नव्हतें. त्यांतच रड-

ण्याचे श्रम झालेले. तिला भोवळ आल्यासारखें झालें. कुठें तरी खालीं बसावें नि डोळे घट्ट मिटून घ्यावें असें वाटूं लागलें. चार दोन पावलें नेट धरून ती चालली आणि गोल देवळाच्या रूंद पायरीवर तिनें बैठक मारली. डोळे मिटून घेतले. तरी .ही भोंवळ कमी होईना. तेव्हां ती तिथेंच जरा लवंडली. बराच वेळ ती तिथें तशी पडून होती. पडल्या पडल्याच त्या फरशीवर तिला झोप लागल्यासारखें झालें. जरा वेळानें एक टांगेवाला घोड्याला पाणी पाजायला तिथें आला. पोरगी रस्त्यांतच पडलेली पाहून त्याला दया आली. त्यानें हळूच तिला उचललें आणि गोल देवळाच्या बाजूनें बराच रुंद फरशीचा कंगोरा आहे, त्यावर सावलींत तिला त्यानं ठेवून दिलें······

सुंद्री खूप वेळ तिथें झोपून होती.

सुंद्री जागी झाली तेव्हां रात्र झाली होती. दिवे लागले होते. माणसांची गर्दी वाढली होती. रात्रीं रात्रभर आपण जागे होतों म्हणून आपणांस अशी झोंप लागली हें तिनें ओळखलें. पोटांत आतां खूपच कावळे कोकलूं लागलें. पण जवळ एक पैसा सुद्धां नव्हता.

सुंद्री तेथून उठली आणि निशांतच्या दिशेनें चालूं लागली. आज तरी बारकू तिकडे आला असेल असें तर तिला वाटलें नाहीं ! की कुठें तरी जायचें म्हणून ती तिकडे निघाली ?

निशांत टॉकीजच्या झगमगाटांत ती पुन्हा येऊन उभी राहिली. पहिला शो संपला होता––आतां शेवटच्या शोला सुरुवात होणार होती. सुंद्रीने आतां बारकुची चौकशी मुळींच केली नाहीं. असला तर दिसेल असें तर तिला वाटलें नाहीं ! काळचीं तीं पोरं आजही तिथें हसत खिदळत होतीं. कुणी दंगा करीत होतीं, कुणी पानं खाऊन पचापच थुंकत होतीं. कुणीही सुंद्रीची पूसतपास करायची तसदी घेतली नाहीं.

असा जरा वेळ गेला. सिनेमा बघ्यांची गर्दी आवारांत वाढत होती. त्या गर्दीत ही लहान पोरगी सुंद्री कुठं चिचुंद्री सारखी गडप झाली.

सिनेमा थिएटर बाहेर एक कोरी करकरीत मोटर येऊन उभी राहिली. ह्या मोटारींतून अतिशय ऐटबाज पोशाक केलेली एक थलथलीत शरीराची बाई खाली उतरली. तिच्या पाठोपाठ एका झिप्र्या काळ्या कुत्र्यानें बाहेर उडी घातली आणि नंतर एक तरतरीत चेहेऱ्याचा आणि मानेपर्यंत केस वाढवलेला बंगाली पद्धतीनें पोशाक केलेला तरुण खालीं आला. थिएटर मधील लोकांत त्या तरुणीला पाहून एकच गडबड उडाली. जो तों तिला पाहाण्यास पुढें सरसावूं लागला. जो तो म्हणूं लागला—

"सिनेसुंदरी उषा राणी! "

" हीच का तीं ?"

" बरोबर हीच ती..."

" आज पाहिली बुवा समक्ष ! मस्त आहे रे दिसायला !"

" तुला एखादी म्हैस देखील उद्या मस्त दिसेल, उल्लू बेटा ! "

सिने सुंदरी उषाराणी आपणाकडे सारी आजुबाजूची दुनिया कौतुकानें पाहात आहे या जाणिवेनें धन्य धन्य होत थिएटरकडे येऊं लागली. ती पुढें येतांच तिचा मार्ग अडवून राहाणारीं माणसें भराभर बाजूला झालीं नि तिला पुढें येण्यास वाट करून देऊं लागलीं......

सारी गर्दी बाजूला हटली पण सुंद्री...?

सुंद्री आपल्या बारकूच्याच काळजींत चूर होती. तिला आजुबाजूचें भान नव्हतें. अतिशय दीनवाण्या मुद्रेनें ती होती तिथेंच उभी होती. मुळींसुद्धां ती हलली नाहीं.

सिनेसुंदरी उषाराणी, तिचें तें झिप्रे कुत्रें आणि तो तरूण पुढें आलीं. आणि सुंद्रीपाशीं येऊन थांबलीं—

" मिस्टर अभयकुमार, हें बघा तुमचें नवें फ्राईड " उषा राणी त्या तरुणाला म्हणाली—' पऱ्याची चाळ ' ह्या कथानकांतली हीच ती रखमी. छोटी रखमी ही नि मोठी रखमी मी..."

डायरेक्टर अभयकुमार पुढें झाला. सुंद्रीचें त्यानें आपाद मस्तक निरीक्षण केलें. तिची ती करूण मूर्ति त्याच्या पसंतीस उतरली. त्यांच्या चेहेऱ्यावर संतोष झळकला.

"ठरलं..." अशा अर्थानें त्यानें चुटकी वाजवली.

"काय नांव तुझं मुली?" उषाराणीनें विचारलें. सर्व लोक आचंब्यानें पाहूं लागलें. "ए बाळ, सांगना. भिऊं नको अगदीं. काय हवं तुला?"

"माझा बारकू हवा. त्याच्यावाचून मला दुनियेंत कुणाचाही आधार नाहीं. बारकूला—शोधतेय् हो मी माझ्या—"

"कुठं गेला बारकू?...उगी उगी, रडूं नको."

"कालपासून तो नाहीं. पेपर आणायला गेला पण परत आलाच नाहीं. ह्या सिनेमांत तो खारी शेंग विकायचं काम करतो. कुठं गेला हो तो ऽ..."

"आपण शोधूं अं त्याला. कुठं राहातेस तूं? रडूं नको हो अगदी. पूस पूस ते डोळे."

"आम्हीं त्या तिकडं राहातों एका दादराखालीं. तुम्ही शोधून काढाल का हो त्याला?"

"हो बरं मी नि आपण त्याला शोधून काढूं. हें बघ, आतां नको रडूं. चल, आपण त्या मोटारींतून त्याला शोधायला जाऊं अं, चल..."

सुंदरीला घेऊन डायरेक्टर अभयकुमार आणि सिनेसुंदरी उषाराणी परत मागें वळलीं आणि त्या कोऱ्या करकरींत गाडींत बसून भूरदिशी कुठें निघून गेलीं!

बघे आश्चर्यानें आ करून बघतच राहिले.

★

## प्रकरण १६ वें

# बारकूचें काय झालें ?

ती नखरेल बाई निघून गेल्यावर बराच वेळ बारकू त्या बंद खोलींतील काळ्या काळोखांत आणि भयाण शांततेंत पडून होता.

खोलीच्या बाहेर कुणाची तरी चाहूल ऐकूं आली. हसण्या बोलण्याचा आवाज ऐकूं आला. बाबा पंखेवाला, बंगाली बाबू, हुसन्या आणि जमाल ही सारी मंडळी परतली असावी. ही मंडळी आतां आपणांस पुन्हां एकदां छळणार का ? पुन्हां एकदां आपली फजेती करून वर फिदीफिदी हसणार का ?

बारकूला फार वेळ शंका काढीत बसावेंच लागलें नाहीं. खोलीचें दार उघडलें गेलें. हातांत ताट घेऊन बाबा पंखेवाला आंत आला. हुसन्या आणि जमाल यांच्या हसण्याचा ध्वनी बाहेरून येतच होता.

"उठो बच्चा—" बाबा पंखेवाला म्हणाला. " चलो ये खाना खाव. भूख लगी होगी."

" मला खाना बिना कांहीं नको. मला सोडून द्या. मी तुमच्या कंपूंत राहूं इच्छित नाहीं. मी तुमचं नांव कुणाला सांगणार नाहीं. इथलं कांहीं कुठं बोलणार नाहीं. पण मला सोडा. तुमच्या पायां पडतों. सुंद्री माझी तिकडे हैराण झाली असेल. ती माझा शोध करीत असेल. तुम्हांला जरा सुद्धां कशी दया माया नाहीं हो !..."

"अब क्या कहूं ! तो बंगाली मोठा खराब माणूस आहे !" बाबा पंखेवाला म्हणाला—" बिचाऱ्या अच्छया छोकऱ्याला इतका हैराण करून सोडला त्यानें. बेटा, तूं फिकीर मत कर. मी तुझी सुटका करीन. मी......"

५९३०
१८०
३२८



१९५

बाबा पंखेवाल्याला फाड फाड बोलावें नि त्याच्या त्या मानभावीपणाचा निषेध म्हणून त्याच्या तोंडावर तिरस्कारानें थुंकावें इतका संताप बारकूला आला. पण आतां पर्यंत त्रागा करून भागत नाहीं हें त्याला समजून आलें होतें. मोठ्या प्रयासानें त्याला आपला सारा संताप गिळून घ्यावा लागत होता.

" तूं ये रोटी तो खा ले बेटा—फिर देख मैं क्या कर सकता हूं। अब वो बंगालीको एसा डाट दंगा........"

" मला भूक नाहीं. सुंद्री तिकडे उपाशींच असेल. माझी वाट पहात असेल. तुमच्या मी पाया पडतों. मला जाऊं द्या......"

पण त्यावर बाबा पंखेवाला कांहीं बोलायच्या आंतच बंगाली बाबू डोळे लाल भडक करून दांत ओठ चावीत आंत आला.

" तें पोरटं असं सामोपचारानें नाहींच वठणीवर यायचं. त्याला माझाच कायदा हवा. तरच तें सरळ येईल. "

बंगाली बाबू असें ओरडतांच जणूं आपण त्याला फार भ्यालों असें दाखवीत बाबा पंखेवाला दचकून मागें सरला. व बंगालीची समजूत करीत लटक्याच अजीजीनें त्याला म्हणाला—" बंगाली बाबू, बच्चा है. छोड दो. वो मानेगा. वो जरूर मानेगा. "

"नहीं मानेगा वो. मरूं दे त्याला उपाशींच. नका देऊं त्याला जेवण कुणी."

एखाद्या आज्ञाळू सेवकाप्रमाणें बाबा पंखेवाल्यानें तें ताट उचलून निमूटपणें बाहेर पोबारा केला. हुसन्या आणि जमालनें हळूच डोंकावून आपली अतिशय करमणूक होत आहे असें हास्य केलें आणि एक जळजळीत दृष्टिक्षेप करून बंगाली बाबूनें पुन्हां तें दार बंद करून घेऊन बारकूला उपाशीच आंत कोंडलें.

ती सबंध रात्र बारकूलाही झोप आली नाहीं. स्वतःचा जिव धोक्यांत असूनही त्याला त्याच्या जिवापेक्षाही सुंद्रीचीच काळजी अधिक वाटली. रात्रभर सुंद्रीचें

३०६७० बा.वा. २८८ बा७४

करून स्थितींतलें कल्पना-चित्र त्याच्या समोरून हललें नाहीं. ह्या लोकांनीं आपणांस इथेंच कोंडून मारून टाकलें तर ? सुंद्रीचें कसें होणार ? त्याला अतिशय भीति वाटली. ती कल्पनाच त्याच्यानें सहन होईना. त्यापेक्षां ह्या लोकांना हवें तें करायला आपण तयार झालों तर जीवंत तरी सुटूं. पुन्हां सुंद्रीची नि आपली भेट होईल. एकदां कोणत्याही मिषानें का होईना इथून बाहेर तर पडूं या. बाहेर पडलों कीं हर प्रयत्नानें आपण त्यांच्या हातावर तुरी देऊं. पुन्हां त्यांच्या तावडींत सांपडणार नाहीं. आतां हाच एक उपाय दिसतो. उगीच हट्ट धरला तर इथं जिवाला मुकावें लागणार....

रात्रभर अशा रीतीनें विचार करून बारकूनें निश्चय ठरवला आणि सकाळीं पुन्हां खोलीचें दार केव्हां उघडतें याची वाट पाहात तो तसाच बसून राहिला.

सकाळ झाली. बारकूच्या खोलीचें दार उघडलें. बाबा पंखेवाला त्याच्या खोलींत आला. खोली बाहेर येऊन त्या मोठ्या दिवाणखान्यांत बसण्याची खूण बाबा पंखेवाल्यानें त्याला केली. हुसन्या, जमाल नि तो बंगाली बाहेर निघून गेलेलें दिसलें.

" आतां कुणी इथं नाहीं. मी नि तूंच आहों. तूं उपाशीं मरावं अशी माझी मुळींसुद्धा इच्छा नाहीं. तूं थोडी न्याहारी तरी कर. तो बंगाली गेला आहे तोंवर पोटाला थोडा आधार कर. तो आल्यावर माझें कांहीं चालत नाहीं. " बाबा पंखेवाला नाटकी कळकळ दाखवीत म्हणाला. " आमचं नाहीं ऐकलंस तरी हरकत नाहीं. पण जेवण तर घेशील ? तुझ्याच हिताचं मी सांगतों आहें. "

सुंद्री अजून उपाशींच असेल हें बारकूला माहीत होतं. आपण इथं. तिच्याजवळ एक पैसा देखील नाहीं. तिला कोण खाऊं घालणार ? क्षणभर सुंद्री तिकडे उपाशीं असतांना आपण इकडे खावें हें त्याला बरें वाटेना. पण आपण जर खाण्यास नकार दिला तर रात्रीं इथून निसटण्याचा जो आपण बेत केला तो पार कसा पाडतां येणार ? ह्या लोकांना कुठली दया माया ? आपणांस हे

इथेंच कैद करून ठेवलं आहे तसेंच आणखी किती तरी दिवस ठेवतील. मग सुंद्रीचें कसें होणार ? त्यापेक्षां आपणांस आपल्या कालच्या वर्तनाचा पस्तावा झाला असें दाखवून ह्यांच्याशीं बतावणी करायची. ह्यांच्या म्हणण्याला कबूल आहे असें दाखवायचें आणि थोडी अनुकूल संधी मिळाली की निसटायचें असें त्यानें ठरवलें.

" खावोगे ना ? " बाबा पंखेवाला पुढें विचारीत होता. कठीण मन करून बारकू म्हणाला,

" हां, खातों. आणा .. "

बाबा पंखेवाल्यानें लगबगीनें चहा, लोणी लावलेलें पावाचे तुकडे वगैरेंचें ताट त्याच्यापुढें ठेवलें.

" शाबास बेटा ! मुझे मालूम था, तूं दूसरे लडके जैसा थोडा है ? तूं मानेगा. और जरूर अच्छी बात है वो सुनेगा ! "

बारकूनें त्या पदार्थांवर ताव मारायला सुरवात केली.

" और ये सब तेरेही भलाईकी बात हैं. " बाबा पंखेवाल्याचें चऱ्हाट चालूच होतें—" तूं सुनेगा, सीखेगा तो शेर जैसा आदमी होगा. एकदम मालदार बनेगा. ऐष और आराम करेगा. है ना बेटा ? "

" हो. " बारकू म्हणाला.

" मुझे बडी उमीद है बेटा. वो दुसऱ्या जमाळ से तुम बडे अक्कल मंद हो. वो तो साले बडे बेवकूफ ! "

बाबा पंखेवाल्याची ती सारी वटवट ऐकत ऐकत बारकूनें त्याच्या पुढ्यांतले सारे पदार्थ संपवून टाकले.

" अच्छा बेटा, वो साला अब आयेगा तो गुस्सा करेगा—" असें म्हणून बाबा पंखेवाल्यानें बारकूला पुन्हा त्या आंतल्या खोलींत जाण्यास सांगितलें आणि पुन्हा एकदां त्या खोलीचें दार बंद करून घेतलें.

 २८९२ 

त्या दिवशीं दुपारचें जेवण त्या नखरेल गायवालीनें त्याला आणून दिलं आणि जेवून संपल्यावर पुन्हा बंगाली बाबूची भीति घालून त्याला कोंडून टाकलें. रात्रीं पुन्हा बाबा पंखेवाल्यानें जेवण देऊन कोंडलें आणि त्यानंतर कांहीं दिवस हाच प्रकार लागोपाठ नियमानें चालूं झाला.

सकाळ दुपार, संध्याकाळ तिन्ही सांजचें जेवण घेण्यापुरतें त्या समोरच्या मोठ्या खोलींत यायचें नि पुन्हा कोंडून पडायचें हाच बारकूचा कित्येक दिवसपर्यंत जीवनक्रम बनून गेला. ह्या लोकांच्या मनांत तरी काय आहे तेंच बारकूला समजेना. सुंद्रीची काय अवस्था असेल त्याची कल्पनाही त्याच्यानें करवेना रोज तो बाबा पंखेवाल्याची विणवणी करी—

"तुमचें अथवा त्या भयंकर बंगाली बाबूचें काय वाटेल तें काम असो, मला तुम्ही तें सांगा. मी तें करीन पण येथून माझी सुटका करा. मला माझ्या सुंद्रीला भेटूं द्या."

पण त्यानें तशी विणवणी केली की तो धूर्त बाबा पंखेवाला म्हणे.

"बेटा, मै क्या करूं ? वो बंगाली बडा गुस्सेवाला है। मेरा कुच्छ नहीं चलता."

आपलें आतां होणार तरी काय हेंच त्या बिचाऱ्या पोराला कळेना !

★

## प्रकरण १७ वें

# सुंद्रीची "बेबी सौंदर्यप्रभा" झाली !

सिनेमा सुंदरी उषाराणी आणि सिनेदिग्दर्शक अभयकुमार ह्यांनी सुंद्रीला मलबार हिलकडे मोटारीतून नेलें. एका प्रशस्त दिवाणखान्यांत हें त्रिकुट येऊन

पोंचलें. दिवाणखाना अगदी अद्यावत धर्तीनें शृंगारलेला होता. तेथला तो थाट पाहून सुंद्री तर भेदरूनच गेली. पण तिला धीर देत उषाराणी म्हणाली—

"भिऊं नको अं बाळ. तूं बरीच थकलेली दिसतेस. भूक लागली आहे तुला, होय ना? चल मी तुला जेवायला द्यायला सांगतें."

एका खुर्चीत सुंद्रीला बसवून उषाराणी आंत गेली आणि लगेच परत येऊन म्हणाली.

"मिस्टर अभयकुमार, तुम्हीही जरा आंतच चला ना. बरीच भुकेलेली दिसते ही. हिला कांहीं खाऊं घालूं या. तिथंच बोलूं."

तिघेही आंतल्या भागीं जेवणाची खोली होती तिकडे गेलें. उषाराणी बरीच प्रेमळ बाई दिसली. तिनें सुंद्रीचें तोंड धुतले, केंस विंचरलें आणि तिला घेऊन ती टेबलावर गेली तेथील पदार्थ ती स्वतःच्या हातानं सुंद्रीला चारूं लागली. सुंद्री खूपच भुकेली होती. तिनें मुळीच आढे वेढे न घेतां जें तोंडांत पडेल तें मिळायचाच सपाटा लावला.

"नांव काय बेबी तुझं?"

उषाराणीनं तिला प्रेमळ स्वरानें विचारलें.

"सुंद्री!"

"सुंद्री!" अभयकुमार नाक तोंड मोडून म्हणाले.

"छे, हें कुठलं चमत्कारिक नांव! हें नांव नाहीं ठीक."

"हें नको असलं तर तिला आपण दुसरं नांव देऊं. त्यांत काय एव्हढंस! नटांची नांवं नाहींतरी उसनीच असतात. माझं नाहीं उमीचं 'सिने सुंदरी उषाराणी' झालं. तसंच हिचंही नांव आपण बदलून एखादं फक्कडसं नांव ठेवूं की झालं काम!"

"पण तेंच कोणतं ठेवणार?"

"बेबी सौंदर्यप्रभा कसं काय वाटतंय ?"

"ब्यूटी !" अभयकुमार उद्गारले. "हेंच नांव ठरवूं. उद्यांच देतों वर्तमानपत्रांतून जाहीर करून. अन् अशी मस्त जाहिरात करतों की ज्याचं नावं तें !"

"पण नुसतंच नांव काय देतां ? नांवाबरोबर फोटो नको का ? कांहीं फोटो उद्याच्या उद्या काढून झटपट ब्लॉक देखील करवून घ्यायला हवेत."

"उद्यां सकाळीं पहिलं काम ह्या सौंदर्यप्रभेला घेऊन स्टुडिओंत जायचं हेंच !" अभयकुमार उद्गारले आणि त्यांनीं उषाराणीचा निरोप घेतला.

यथास्थित जेवून झाल्यावर उषाराणीनें सुंद्रीला एका मऊ मऊ बिछान्यावर नेऊन ठेवली आणि सुंद्रीनें आपलें कृतज्ञतेनें भरलेलें नेत्र मिटल्यावर स्वतः तीही जाऊन दुसऱ्या एका बिछान्यावर पडून झोपी गेली.

मघाशीं सुंद्रीनें डोळे मिटले, पण तिला कांहीं झोप लागली नव्हती. उषाराणी जातांच तिनें पुन्हा डोळे उघडले आणि अश्रुविमोचन सुरू केलें. बारकूचा शोध ही मंडळी खरोखर लावणार का ? बारकू खरोखर पुन्हा सांपडेल का ? नाहीं सांपडला तर काय करायचें ? ही प्रेमळ बाई कोण आहे ? आपणांस तिनें इतका जिव्हाळा का दाखवला ? तिच्या त्या सुंदर सुंदर मोटारींतून आपणांस तिनें इकडे कसें आणलें ? किती मोठें मोठें आणि सुंदर आहे हें घर ? आणि हा अंगाखालचा बिछाना किती मऊ मऊ नि सुंदर आहे. ह्याच्यावर किती स्वच्छ कपडे आहेत. आपल्या मळीण कपड्यांचा त्यांना डाग पडेल.······ बारकूचा जर शोध लागला नाहीं तर ही प्रेमळ बाई आपणांस इथेंच ठेवून घेणार आहे का ? — पण बारकूचा शोध लागला पाहिजे. बारकूचा शोध लागला तर रस्त्याच्या थंड फरशीवर देखील आपणांस अधीक सुख वाटेल त्याच्या बरोबर. बारकू······बारकू, कधीरे तूं मला पुन्हा भेटशील··· ?"

पुन्हा अश्रु···पुन्हा हुंदकें···

रडत रडतच ती केव्हां तरी मग झोपी गेली······

सकाळींच उषाराणीनें सुंद्रीला उठवलें. सुंद्रीला उठवतांना उषाराणीनें तिला हांक मारली—

" बेबी सौंदर्यप्रभा, अग, ऊठ ना—"

बेबी सौंदर्यप्रभा ?

म्हणजे ही कोण बेबी सौंदर्यप्रभा ?

सुंद्रीनें डोळे उघडून आजुबाजूला पाहिलें. उषाराणी शिवाय तेथें कोणी नव्हतें आणि सुंद्रीकडेच हसत हसत पाहात ती तिला उठवत होती.

" अग तूंच. तुलाच मी हांक मारली."

" काय ?"

" बेबी सौंदर्यप्रभा—"

" पण माझं नांव नाहीं तें. माझं नांव तर सुंद्री आहे."

" सुंद्री नांव नाहीं छान. खेडवळ नांव तें. मी रात्रीपासून तुझं नांव सौंदर्यप्रभा ठेवलं आहे.—बेबी सौंदर्यप्रभा ! "

" पण सुंद्री नांव का नाहीं चांगलं ?" सुंद्री बुचकळ्यांत पडून म्हणाली. बारकू तर म्हणाला होता सुंद्री नांव फक्कड आहे म्हणून ! "

" फक्कड आहे ग, पण अप टु डेट नाहीं !" उषाराणी म्हणाली. " सौंदर्यप्रभा कसं मस्त नांव आहे. अगदीं सिनेमा नटीला शोभेल असं कलात्मक आहे."

" काय म्हणालात तुम्ही ? "

" तुला सौंदर्यप्रभाच छान नांव आहे. रात्रीं अभय कुमार देखील खुष झाले तें नांव ऐकून. आज तुझी ते त्या नांवानेंच सगळीकडे जाहीरात करणार आहेत ! "

" कोण काय करणार आहेत ? "

" अभयकुमार ग—" उषाराणी म्हणाली. " भारीच बाई तूं. ते नाहीं का रात्रीं इथं आपल्याबरोबर आले. मोठे मोठे दिग्दर्शक आणि निर्माते आहेत ते. " पत्र्याची चाळ " म्हणून एक पिक्चर काढणार आहेत त्यांत ते तुला रखमीचं काम देणार आहेत. म्हणून तर तुला इकडं आणली. तूं छोटी रखमी नि मी मोठी रखमी—समजलीस ? "

सुंद्रीची जरा निराशाच झाली. ह्या बाईनें आपणांस इकडे आणलें तें बारकूचा शोध करून द्यायला असेंच तिला आतांपर्यंत वाटत होतें. पण आतांच्या तिच्या बोलण्यावरून तिनें आपणांस कुठलें तरी काम देण्यासाठीं आणलें आहे हें उघड झालें. तिचें तोंड उतरून गेलें. तिनें उषाराणीला रडक्या आवाजानें विचारलें—

" बारकूचा शोध नाहीं का करायचा ? तो खरोखरीच अपघातांत सांपडला असेल का ? मेला असेल कीं जीवंत असेल ? असला तर कुठें असेल ? बारकूला शोधून काढलें पाहिजे हो. "

" उगी उगी बाळ. रडूं नको अं. आपण त्याला शोधून काढूं. तो असला तर सांपडेल आपल्याला. रडून काय बरं होणार ? "

" रडूंच येतें हो मला. नाहीं नाहीं ते विचार मनांत येतात. बारकू सांपडेल कीं नाहीं तें समजत नाहीं. शोधा हो बाई. तुमच्या पायां पडतें. माझ्या बारकूला शोधा...तुमचं काय वाटेल तें काम करीन. "

" आतां प्रथम तोंड वगैरे धुवून चहा पाणी तर उरकून घेऊं. बाजारांत जाऊन प्रथम तुला कपडे विकत घ्यायचे. तोंवर अभयकुमार येतील आपल्याला स्टुडिओंत घेऊन जायला. "

" बारकूनं हें परकर-पोलकं मला शिवलं परवाचें दिवशीं बघा. नवंच आहे. " अंगांत घातलेल्या परकर पोलक्याकडे बोट करून सुंद्री पुन्हां रडूं लागली.

"छान आहे हो......" उषाराणी तिची समजूत काढीत म्हणाली. पण हें घालून नाहीं जायचं स्टूडिओंत. दुसरे छान कपडे घालून जायचे......"

"हे देखील फार छान आहेत......"

"हो, पण दुसरें कपडे घालायचे आतां. हे मग कधीं तरी घालायचे..."

सुंद्रीनें पुन्हां यशस्वी माघार घेतली. उषाराणी बरोबर ती चहा घ्यायला तयार झाली. आणि चहा घेऊन झाल्यावर मग दोघींही नवीन कपडे घ्यायला बाहेर पडल्या. रस्त्यानें दूरवर नजर टाकून चौफेर सुंद्री एकच एक शोधीत होती--

बारकू कुठें दिसतो का......?

बारकू कुठें दिसतो का......?

★

## प्रकरण १८ वें

# "आज आहे संधी तुला!"

त्या बंद खोलींत प्रदीर्घ वाटणारीं घटकापळें अंदाजानें मोजीत बारकू पडून राहिला होता. दुपारचें जेवण देतांना बाबा पंखेवाला त्याला नेहमींप्रमाणें नाटकी अभिनयांत धीर देण्याची बतावणी करतां करतां म्हणाला होता—

"आज तुला संधी मिळेल बेटा. आज रात्रीं बंगालीबाबू तुला घेऊन कामगिरीवर जाणार, हुशारीनं काम कर आं बच्चा. बंगालीबाबूला खफा करूं नको. बडा गुस्सेवाला आदमी हैं वो."

बंगाली बाबू आपणास कुठल्या कामगिरीवर नेणार ? बारकूला कांहींच अंदाज करवेना. कांहीं तरी चोरी कामच तें असलें पाहिजे यांत संशय नव्हता. स्वतःची सुटका करून घेण्यास बारकू काय वाटेल तें करायला तयार झाला होता. कुठून तरी आज रात्रीं आपण ह्या बंद खोलींतून बाहेर पडूं. हा तुरुंगवास आतां अतिशय असह्य झाला आहे. चार भिंतीच्या बाहेर पडून बाहेरच्या मोकळ्या हवेंत श्वासोच्छ्वास करूं. आकाश पाहूं, रस्ते पाहूं; माणसं पाहूं; हा विचार त्याला अतिशय आशादायी वाटला. चोरी करायला का होईना पण आपण बाहेर निघणार नि दैव जर शिकंदर असलें तर काय सांगावें. त्या भयंकर बंगाली बाबूच्या हातांवर तुरीही देऊं. खूप खूप लोकांची गर्दी असली, जवळ पास पोलीस असला आणि आपण जर एकदम ओरडा करून " हा बंगाली चोर आहे, हा मला बळेच चोरी करायला सांगत आहे !" असा जर पुकारा केला तर खात्रीनें आपणांस कुणाचें तरी सहाय मिळून सुटूं शकतां येईल असेंही त्याला वाटलें. आपण जर अशा रीतीनें सुटलों तर काय बहार होईल ! मग मात्र आपण ह्या बंगाली बाबूच्या, बाबा पंखेवाल्याच्या अथवा टोळींतलि कुणाच्या देखील हातीं लागणार नाहीं वगैरे मनोराज्यें देखलि त्यानें केलीं. चोराचा साथीदार म्हणून जरी पोलीसानें आपणांस पकडलें आणि चौकीवर नेऊन कोंडलें अथवा तुरुंगांतही घातलें तरी चालेल पण ह्या बदमाषांच्या तावडींत नको असें त्याला झालें होतें.

बंद दारांकडे खोलींतल्या अंधारांतून टक लावून बारकू डोळें फाडफाडून पाहात होता. पण बराच वेळ झाला तरीही दार उघडण्याचें कांहीं चिन्ह दिसेना. बाहेर खूप रात्र झाली होती. मुंबापुरीची गडबड शांत होऊन सारें शहर निद्रासुख अनुभवीत होतें. ट्राम बसेस यांची धडधड खडखड केव्हांच थांबली होती...

खडाडा आवाज होऊन बारकूच्या खोलीचें दार उघडलें. आंत वाट पाहून पाहून बारकू कंटाळून गेला होता. तो त्या आवाजानें खडबडून सावरून बसला. डोळ्यावरची झोंपेची गुंगी जावी म्हणून त्यानें मनगटानें डोळें चोळले आणि समोर

कोण तें पाहाणार तोंच दार उघडणाऱ्या व्यक्तीनें—बंगाली बाबूनें—त्याच्या फऱ्याला धरून त्याला ससकन् वर ओढलें व म्हटलें—

"ऊठ, मुर्दाड !"

बारकूला त्यानें हिसक्या सरसें उभें केलें व गदगद हलवून दांत ओंठ खाल्ले. बारकूची झोप पार उडून गेली....

"चल लौकर बाहेर, नाहींतर घालतो एक लाथ पेकाटांत—" बारकूच्या 'पेकाटांत' लाथ हाणीत बंगाली बाबू म्हणाला आणि आपल्या आज्ञेचें पालन करण्याची बारकूला जरा सुद्धां संधी न देतां त्यानें त्याला वर उचलून त्या खोलींत उघड्या दारांतून बाहेरच्या मोठ्या खोलींत त्याला फेकून दिलें. बारकू बाहेर येऊन पडला तो बाबा पंखेवाल्याच्या पायांपाशींच.

"झालास ना जागा बेटा ?—" बाबा पंखेवाला जणूं कांहींच झालें नाहीं अशी बतावणी करीत मिस्किलतेनें म्हणाला—"शाबास ! ही कॉफी घे. तुला आतां जातांना हुशारी वाटावी म्हणून ही मी मुद्दाम तयार केली आहे बघ."

बाबा पंखेवाल्याच्या हांतून कॉफीचा कप घेत बारकूनें भीत भीत त्या अड-दांड बंगाली बाबूकडे पाहिलें. तो डोळे वटारून लौकर कॉफी पी म्हणून बारकूला खुणावीत होता. कांहीं न बोलतां बारकूनें एका सपाट्यात तो कॉफीचा कप रिकामा केला आणि बंगाली बाबूबरोबर बाहेर पडण्यास तो तयार झाला. बंगाली बाबूनें बारकूचा एक हात आपल्या पोलादी पकडींत घट्ट धरला आणि तो निरुंद जिना उतरूं लागला. पाठीमागें धाडकन् आवाज होऊन बाबा पंखेवाल्याच्या त्या भयंकर निवासाचें दार बंद झालें.

बाहेर रस्त्यावर आल्यावर बारकूला बरीच हुशारी वाटली. थंड वारा वाहात होता. सारा बाजार शांत होता. रस्ते निर्मनुष्य आणि निर्मळ दिसत होते. बारकूनें आजुबाजूस नजर टाकून एक खोल उसासा सोडला.

" चलो—"

बारकूच्या हाताला हिसडा देत बंगाली बाबू चालू लागला. बारकूचीं पावलें आपोआप तुरुतुरु चालूं झालीं.

कुठें नेणार बंगाली बाबू ! रात्र तर बरीच झालेली दिसते. कुठेंही कुणाची चाहूल नाहीं. किती घट्ट धरला आहे बंगाली बाबूनें आपला हात ! ही पकड कशी सुटायची ? आरडा ओरडा केला तरी या वेळीं कोण येणार धावून मदतीला ? कोण देणार हांक मारली तरी ओ ? उलट तसें कांहीं केलें तर बंगाली बाबूच खफा व्हायचा. 'बडा गुस्सेवाला आदमी है.' पुन्हा मारायचा, कोंडून ठेवायचा; पुन्हा सोडायचा सुद्धां नाहीं आयुष्यभर ! मग कसें करायचें ? मग कुठली सुंद्रीची भेट ? बारकूच्या डोक्यांत तुफान उसळलें !...

डोक्यांत हे विचार घोळत असले तरी पाय मात्र एखाद्या यंत्राप्रमाणें बंगाली बाबूच्या बरोबर त्याच्या वेगानें आपोआप चालू होते. तो वळेल तसे वळत होते. तो थबकला की थबकत होते. लौकर चालू लागला की चालत होते.···

दोन टाकीवरील एका लहानशा गल्लींतून ··· अगदी अंधाराअंधारांतून ··· बोळीबोळींतून ··· मुद्दाम लांब वळसे घेऊन आणि मुख्य मुख्य चौक टाळून ··· गोल देवळाजवळून ··· चालतच होता बंगाली ·· गोल देऊळ··· अरेरे ! जवळच इथं सुंद्री नि बारकू राहत होता तें ठिकाण···जवळच सुंद्री असेल···पण असेल का ?

" क्या देखता है ?—चलो—"

बंगालीनें जोराचा हिसका देऊन त्याला शुद्धीवर आणलें··· ••• प्रार्थना समाज ··· ऑपेरा हाऊस···फ्रेंच ब्रीजवरून ... मलबार हिलकडे...पण कुठें ?

मलबार हिलच्या पायथ्याशीं बारकूला घेऊन बंगाली थांबला. कुठें कुणाची चाहूल नाहीं ... कुठें कुणाचा हुंकार नाहीं...बारकू भेदरून पाहूं लागला. आतां काय होणार ?

" ए हरामी, नीट ऐक. आणि मी सांगतों तें कर. जर का भलतें सलतें कांहीं केलंस अथवा पळून जाण्याचा प्रयत्न केलास तर जीवच घेईन मी तुझा " बंगाली कुजबुजून बारकूला दम भरीत म्हणाला व त्यानें सुरा काढून हातांत घेत-ला. " या समोरच्या चढणीनें आपण आतां झाडींतून लपत छपत वर चढणार आहों. थर थर कशाला कांपतोस असा ?...सुव्वर ! नीट उभा राहा ! ..वर गेल्यावर एक इमारत लागेल तिच्या पिच्छाडीस एक खिडकी आहे तिथें आपण जाऊं. खिडकी लहान आहे पण तुला तींतून आंत शिरतां येईल. तुसं अंग जरा माठ भरलं तर तुझीं चार दोन हाडं मोडून मी कसें तरी तुला आंत घालीनच. आंत गेल्यावर सरळ नाका समोर सुमारें बारा पावलें जा नि उजव्या बाजूला वळसा घे. पांच पावलं जाऊन डावीकडे वळ की एक बंद दरवाजा लागेल. दरवाजाला आंतून कडी आहे. आवाज न करतां ती कडी काढ. मी बाहेर असेनच कडी काढली की तुझं काम झालं. उघड्या दरवाजांतून मग तूं बाहेर पड आणि दादा मॅन्शनकडे नीट जा- समजलं ? "

" समजलं ! " बारकू दबकत दबकत ह्मणाला. प्रसंग आला की माणूस धीट बनतें आपोआप. त्या वेळीं बारकूच्या अंगांत धैर्य संचरलें. बंगालीबाबू मागून तो न डगमगता त्या झाडांझुडपांतून एक लहानशीं दरड चढून वर गेला. वर जातांच ती इमारत आढळली. खिडकींतून बंगाली बाबूनें बारकूला हळूच आंत सोडलें .....

आंत सारें शांत होतें. सारी माणसें गाढ झोपलीं होतीं. सर्वत्र काळोख भरला होता. पण बारकू जरासुद्धां अडखळला नाहीं. सरळ नाका समोर तो मोजून बारा पावले चालत गेला नि उजव्या हाताला वळला. जणूं सराइताप्रमाणें त्या अंधारांत तो जात होता. उजव्या हाताच्या दिशेनें पांच पावलें नि मग डाव्या हाताला वळायचें. बारकू मनाशींच पुटपुटून चालत होता. हातांनीं चाचपडून त्यानें तें दाग्ही शोधलें व त्याची कडी आवाज न करतां काढली. एकदां अंधारांतच

आजुबाजूला पाहिल्या सारखें केलें आणि हळूच दार उघडून तो सपकन् बाहेर पडला. तो बाहेर पडतांच त्याच्यापेक्षाही चपळतेनें बंगाली बाबू आंत शिरला आणि त्यानें दार हळूच ओढून लोटून घेतलें.

पिंजऱ्यांतून बाहेर पडलेल्या पक्ष्याप्रमाणें बारकू बंगाली बाबूपासून दूर दूर पळाला. त्याला दादा मॅन्शनकडे जाण्याची आज्ञा बंगाली बाबूनें दिली होती. पण कांहींहि होवो पुन्हां दादा मॅन्शनकडे जायचें नाहीं असें त्यानें निश्चयपूर्वक ठरवलें होतें. सारी शक्ती पायांत आणून तो धावत होता. बंगाली बाबू पासून कुठें तरी सुरक्षित ठिकाणीं...दूर...दूर...दूर...

★

## प्रकरण १९ वें

# सुंद्री कुठय् पण....!

मुंबईच्या कुठल्या कुठल्या गल्ल्यांतून बारकू त्या रात्रीं गेला तें वर्णन करणें अशक्य आहे. पाय नेतील त्या वेगानें आणि दिशेनें तो जात होता. सारखा चालत होता. प्रथम त्याला सुंद्रीकडेच जावेसें वाटलें पण नीट गोल देवळाच्या दिशेनें गेलें नि मागून बंगाली बाबूनें येऊन आपणांस गांठलें तर...त्या पेक्षां दिवस उजाडे-पर्यंत कुठें तरी वेळ काढावा आणि दिवस उगवला म्हणजे वाढत्या रहदारीच्या आधारावर मग त्या दिशेनें जाऊन सुंद्रीला भेटावें असा विचार त्यानें केला होता.

खूप खूप वेळ याप्रमाणें चालून थकल्यावर तो मग एके ठिकाणीं थांबला. एका बंद दुकानासमोरच्या फळीवर तो जरा वेळ बसून विसांवा घेऊं लागला.

हळु हळू रहदारी सुरू झाली. दूधवाले भय्ये दुधाच्या कावडी घेऊन पळत जातांना दिसूं लागले. अधुन मधुन व्हिक्टोरियाही टप टप आवाजानें हिंडूं लागल्या मध्येंच एखादी टूरींग कार आवाज न करतां हळूंच बाहेर पडतांना दिसूं लागली.

आणि दूर अंतरावरून ट्रॅमगाडीचा चिरचिरा आवाजही आपल्या जागृतीची अलबेल देऊं लागला. सारी मुंबापुरी जागी होऊं लागली.

मुंबापुरी जागृत होतांना बघण्यांत मोठी गंमत असते. मतलई वायूच्या मंद शीतल वाऱ्यानें वातावरण प्रसन्न वाटूं लागतें. अजस्र दिसणारी आणि निश्चल पडलेली एक एक इमारत जणूं हळु हळु जागी होऊं लागतें. हळु हळु तींत चैतन्य खेळूं लागतें. एकेक खिडकी उघडूं लागतें. माणसाची जाग वाढूं लागतें...... त्या नंतर एक एक माणूस घराबाहेर पडूं लागतें. रस्तें हालूं लागतात. लांबच लांब पसरलेल्या आणि वीजेच्या दिव्यांच्या प्रकाशांत चंदेरी पाटाप्रमाणें भासणाऱ्या रस्त्यांवरून वाहनांची येजा सुरू होते. एकेक वाहन वाढूं लागतें गर्दी वाढूं लागते. सारें शहर जणुं अळुखे पिळुखे देत आपल्या रोजच्या कामगिरीसाठीं हालचाल करूं लागतें.

बारकू हें सारें दृश्य त्या दुकानापुढच्या फाळीवर बसून पाहात होता. त्याची करमणूक होत होती. त्या नादांतच त्याचा उरलेला वेळ मोठा मजेंत निघून गेला. एखाद्या पंजरमुक्त पांखराप्रमाणें आनंद लहरीवर त्याचें मन प्रसन्नतेनें झोकें घेत होतें. काळोख विरून जात वातावरणांत प्रकाश भरत होता.

उषःकालच्या त्या प्रसन्नतेंत त्याच्या मनांतली सारी भीति दूर पळून गेली. उरांतली सारी धड धड शांत झाली तो आपण कोठें आहों हें पाहावें म्हणून उठला आणि त्यानें आजूबाजूच्या भागाचें निरिक्षण केलें. ताडदेवच्या एका भागांत तो फिरत फिरत आला होता.

कुंभारवाडा लेनकडे जाण्यासाठी तो ताडदेवच्या ट्रॅम स्टॉपकडे गेला आणि गोल देवळाच्या ट्रॅमवर त्यानें टुणदिशी उडी मारली. इतक्या सकाळीं कुठली गर्दी असणार तिच्यांत. उगीच चार दोन माणसें आणि कंडक्टर इतके लोक आंत होतें. बारकू आंत शिरल्याबरोबर कंडक्टर हातांतला चिमटा वाजवीत पुढें येतांना दिसला. बारकूच्या खिशांत पैसे होते. बाबा पंखेवाल्यानें त्याला कैद करून कोंडून ठेवलें

तरी त्याचे पैसे मात्र हिसकून घेतले नव्हते. पण समोरून येत असलेल्या त्या कंड क्टरची ओळख नसूनही बारकूनें त्याला शिस्तीत 'राम राम' ठोकला. अर्थात् बारकूला तिकीट घेण्याचें मग कारणच पडलें नाहीं. कंडक्टर साहेब खुष होऊन चिमटा वाजवीत बारकूला ओलांडून तिकीट न मागतांच ट्रॅमच्या दुसऱ्या टोकाला जाऊन उभे राहिले.

गोल देवळापाशीं निशान सिनेमा समोरच्या स्टॉपवर बारकूनें ट्राममधून खालीं उडी टाकली व कुंभारवाडा लेनकडे लगबगीनें धूम ठोकली. त्यांच्या त्या दादराखालच्या जागीं बारकू उत्सुकतेनें पाहूं लागला. पण तिथें कोण होतें ! सुंद्री कांहीं तिथें नाहीं, आपलें सामान आईनें दिलेली ती मऊ मऊ गोधडी—कांहीं कांहीं तिथं नाहीं. सारी जागा ओकी ओकी—रिकामी आहे असें पाहून बारकूच्या पोटांत काय खळबळ उडाली तें काय सांगावें !

कुठें गेली सुंद्री ! काय झालें तिचें ? बारकूला कांहीं कांहीं समजेना.

सुंद्रीनें आपली खूप खूप वाट पाहिली असेल. एक दोन दिवस आणि रात्र वाट पाहून पाहून ती कंटाळली असेल. आपण परत येत नाहीं हें पाहून पुढें मग ती हें ठिकाण सोडून कुठें तरी निघून गेली असेल. पण कुठें गेली असेल सुंद्री ! कुठें आधार आहे तिला ? जाणार कुणाकडे ? पोरकी, निराधार आणि निष्कांचन पोर सुंद्री ! काय दशा झाली असेल तिची आपल्या पश्चात् ?

सुंद्री त्या धर्मशाळेकडे गेली असेल का ?—

छे ! तिकडे कशाला जाईल ती ? तिकडे पोलीस येऊन आपणांस डोंगरीच्या तुरुंगांत नेतील याची तिला भीति वाटत असल्यामुळें ती तिकडे जाणार नाहीं. मग कुठें गेली असेल ? भूक लागली असली तर तिनें काय खाल्लें असेल ? एक पैसा सुद्धां जवळ नव्हता तिच्या. कांहीं कुठें काम करील म्हणावें तर अंगांत ताकद नाहीं. रडत रडत कुठें तरी आपला शोध करीत फिरली असेल आणि भूक लागल्यावर येणाऱ्या जाणाऱ्यांपाशीं भीक मागून खात असेल......

बारकूला ती कल्पनाच सहन होईना. सुंद्रीनें पुन्हा भीक मागूं नये असें त्याला मनापासून वाटत होतें "मी तुला भीक मागूं देणार नाहीं," असेंही तो तिला म्हणाला होता. पण निराधार झालेली शरीरानें दुबळी सुंद्री भुकेच्या तडाख्यांत दुसरें काय करूं शकणार असेंच त्याला वाटलें. सुंद्री भीकच मागत फिरत असली पाहिजे कुठें तरी असा अंदाज त्यानें केला. पण कुठें ?

सुंद्रीनें तिची करुण कहाणी सांगतांना तिची ती भयंकर आजी तिला माधवबागेला भीक मागायला घेऊन जात असे असें सुंद्री म्हणाली होती. सुंद्री पूर्वीं भीक मागत असे त्या जुन्या जागींच गेली असेल का ?

निराश झालेला बारकू आपल्या त्या शंकेचं निरसन करून घ्यायला माधव बागेकडे जायला निघाला.

माधवबागेंत काय, भिकारीच भिकारी! बारकू त्या प्रत्येकाला न्याहाळून पाहूं लागला. दिसते का कुठें सुंद्री ? आहे का कुठें सुंद्री ?......

छे, कुठेंही त्याला त्याची ती गोड पोरगी दिसेना.

किती भिकारी होते! लंगडे, लुळे, आंधळे, पांगळे, मुके, पक्षघाती, वेडे, आजारी, धडधाकट, स्त्रीया, पुरुष, मुली, मुलं......पण सुंद्री त्यांच्यांत नव्हती ! सुंद्री तिथं दिसली नाहीं!

कुठें तरी ती पटकन् दिसावी; कुठुनतरी ती खुदकन् हसावी; एकदम तिनें हांक मारावी नि म्हणावें—

"बारकू, ए बारकू...ही बघ मी इथें आहे."

पण सुंद्री नव्हतीच तिथें तर दिसणार कशी ? हसणार कुठून ! बोलणार कशी !......

बारकू अगदीं रडकुंडीलाच आला. आतां सुंद्रीला शोधायचें तरी कुठें ?...

सुंद्री नाहीं हें कळूनही त्याचा त्या ठिकाणाहून पाय निघेना. भिकाऱ्यांची ती सारी जमात पाहून त्याच्या पोटांत तुटूं लागलें. ह्या लोकांप्रमाणेंच सुंद्री अति-

शय केविलवाणी दिसत असेल. कुठें तरी दीनवाणा चेहेरा करून अर्धपोटीं बसली असेल. तिचें सुंदर तोंड जाईच्या कळीप्रमाणें सुकून गेलें असेल. भुकेमुळें कळवळत असेल सुंद्री. येणाऱ्या जाणाऱ्यापुढें आशेनें आपले चिमुकले हात पसरीत असेल. कोणी दयाळू दाता भेटत असेल का ? कोणी दीनाचा वाली ' पांची बोटांनीं ' धर्म करीत असेल का ? देवा, सुंद्री निराधार आहे, अशक्त आहे, निष्कांचन आहे, एकटी आहे ! तिला दयाळू धर्मात्मे भेटूं दे. भीक मिळूं दे...

बारकू मनाशींच वरील प्रमाणें पुटपुटला. त्याच्या डोळ्यांत अश्रु भरलें. त्यानें खिशांत हात घातला आणि कांहीं नाणीं बाहेर काढून सुंद्रीच्या वयाचीं कांहीं भिकाऱ्याचीं मुलें होती त्यांच्या हातावर तीं नाणीं ठेवलीं......

अश्रु ढाळीतच तो माधवबागेतून बाहेर पडला. आतां कुठें जायचें ? कुठें बघायचें सुंद्रीला ?

फिरत फिरत तो निशात टॉकीजकडे आला. त्याच्या ओळखीच्या एका पोऱ्यानें त्याला हटकलें.

" काय बारक्या, लेका होतास तरी कुठें इतके दिवस ? "

" होतों असाच कुठें......आज आलों परत. मालकाला भेटायला पाहिजे गड्या...."

" कामावर येणार व्हय् परत ? "

" हो पण मालक ठेवील तेव्हां ना......"

" विचारून बघ दुपारीं मालक आला म्हणजे......अरे हो, बारक्या, तूं गेल्यावर एक छोटी पोरगी तुझी सारखी चौकशी करीत होती..."

" अरे सुंद्री ती......" बारकू ओरडला. " मी तिलाच शोधतोय्.. गेली कुठं ती ? "

" अरे ती रडत रडत दोन रात्रीं इथंच सिनेमाच्या दारांत उभी असायची. पण त्यानंतर बघ ती सिनेमा नटी आहेना, ती उषाराणी, ती आली, आणि तिनं

त्या पोरीला मोटारींत घालून नेली बघ......खरंच खोटं नाहीं सांगत. आम्हीं पाहिली नेतांना तिला."

" उषाराणीनं नेली तिला ? कुठं नेली ? कशाला नेली ! "

" कुणाला ठाऊक कशाला तें. नेली खरी... "

बारकूला ह्या बातमीचें कमालीचें आश्चर्य वाटलें. पण सुंद्री कांहीं आपण समजलों तितकी अगदीच निराधार नाहीं हें समजून समाधानही वाटलें. पण उषाराणीनें तिला कशाकरतां नेलें असावें याचा कांहीं त्याला उलगडा होईना.

आपणांस उषाराणीचें घर सहज शोधून काढतां येईल असें मात्र त्याला वाटलें. नाहीं घर मिळालं तरी कंपनीत जाऊन आपण तिला भेटूं आणि सुंद्री कुठें आहे याचा तपास करूं असेंही त्याला वाटलें. उषाराणी " प्रागतिक पिक्चर्स " या कंपनीच्या " अप्सरा " खेळांत त्यानें चार महिन्यापूर्वीं पाहिली होती. प्रागतिक पिक्चर्स ही कंपनी दादरला आहे हें ही त्याला कोणी तरी सांगीतलें म्हणून लगेच तो उषाराणीच्या शोधार्थ निघालाही......

★

## प्रकरण २० वें

# उषाराणीच्या शोधार्थ !

दादरला प्रागतिक पिक्चर्संचा स्टूडिओ शोधून काढतां काढतां दोनचा सुमार. झाला. पण शेवटीं एकदां मिळालें ठिकाण. हाच तो स्टूडिओ अशी एकदाची खात्री होताच दारावरच्या पठाणाकडे दुर्लक्ष करून बारकू सरळ आंत घुसण्याचा प्रयत्न करीत होता. पण त्या पठाणाची नजर गेलीच...

" ए—कहां जाता है ? "

" अंदर जातां हूं लालाजी— "

" अबे लालाजी के बच्चे ! आंदर जानेकी इजाजत नहीं है. हट पिच्छे—"

" ऐसा न कहिये लालाजी–अंदर जाना दीजिये- ओ सुंद्री है ना, उसे मिलना है मुझे— "

" अरे हट-भाग जाव यहांसे- इतनासा छोकरा और सुंदरीसे मिलना चाहता है ! उल्लू कहींका..."

" अरे लालाजी ! क्या बात कहूं- वो सुंदरी नहीं है. अरे इतनीसी तो लडकी है. ओ उषाराणी है ना; उसने वो लडकी को यहां लाया है- "

" उषाराणी अब नहीं है ये कंपनीमें. ओ ये कंपनी छोडके दूसेरे कंपनी मे गयी. "

" कौनसे कंपनीमे लालाजी— ? "

" मुझे नहीं मालुम. अब मुझे मत सताव ...नहीं तो देख ये डंडा ! "

त्यानें अशा रीतीनें संभाषणाचा उपसंहार करून सरळ दांडकें उगारलें हें पाहून बारकू मार्गे सरला ! पण जरा वेळ बारकू दबला खरा तरी तें ठिकाण सोडून कांहीं गेला नाहीं. त्या लालाची नजर चुकवून म्हणा अगर त्याला चुचकारून म्हणा त्या फाटकाच्या आंत कसें जातां येईल याचाच विचार करीत तो तेथें जवळपास रेंगाळत फिरूं लागला.

अडीच वाजले. तीन झालें. भूक तर सपाटून लागली तेव्हां उदर शांत करायला तो जवळच्याच एका उपहारगृहांत जाऊन आला. आणि पुन्हा त्या फाटकासमोर येरझारा घालूं लागला. संध्याकाळीं सहा वाजेपर्यंत बारकू तिथें येरझारा घालीत होता. पण पठाणाला त्याची द्या आली नाहीं. सहा वाजतां स्टूडिओला सुटी झाली. भराभर माणसें त्या फाटकांतून बाहेर पडूं लागलीं. बारकू त्या बाहेर

पडणाऱ्या प्रत्येक माणसाला न्याहाळून पाहूं लागला. पण उषाराणी सारखें कोणीच बाहेर येतांना दिसलें नाहीं.

आतां काय करावें ? बारकू थकून गेला. सारा स्टूडिओ रिकामा झाला. बाहेर येणाऱ्या एक दोन माणसांना अडवून बारकूनें उषाराणीची चौकशी केली. पण उषाराणी कंपनी सोडून दुसरीकडे गेली असें त्याही लोकांनीं सांगितलें—कुठल्या कंपनींत गेली असेल उषाराणी ! ती राहाते तरी कुठेंशी ! कसा पत्ता लागणार तिचा ! ज्यांच्यापाशीं त्यानें चौकशी केली त्यांना तर ही माहीत नव्हती. परत जाणारी ट्रॅम धरून बारकू पुन्हा निशात सिनेमापुढें येऊन उभा राहिला. साडे सहाच्या शो साठीं पब्लीक आंत गेली होती नि खेळ सुरू होउन अर्धा तास झाला होता. बारकूनें जाऊन मालकाची भेट घेतली.

" कोण बारक्या ? इतके दिवस कुठें मरायला का गेला होतास ? " मालक कडाडला- " साला असा करेल तर कोण तुला कामावर ठेवेल ? ये नाय आ बाबा हिंतं च्यालायचा असा ! हाफसेंट राहील तो लाथ मारून हाकून देल तुला हितून !"

मालक असा कडाडला खरा पण " जा; कामकर आतां नीट " म्हणून त्यानें कामावर ठेवलें याचेंच बारकूला समाधान वाटलें. खिशातलें पैसे त्यानें पुन्हा एकदां मोजून पाहिलें. उद्या सकाळ पासून ' पेंपर ' चाही त्याचा धंदा जर सुरू केला नाहीं तर उपाशी मरायची पाळी यायची हें त्यानें ओळखलें. उद्यापासून ' पेपर ' आणायला गेलेंच पाहिजे असेंही त्यानें ठरवलें. पेपर विकायचे, खारी शेंग विकायची नि दुपारच्या फावल्या वेळांत उषाराणीचा शोध करीत फिरायाचें असा त्यानें निश्चय केला.

पण रोजच्या रोज तपास करीत हिंडूनही दिवसांमागून दिवस गेले, आठवड्यांमागून आठवडे गेले आणि महिन्यामागून महिने गेले तरी बारकूच्या श्रमांना यश येईना. उषाराणी अमूक कंपनींत आहे अशी बातमी मिळे. बारकू तिथें जाई आणि तिथें त्याला कुणीतरी सांगे..." उषाराणी होती खरं कांहीं दिवस. पण तीं हल्लीं कॉंट्रॅक्ट सिस्टमिनें काम करते. ती ' फ्री लान्सर ' आहे. इथं नुसती दहा

दिवस आणि तेंही रात्रीच्याच शूटिंगला येत असे. आतां कुठं गेली माहीत नाहीं. राहाते कुठें त्याची तरी कोण करतो बाबा चौकशी ! "

एकदां दोनदां त्याला उषाराणीच्या राहत्या घराचा पत्ताही मिळाला. पण पहिल्या वेळीं ज्या पत्त्यावर तो गेला तेथें राहणारी उषा राणी एक साधी एक्स्ट्रा नटी निघाली आणि दुसरें वेळीं जो पत्ता मिळाला त्यावर जाऊन चौकशी करतां असें समजलें कीं उषाराणी दोनच दिवसांपूर्वी तेथून घर बदलून दुसरीकडे गेली. कुठें तें माहीत नाहीं......

कधीं कुणी म्हणे ती मालाडला बॉम्बे टॉकीजला हल्लीं असते, तर दुसरा म्हणे " छे छे-तिला मी काल शिवडीला मिनर्व्हांकडे पाहिली. येत्या खेळांत तीच तर हिरॉईन आहे मिनर्व्हांच्या...... "

कोठूनही सुरवात केली तरी शेवटीं निराशाच त्याला माळ घाली. नाहींच का पत्ता लागणार त्या नटीचा मला ? नाहींच दिसणार सुंद्री पुन्हा ? पण सुंद्री त्या नटी जवळ अजून असेल का ? कीं त्या नटीनें तिला नंतर कुठें घालवून दिलें असेल ?......कुठें शोधावी ही पोरगी आतां ? कुठें असेल ही सुंद्री ?......

रोज नवीन उगवणारा सूर्य बारकूसाठीं नवीन नवीन निराशा घेऊन येई. दिवसभर ठरलेलं काम करायचं आणि वणवण करीत भटकत फिरायचं ही बारकूची हीच दिनचर्या होऊन बसली.

चार महिने असे गेले......

दिवसभराच्या श्रमानें थकून भागून बारकू तो निशांत टॉकीजकडे परते. तिथें रात्री बारा पर्यंत कामच करायचें असें. सिनेमा बाराला सुटे. त्यानंतर सिनेमाच्याच आवारांत एका बाकावर बारकू निद्रेच्या आराधाना करीत पडे. त्याच्या डोक्यांत सुंद्रीच्या आठवणीचा कल्लोळ उठे. त्या विचारतंद्रींतच त्याला निद्रा लागे आणि मग त्याच विषयांचीं त्याला स्वप्नें पडत ...... सुंद्रीचा आपण शोध करीत खूप खूप हिंडत आहोंत. आपणांस लौकर लौकर प्रवास करतां यावा म्हणून

आपण देवाला भेटायला गेलों आहों आणि त्याच्या जवळ पांखरा प्रमाणें पंख मागीतले आहेत. देव आपणांवर प्रसन्न झाला आहे. त्यानें आपणांस पंख दिले आहेत. तें पंख परिधान करून आपण आस्मानांत मन मानेल तसें उडत आहों. साऱ्या मुंबईवरून संचार करीत आहों. प्रत्येक इमारत आपण धुंडाळून काढीत आहों. आपण कुठेंही गेलों तरी आपणांस मज्जाव नाहीं. सर्वत्र आपण जाऊं शकतों, प्रत्येक घराचा कोपरान् कोपरा आपण धुंडाळून पाहूं शकतों. पण इतकें करून सुद्धा सुंद्री आपणांस कुठेंच दिसत नाहीं......सुंद्रीचा कुठें मागमूस नाहीं... उगीच आपण वेड्या सारख्या भिरी भिरी भराऱ्या मारीत आहों. पुन्हा त्याच त्याच ठिकाणीं तिचा शोध करतों आहों असें तो स्वप्नांत पाही...

कधीं कधीं सुंद्री आली आहे व आपणांस हांका मारीत आहे असा त्याला स्वप्नांतच भास होई. अगदीं सुंद्रीचाच आवाज त्याला ऐकूं येई. कधीं कधीं तर त्याच्या पुढें ती उभी आहे असेंही स्वप्न त्याला पडे. त्यानें तिला घेतलेलें नवें परकर-पोलकें ती नेसली आहे असें त्याला हटकून स्वप्नांत दिसें. बारकू मग तिला हांका मारीत मारीतच जागा होई—

" सुंद्री, सुंद्री ऽ...ए ऽ ऽ सुंद्री ! "

पण जागा झाल्यावर इतकें सुंदर स्वप्न भंग पावलें म्हणून त्याला वाईट वाटे. तें स्वप्न पुन्हां पडावें म्हणून तो मग पुन्हां डोळे मिटून घेई...

असेच चाललें होतें...दिवसांमागून दिवस आणि महिन्यांमागून महिनें...

जसजसा अधीक काळ लोटूं लागला तसतशी सुंद्री भेटण्याची आशा दुरावत चालली. क्षणांत चकाकावें आणि अनंत काळोखांत लुप्त व्हावें अशा विद्युलतेप्रमाणें सुंद्री त्याच्या एकलेंपणानें भरलेल्या दुःखी एकाकी जीवनांत अल्पकाळच आली आणि गेली...

आतां ती गेली ती कायमची. पुन्हां ती आपणांस कधींही दिसणार सुद्धां नाहीं कदाचीत्. असेंही त्याच्या हळव्या मनाला वाटूं लागलें.

म्हणजे चंदूचें काम खुद्द अभयकुमार हेच करणार असून सिनेरसिकांना त्यांचें चंदेरी पडद्यावरचें प्रथम पदार्पण बघण्याची मोठी उत्कंठा लागली आहे असा कानोसाही त्या प्रचारपद्धूला कोठून तरी लागला होता असें दिसलें. पण त्या साऱ्यावरचा खरा शोभिवंत कळस म्हणजे बेबी सौंदर्यप्रभा असेंही जाहीर करायला तो विसरला नव्हता व तिचें काम आबालवृद्धांना नुसतें मोहिनी घालणार म्हणूनही तो म्हणत होता...

इतकी सणसनाटीं पब्लिशिटी झाल्यावर मुंबईतला कोणता मूर्ख रसिक "पऱ्याची चाळ" बघायला वाटेल त्या वस्तींत पोरवाळांना घेऊन धांवणार नाहीं ? ..

हजारों रसिकांचे ताफे आपल्या लठ्ठ बायकांना आणि किरकिऱ्या अरसिक पोरांना घेऊन निशातकडे आपली सिमेंटचीं खुराडीं सोडून "पऱ्याची चाळ" बघायला धांव घेऊं लागले ! साऱ्या निशांत टॉकीजला अशा बिचाऱ्या रसिकांचा आणि त्यांच्या कुरुप बायकांचा वेढा पडला. आरडाओरड, बोंबाबोंब, शिवीगाळी, रडारड, चेंगराचेंगर, धक्काधक्की, बुक्काबुक्की यांचा एकच हैदोस उसळला ! पोलीस. पठाण, डोअर कीपर, तिकीट देणारे, मॅनेजर आणि थिएटरमध्यें उंच स्वरानें ओरडून बायकांना लाथा मारीत खारी शेंग सुका मेवा विकणारीं पोरं यांची एकच धावपळ झाली ! साऱ्या गोल देवळाच्या आजुबाजूचें वातावरण तोकडी बिडीच्या धुरानें आणि पुना पानाच्या लालीनें दूषित झालें. काळ्या बाजार वाल्यांचें उखळ मात्र पांढरें झालें. टिकीट इशुअरच्या उदार सहकार्यानें त्यांनी दहा दहा आण्यांचीं तिकिटें सव्वा रुपयाला आणि सव्वा रुपयांचीं अडीच अडीच रुपयांना विकून चांगलीच कमाई केली. एकदम थर्डच्या पिटपासून तर बॉक्सच्या 'हायक्लास' सीटपर्यंत सारीं तिकिटें गरम केकप्रमाणें खपून गेलीं ! आणि थिएटर बाहेरच्या गर्दीला हुसकून लावावें म्हणून मॅनेजरनीं मोठ्या ऐटींत "हाऊस फुल्ल" ची पाटी थिएटरच्या दरवाजावर लटकावली.

तिकीट मिळाल्यावर बाहेरचा गोंगाट आंत गेला. त्यांतच बारकूही खारी शेंग सुद्धा मेदा विकीत फिरत होता. घामानें त्याचें सारें शरीर निथळत होतें आणि ओरडून ओरडून घशाचें धिरडें झालें होतें. पण त्याला कमाई भरपूर होत होती. एक आण्याची खारी शेंग त्याच्या अखत्यारींत त्यानें सरळ दोन आणे भाव करून विकायचा धडका लावला होता.

अधीर झालेल्या उल्लूभाई मशालजींनीं टाळ्या आणि शिट्या वाजवून सारें थियटर डोक्यावर घेतलें होतें. त्यांतच ह्या दणक्यानें भेदरून जाऊन किंचाळून ओरडणारीं किरकिरीं पोरं त्यांच्या आयांनीं पाठींत धपाटे मारून नवऱ्यांच्या स्वाधीन केल्यानें अधीकच कोकाटत ओरडत होतीं. जसजसा वेळ अधीक होऊं लागला तसतसा गोंगाट वाढतच गेला. पण थियटरमधील दिवे मालवले जातांच पोरं भयानें गांगरून जाऊन आणि थोरं चित्रदर्शनानें भारून जाऊन स्वस्थ बसलीं.

खारी शेंग भरलेलें खोकें छातीशी धरून बारकू अंधारांतून "शेकंन क्लासच्या" एका बंद दारांत उभा राहून खेळ पाहूं लागला. आणि त्याच वेळीं बाहेर उषाराणी आणि सुंद्री ऊर्फ बेबी सौंदर्यप्रभा खालीं उतरल्या आणि अभयकुमार-सह बॉक्समध्यें जाऊन बसल्या.

खेळाला प्रथम पासूनच रंग भरत गेला. पऱ्याच्या चाळीचीं तीं दृष्यें, तीं खुराडेंवजा भिकार घरें, त्यांत अर्धपोटीं जगणारीं तीं कच्चीबच्चीं; त्यांचीं पाठीला लागलेलीं उपाशीं पोटें; अंगावर धुडुतं नसलेलीं दुबळीं शरीरं वगैरे करूण दृष्यें प्रेक्षकांच्या दृष्टयांचा ठाव घेऊं लागलीं.

त्या नंतर खेळांतील मुख्य पात्रें—तीं भटक्या पोरांची टोळी—कचऱ्या काकड्या, टिटव्या आणि रखमी . त्यांतच आणखी चंदू नांवाचा एक लहान तर-तरीत मुलगा...दूर अंतरावरून येतांना दिसला. त्याच दृष्याचा लगेच क्लोजअप् सीन दिसूं लागला...

...पण काय झालें कुणास माहीत ! त्या प्रशांत शांततेचा भंग करीत कुणी तरी मोठ्यानें ओरडून कुणाला तरी हांका मारूं लागलें. त्या भटक्या टोळींतील रखमीच्या भूमिकेंतील सुंद्री पाहून बारकू आजुबाजूची परिस्थिति विसरला. " सुंद्री सुंद्री " करून तो त्या पडद्यावरील चित्रालाच हांका मारूं लागला...

" ए—शूः—! कोण रे—? "

सारें थियटर ओरडूं लागलें. पण बारकुला त्याचें काय ? तो तरीही ओरडतच होता—

" सुंद्री, ए ऽ सुंद्री ऽ ऽ—"

" चूप ए बेवकूफ ! बोंब कशाला मारतोस ? "

" अरे सुंद्री रे ! "

" तुझी सुंद्री गेली खड्डयांत ! " कुणी तरी त्याला मानगूट धरून मागें खेंचीत म्हटलें.

" सुंद्रीच रे ती ! ती काय सुंद्रीच ! " बारकू तरीही म्हणतच होता. " ती बघ; मी तिला घेतलं तेंच परकर पोलकं घालून फिरतें आहे ! "

" ए चमन ! मालकाकडं यायचं आहे कां ? " त्या द्वाररक्षकानें बारकूला गदगद हलवून शुद्धीवर आणीत म्हटलें.

बारकू भानावर आला....

" अरे बाबा माफ कर ! आतां ओरडत नाहीं ! " बारकू म्हणाला आणि स्वतःची सुटका करून घेत पुन्हां खेळांतली सुंद्री पाहाण्यांत दंग झाला.

विश्रांतिपर्यंत छोट्या रखमीच्या कामाला खूपच रंग चढत गेला. सहजस्फूर्त अभिनय आणि गोड आवाजामुळें प्रेक्षक छोट्या रखमीवर खूष झाले. विश्रांति झाली ! लोक माना वळवून वरच्या मजल्यावर नटनटी दिसताहेत का तें

पाहूं लागले. खेळाच्या पहिल्याच दिवशीं त्यांत काम करणारी कलावंत मंडळी हटकून दिसायचींच हा नियम असतो.

" दिसतंय् का रे कुणी ? " कुणीतरी चौकशी केली.

" अरे आलीय् रे उषाराणी...ती बघ वर त्या बॉक्समध्यें. अन् ती बघ रे छोटी पोरगी रखमी..."

रखमीनें अतिशय उंची पोषाक केला होता. नि ती साऱ्या थिएटरभर भिरी भिरी पाहात कुणाला तरी शोधीत होती. कुणाला...!

" सुंद्री ऽ ऽ—!"

तिला वर पाहून ओळखून बारकू मोठ्यानें ओरडला. लोक पाहूं लागले. " सुंद्री ऽ ऽ " अशी हांक ऐकतांच बेबी सौंदर्यप्रभा दचकून बारकू उभा होता त्या दिशेनें पाहूं लागली. पुन्हां बारकू ओरडला—

" सुंद्री ऽ ए सुंद्री ऽ ऽ—"

" बारकू ! माझा बारकू ऽ—"

" बेबी सौंदर्यप्रभा उर्फ सुंद्री वरून ओरडली. सारें थिएटर आश्चर्यचकित झालें. बारकू हातांतली सारी शेंग खालीं ठेवून सुंद्री होती तिकडे धावूं लागला. इकडे सुंद्रीही उषाराणीला सोडून बारकूच्या दिशेनें खालीं येण्यास निघाली. बारकू आणि सुंद्रीची भेट थियटर बाहेर जिन्याच्या तोंडीच झाली !

गंगायमुनांना पूर आले—

सुंद्रीला बारकू भेटला—

बारकूला सुंद्री भेटली—

आनंदी आनंद झाला—

" कुठें रे होतास इतके दिवस ? किती शोधलं तुला मीं ! किती वाट पाहिली तुझी......रडल्यें मी तुझ्यासाठीं किती किती ! का बरं मला सोडून गेलास ? का गेलास सांग ना......?"

" मुद्दाम नाहीं गेलों ग मी सुंद्री...खरंच नाहीं गेलों मी मुद्दाम. नशिबानं दगा दिला ! कर्मानं तुझीं माझी ताटातूटच व्हायची होती. मी चोरांच्या तावडींत सांपडलों होतों. आतां नाहीं तुला मी कधीं सोडून जाणार. आतां नाहीं हो रडवणार तुला ! "

तें दृश्य बघून दगडालाही रडूं आलें असतें मग माणसांची काय कथा ?

★

## प्रकरण २२ वें

# निराळी दुनिया

उरलेला खेळ बारकूनें सुंद्री आणि उषाराणी ह्यांच्या बरोबर बॉक्स मध्यें बसून पाहिला. सुंद्री आणि बारकू ह्यांचें मात्र खेळाकडे तितकेसें लक्ष होतें की नव्हतें कुणास माहीत. दोघांनाहीं ऐकमेकांशीं किती तरी बोलायचें होतें, खूप खूप प्रश्न विचारायचें होतें, खूप खूप सांगायचें होतें. खेळ संपेपर्यंत देखील त्यांना धीर न निघून तीं कुजबुजून एकमेकांशीं बोलत होतीं.

खेळ संपल्यावर उषाराणीच्या नि सुंद्रीच्या आग्रहावरून बारकू उषाराणीच्या मोटारींतून त्यांच्या घरीं गेला.

" आतां नको रे तूं मला सोडून जाऊं. पुन्हा तूं त्या कुंभारवाड्याकडे मुळींच जायचं नाहींस आतां. इथेंच आपण दोघांनीं राहायचें आपल्या या उषा-

राणी जवळ; " सुंद्री त्याला म्हणाली होती आणि तिच्या ह्या म्हणण्याला उषाराणीनेंही जोरदार संमती देऊन पुस्ती जोडली—

" आतां कशाला जायचें त्या घाणेरड्या ठिकाणीं परत. नकोच जाऊं आतां तूं परत. "

" पण इथं राहून मी काय करणार ? "

बारकूनं अडचण सांगितली.

" तूं कशाला काम करतोस ? इथं मजेंत राहा. खा, पी, चैन कर. " उषाराणी म्हणाली.

" मी करतें ना सिनेमांत काम. मग कसली पडणार कमतरता ? ते अभयकुमार आहेत ना, तें मला पुन्हां पुढच्या खेळांत काम देणार म्हणून म्हणत होते. फार छान आहेत रे ते— "

पण सुंद्रीनें जरी काम केलें तरी तिनें काम करावें नि आपण नुसतेंच खावें प्यावें, नि चैन करावी हें बारकूला पटण्यासारखें नव्हतें. तो सुंद्रीला एकांतांत म्हणाला,

" नुसतं खाऊन न् पिऊन कसं ग मजेंत राहतां येईल ? काम असलं तरच माणूस मजेंत राहूं शकतें का ? काम नसलें तर नाही बुवा करमणार मला. मला वाटतं मी इथं राहूनच माझा पेपर विकण्याचा धंदा चालूं ठेवावा— "

सुंद्रीनें बारकूचें तें म्हणणें उषाराणीच्या कानावर घातलें. पण सुंद्रीचें तें बोलणें ऐकून घेऊन उषाराणी खो खो हसूं लागली.

" काय झालं हसायला ? " सुंद्री गाल फुगवून उषाराणीला म्हणाली.

" अग हसूं नको तर काय करूं ? " उषाराणी आणखीच हसत म्हणाली. तो इथं राहणार नि वर्तमानपत्र विकायला बाहेर जाणार होय ? "

"अं...पण तो हेंच तर काम करतो नेहमी !" सुंद्री उषाराणीला खुलासा करीत म्हणाली. "तो छान विकतो बघा पेपर. अन् ओरडतो तर इतका गंमतीनें ! तुम्हीं एकदां ऐकलं पाहिजे त्याचं ओरडणं."

"ए सौंदर्यप्रभे, आतां नको बाई हंसवूस मला आणखी ! इतका चांगला मुलगा नि म्हणे तो इथं राहून वर्तमानपत्रं विकणार ! कांहीही बडबडतें वेडी !"

"पण मग तो तर कामावांचून रिकामा घरीं बसायला मुळींच तयार नाहीं. तो म्हणतो, काम नसलं तर आपण नाहीं इथं राहणार ! अन् तोच जर इथं राहिला नाहीं तर मग मी तरी कशी राहूं. मी देखील मग जाणार त्याच्या बरोबर तो जाईल तिकडे !"

"पण मी तरी कुठं तूं एकटी इथं राहा नि त्याला जाऊं दे म्हणून म्हणतें आहे ! तूं नि तो, तुम्ही दोघेंही इथं राहा."

"पण काम नसेल तर तो नाहींना राहणार !"

"पण अभयकुमार देतील ना काम त्याला. तुला कशी त्यांनीं प्रसिद्ध तारका बनवून सोडली, तशी त्याला ही ते प्रसिद्धी देतील आणि त्यालाही हातीं धरून चांगला बालनट म्हणन पुढें आणतील. मी विचारीन त्यांना त्या विषयीं..."

उषा राणीचें हें आश्वासन ऐकून सुंद्रीचे हात जणूं स्वर्गालाच लागले. ती धावत पळत बारकूकडे ती बातमी सांगायला गेली—

"आतां खूप खूप गंमत होणार रे बारकू ! अभयकुमार तुला सिनेमांत काम देणार ! खुद्द उषाराणी सांगणार की आमच्या बारकूला तुम्हीं काम दिलंच पाहिजे. मग काय, प्रश्नच नाहीं !"

ही बातमी ऐकून बारकुला देखील खूप खूप आनंद झाला. पण मध्येंच साशंक होत त्यानें विचारलें—

" पण काय ग, सिनेमांत काम करायचं म्हणजे मला माझं " बारकू " हें नांव बदलावं तर नाहीं ना लागायचें ? आपण नाहीं बुवा असलं छान नांव बदलणार. बारकू झक्क नांव आहे ! तुला नाहीं वाटत ? "

" वाटतं तर ? " सुंद्री एकदम होकार भरीत म्हणाली- " बारकू आहेच मुळीं छान नांव. मी सांगेन उषाराणीला की बारकूचं नांव आपलं बारकूच राहूं द्यायचं. मुळींच बदलायचं नाहीं."

सुंद्रीशीं बोलतां बोलतां बारकूला एकदम त्याच्या आईची आठवण झाली. आवंढा गिळीत तो सुंद्रीला म्हणाला--

" सुंद्री, बारकू हें नांव आईनं मला लाडानं ठेवलं. तिच्या तोंडून तें अतिशय गोड वाटे. आईची तेव्हढीच एक आठवण आतां शिल्लक आहे !... "

बारकूच्या आईचा उल्लेख निघतांच सुंद्रीला एकदम आठवण झाली—

" अरे बारकू, तुझी ती मऊ गोधडी मीं आणली आहे रे माझ्या बरोबर. इथंच पेटींत मी ती तुझ्यासाठीं जपून ठेवली आहे."

" कुठंय् ती—?"

बारकू एकदम उडी मारून ओरडला.

सुंद्रीनें त्याला एका पेटीपाशीं नेलें. पेटींत घडी करून तिनें ती गोधडी आणि बारकूनें तिच्यासाठीं घेतलेलें तें परकर-पोलकें ठेवलें होतें. बारकूला तें तिनें बाहेर काढून दाखवलें. बारकूनें तर ती गोधडी हृदयाशीं घट्ट धरून त्यावर आसवांचा अभिषेक केला......

" बारकू, खेळापुरतं तुझं नांव बदललं तर राहाशील ना रे कंपनींत ? " सुंद्रीनें विचारलें .

" म्हणजे ? कसं म्हणतेस ?"

" म्हणजे जशी मी खेळापुरती बेची सौंदर्यप्रभा पण खरीखुरी सुंद्रीच आहें तसं खेळापुरतं तुझं नांव त्यांनीं बद्ललं तर बद्लेनांत ?"

" आपण कांहीं तसं करायला तयार होणार नाहीं अं सुंद्री. बारकू म्हणजे बारकूच ! "

" असं रे काय करतोस ?"

" बघ अं सुंद्री, मी मग निघून जाईन आपला इथून."

" निघून जाईन म्हणजे ? मला सोडून की काय ? मी नाहीं तुला जाऊं द्यायची. तूं जाशलि तिकडे मीही येईन......"

दोघांचे हे संवाद् इकडे चालूं होतें तर तिकडे उषाराणीनें अभयकुमार ह्यांना भेटून बारकूच्या कामाविषयीं त्यांना विचारूनही टाकलें होतें.

बारकूची ट्रायल घेण्याचेंही नक्की झालें.

ट्रायलसाठीं ठरलेल्या दिवशीं उषाराणीच्या मोटारींतून बारकू, उषाराणी न सुंद्री स्टूडिओंत गेलीं. ट्रायलचें काम रीतसर सुरूं झालें.

बारकू नाकीं डोळीं नीटस होता. त्याचे तरतरीत डोळे, सरळ नासिका, उंच कपाळ आणि नैसर्गिक कुरळे केंस यांमुळे तो छान दिसत असे. बारकू ट्रायलमध्यें हां हां म्हणतां उत्तीर्ण होईल असेंच सर्वांना वाटत होतें. पण झालें मात्र भलतेंच...!

सर्व तयारी झाली. कॅमेरा अँगल घेऊन उभा राहिला. रिफ्लेक्टर्स रोखले गेले. रेकॉर्डींग ॲपरेटस् सज्ज झालें आणि बारकूची चांचणी सुरूं झाली.

पण काय झालें कुणास माहीत......

एरव्हीं धीटपणें वावरणारा बारकू तें सारें गौडबंगाल पाहून हादरूनच गेला ! अभयकुमारांनीं पुढें होऊन त्याला कांहीं अभिनांच्या सूचना दिल्या. पण त्या हजारों कँडल पावरच्या झगमगाटांत बारकू थरथर कांपत नुसतांच उभा राहिला...

" अरे, भितोस कशाला ? भिऊं नको. जरा हसून दाखव बरं......"

पण अभयकुमार तसं म्हणायला आणि त्याच्या डोळ्यांवर रिफ्लेक्टरचा प्रकाश झोत येऊन तें एकदम दिपून जायला एकच गांठ पडली. बारकू अधीकच गांगरून गेला. त्याच्या डोळ्यांत पाणी भरलें. तोंड आधिकच रडवें दिसूं लागलें—

अभयकुमारांनीं तोंड वेडेंवाकडें केलें आणि नकारार्थीं मान हालवली.

" त्यानें कधीं पूर्वीं स्टूडिओंत प्रवेश सुद्धां केला नाहीं म्हणून असें होत असेल." उषा राणी अभयकुमारची समजूत घालीत म्हणाली. " पुन्हां चान्स दिला तर सुधारणा दिसेल मला वाटतें."

केवळ उषाराणीच्या शब्दाला मान द्यावा म्हणून एकदां तो सर्व विधी झाला. नुसती साऊंड टेस्ट सुद्धां घेऊन पाहिली. पण साऊंड रेकॉर्डर " व्हेरी पूवर !" म्हणून गरजला.

सगळ्यांचीच निराशा झाली. उषा राणीलाही फार वाईट वाटलें. सुंद्री तर कांहीं न बोलतां अश्रूच गाळूं लागली. परत उषाराणीच्या मोटारींतून तीं सारीं-जणें परत फिरलीं. रस्त्यानें कोणीच कोणाशीं कांहीं बोललें नाहीं....

★

## प्रकरण २३ वें

# जिथं बारकू तिथं सुंद्री !

उषाराणी बरोबर घरीं आल्यावर जेवतांनाही त्या रात्रीं कुणीच कुणाशीं बोललें नाहीं. मुकाट्यानें जेवणें आटोपलीं, बारकू व सुंद्री लगेच झोपायला सुद्धा गेलीं बिछान्यावर पडल्या पडल्या पलीकडल्याच बिछान्यावर पडलेल्या बारकूला धीर देत सुंद्री म्हणाली—

" बारकू, उषाराणी काय म्हणत होत्या माहीत आहे ?"

" काय म्हणत होत्या ?" बारकूनें विचारलें.

" त्या म्हणत होत्या, तुला त्या यंत्रांची संवय नाहीं. तूं भेदरून गेला म्हणून अशी ट्रायल दिली. सवंय झाली की सारं कांहीं ठीक होईल. जमेल तुला."

" हं—"

" खरंच ना. अभयकुमार सुद्धां म्हणालें पुन्हां एखादे दिवशीं आणखी ट्रायल घेऊन पाहूं म्हणून."

" हं—"

" बोल ना रे कांहीं. नुसतंच हूं हूं काय करतोस ?"

बारकू तरीही गप्पच.

सुंद्रीही मग गप्प झाली.

बारकू विचार करीत होता—

" आपली दुनिया निराळी आहे. ही जी आहे ही दुनिया निराळी आहे ! सुंद्री ह्या दुनियेंत मिसळूं शकते. किती छान काम करते सुंद्री ! लोक तिचं किती कौतुक करतात ! एव्हढासा जीव पण किती कर्तबगार ! झक्क काम केलं तिनं रखमीचं. तसं काम करायला अंगचे गुणच हवेंत ! उगीच कुणी माझ्या सारख्याला रडतरावाप्रमाणें घोड्यावर बसवलें म्हणून थोडेंच होतें ? आपणास नाहींच तें जमायचें. मारून मुटकुन कुठें कुणाला कलावंत होता येतं ?

" संवय नाहीं म्हणून असें होतें " असें उषाराणी म्हणाल्या. उषाराणी तसें नुसतें सुंद्रीच्या समाधानासाठीं म्हणाल्या. आपणास ह्या कामाची कधींच संवय होऊं शकणार नाहीं. आपण नाहींच ह्या दुनियेचें मग कसें जमणार ? हें विश्व वेगळें आपलें विश्व वेगळें. आपला पेशा निराळा हेंच खरें. आपण त्याच लायकीचें. जन्मभर गरीबींतच जाणार आपला. गरीबींत जन्मलों गरीबींतच मरणार ! श्रीमंति आपल्या नाशिबांत नसली तरी ती सुंद्रीच्या नशिबांत आहे... ! आपण कशाला तिला भार व्हावें ?

"अन् ज्या दुनियेचें आपण नाहीं त्या दुनियेंत आपण आतां ह्याउप्पर राहूं नये हेंच उत्तम. ज्या गांवचें आपण नाहीं तिथें आपण पाहुणेच. आज आहों उद्या नाहीं. इथं आतां ह्या पुढें राहायचें म्हणजे निष्क्रीय बनूनच राहायचें. आयतं खायचं आणि उषाराणी व सुंद्री ह्यांना भार व्हायचा...

त्याला आईचा उपदेश आठवला...

"बाळा, देवानं काम करायला हात दिले आहेत. काम करून खावें हेंच देवाला मान्य असतें.

आपण निष्क्रिय झालों, दुसऱ्याला भार झालों, मेलेलं अन्न खाऊं लागलों तर देवाला तें बरें वाटणार नाहीं. आईच्या आत्म्याला कष्ट होतील!

आपण येथून जाऊं म्हटलें तरी सुंद्री आड येणार, ती आपणास जाऊं देणार नाहीं. म्हणेल तूं जातोस तर मी देखील येत्यें. जिथं बारकू तिथं सुंद्री!...

...जिथं बारकू तिथं सुंद्री...पण...

आतां बारकू आणि सुंद्री ह्यांची दुनिया वेगळी झाली. सुंद्री किती सुखांत आहे उषाराणी जवळ. खाते, पिते, छान छान कपडे घालते, एखाद्या राजाच्या राजकुमारी प्रमाणें उषाराणी तिची बडदास्त ठेवते ..हें सारें सोडून सुंद्री आपणा बरोबर आली तर...

त्याला गोल देवळाजवळची ती भिकार कुंभावाडा लेन आठवली. तेथली ती दादराखालची जागा त्याच्या कल्पनाचक्षूंपुढें उभी राहिली. त्या भिकार खातेऱ्यांत सुंद्रीला कशाला न्यायचें?

मग?......

इथें निष्क्रीय होऊन बसायचें?......

त्या पेक्षां असें केलें तर?......

आणि मनाच्या तसल्या निराशामय स्थितींत कसें तरी जगायचें म्हणून खायचें आणि खायला पैसे हवेत म्हणून काम करायचें अशा बेफिकीरीनें तो आपले रोजचे व्यवहार पार पाडूं लागला.

सुंद्रीचें शोध लावण्याचें प्रयत्नही दिवसेंदिवस कमी होत गेले. उगीच कुठें जाऊन परत थकून भागून निराशाच पदरीं घेऊन परत येण्याचा त्याला कंटाळा आला. नंतर तो सुंद्रीचा शोध करायला जातनासा झाला. कधीं तरी सुंद्रीची खूप खूप आठवण होऊन मन अगदींच बेचैन झालें तरच तो बाहेर पडे; पण त्याला यश म्हणून लाभलेंच नाहीं...

असेंही कित्येक दिवस गेले...

सुंद्री बारकूच्या जीवनांतून कायमची दूर गेली कां ? तिचा त्याचा वियोग नेहमीसाठीं झाला कां ?...

★

## प्रकरण २१ वें

# सुंद्रीची पुनर्भेट !

युद्धकालांत कुणाला, कसा नि केव्हां भाव येईल हें कुणालाच सांगता येत नव्हतें. निशात टॉकीज हें वास्तविक सेकंड रन् थर्ड रन् बोलपटांचें थियटर. पण युद्धजन्य काळांत भरमसाट चित्रांच्या निर्मितीपुढें बोलपट गृहेंच मुंबईत मिळेनाशीं झाल्यानें निर्माते—दिग्दर्शक अभयकुमार यांना आपल्या नूतन चित्राच्या प्रथम प्रसिद्धीकरणासाठीं ह्याच निशात थियटरच्या नाकदुऱ्या काढाव्या लागल्या होत्या....

"पत्र्याची चाळ" हा चित्रपट तयार करतांना अभयकुमार ह्यांनीं अतोनांत श्रम घेतले होते व पाण्यासारखा पैसा ओतला होता. चित्र अतिशय सरस

होणार ह्याबद्दल कुणाचेंच दुमत नव्हतें. अभयकुमारांचीं सर्वच चित्रें श्रेष्ठ ठरायचीं निघत. प्रेक्षक अभयकुमारांचें चित्र म्हटलें कीं मोठाल्या आकांक्षा मनांत बाळगून तें बघायला धाव घेई आणि बहुधा त्याच्या अपेक्षा चुकत नसत.

"पऱ्याची चाळ" हा बोलपट तयार होत असतांच हिंदी, उर्दू, मराठी व इंग्रजी पत्रांतूनही त्याची अगदी जोरदार पब्लीसिटी चालू होती.

नेहमींच्या ठराव ठशांच्या रडक्या प्रेमकथा पाहून कंटाळलेल्या प्रेक्षकांना "पऱ्याच्या चाळींत" निःसंशय नाविन्य दिसेल असा सर्वत्र निर्वाळा देऊन वैचारिक धक्क्यांबरोबरच भरपूर मनोरंजन देखील मिळवून देण्याची प्रचारकानें हमी घेतली होती. चित्रपटाचें संगीत देखील एक जबरदस्त आकर्षण होतें. प्रोफेसर सुगंधराव भालेराव ह्यांचें संगीतनियोजन म्हणजे कांहीं सामान्य बाब नव्हती! "रडूं मी सिनेमांत?" ह्या खेळांतील त्यांचीं सर्व गाणीं रस्त्यारस्त्यांतून व घरांघरांतून गायलीं जात होती. 'तानसेन' खेळांत दीपक राग गाऊन तानसेनानें विझवलेले दिवे लावून दाखवले होते त्यावर प्रतिहल्ला म्हणून त्यानंतर लौकरच निघालेल्या "रडूं मी सिनेमांत?" ह्या क्रांति चित्रांत प्रो. भालेराव ह्यांनीं 'अजब मिश्र' ह्या नवीन रागदारीच्या सुरांनी लावलेले दिवे कसे आपोआप विझवतां येतात हें प्रत्यक्ष प्रेक्षकांच्याच डोळीं उतरविलें होतें......चित्रपटांत भूमिका करणाऱ्या व्यक्तीही कांहीं अशा तशा नव्हत्या. पौराणिक चित्रपटांतील उषा उर्वशीपासून तर आधुनिक अजबखान्यांतील फाकडूं हौशीपर्यंत सर्वच भूमिका सारख्या तन्मयतेनें करणाऱ्या उषाराणीची त्या खेळांतील मोठ्या रखमीची भूमिका अतिशय अभिनव होणार होती. एन्शंट थिएटर्सच्या गांवसासुपासून तर मॉडर्न पिक्चर्सच्या बारा वर्षांच्या येसूपर्यंत सर्व वयांच्या भूमिका सारख्याच स्थूल शरीरानें करणारी मिस चंद्रिका ताराच्या आईचें काम जहांबाज रीतीनें वठवणार असून मुक्या जमान्यांतील भराभर मुके देण्याच्या भयंकर अभिनयापासून तर बोलपटांत पटापट कुणाच्याही प्रेमांत विणाकारण पडण्याच्या पोरखेळापर्यंत साऱ्या करामती बेधडक करणाऱ्या मिस अक्षयकुमारी खुद्द ताराची फटाकडी भूमिका सांभाळणार होत्या. नायकाचें

# राजा अंबरीष

२८९८३
आ. वा.
२८७८२
दि. १९।१०।७१

## श्रीविष्णूंचें दर्शन

फार फार वर्षांपूर्वींची गोष्ट. अंबरीष नांवाचा एक राजा होता. सर्व पृथ्वीवर त्याचेंच राज्य होतें. तो उदार होता. धार्मिक होता. न्यायी होता. प्रजेचें तो स्वतःच्या मुलांप्रमाणें पालन करीत असे. त्यामुळें प्रजेचा आवडता होता तो. त्याची पत्नी सुंदर होती. सद्गुणी होती. मुलेंही हुशार आणि आज्ञाधारक होतीं. कसलीच उणीव नव्हती त्याच्या सुखांत. भाग्यवान् होता तो राजा.

त्या सुशील राजाची विष्णूवर दृढ भक्ति होती. मनानें भगवंताचें चिंतन करावें, मुखानें त्याचे गुण गावे, डोळ्यांनीं त्याच्या मूर्तीचें पुन्हां पुन्हां दर्शन घ्यावें. दानधर्म करण्यांतच पैशाचा विनियोग करावा. अशा तऱ्हेनें तो आपलें आयुष्य घालवीत होता. याच गोष्टींत त्याला आनंद वाटे. त्यांतच जणूं त्याचें सगळें सुख सांठविलेलें होतें.

भगवंतांच्या दर्शनाची त्याला उत्कंठा लागली होती. भगवान् प्रसन्न व्हावे, त्यांचें दर्शन आपल्याला घडावें, त्यांनीं आपणाला धन्य करावें असा त्याला सारखा ध्यास लागला होता. दिवसेंदिवस त्याची उत्कंठा वाढत होती.

परमेशाच्या दर्शनाशिवाय एक एक क्षण घालविणें सुद्धां त्याला असह्य होत होतें.

त्यानें विद्वान् ब्राह्मणांना बोलाविलें. आपल्या अंतः-करणाची होत असलेली तळमळ समजावून त्यांना सांगितली. त्यांचा सल्ला घेतला. ब्राह्मण म्हणाले, "राजा, सरस्वती नदीच्या कांठीं यज्ञ कर. त्या यज्ञानें भगवान् प्रसन्न होतील. आणि तुझी इच्छा पूर्ण होईल."

राजानें यज्ञाची तयारी करण्याची सेवकांना आज्ञा दिली. त्या परमपवित्र नदीच्या कांठीं यज्ञमंडप तयार झाला. वसिष्ठ, गौतम वगैरे विद्वान् ब्राह्मणांना ऋत्विज म्हणून बोलावण्यांत आलें. यज्ञाला सुरवात झाली. राजानें या यज्ञासाठीं आपलें सर्वस्व वेचलें. लवकरच तो यज्ञ निर्विघ्नपणें पार पाडला.

राजाची दृढ भक्ति पाहून भगवान् विष्णु प्रसन्न झाले. आपल्या दर्शनाशिवाय राजाला दुसरी कसलीच आशा नाहीं हें पाहून त्यांना त्याचें कौतुक वाटलें. भक्तवत्सल विष्णु प्रसन्न झाले. ते यज्ञकुंडांतून प्रकट झाले. भगवंतांची श्याम-सुंदर मूर्ति पाहून सर्वांच्या डोळ्याचें पारणें फिटलें. त्यांना परमानंद झाला.

राजाचा आनंद तर गगनांतही मावेनासा झाला. आपल्या श्रमाचें सार्थक झालें. आपली मनीषा पूर्ण झाली. आपण कृतकृत्य झालों असें वाटलें राजाला. त्यानें भगवंतांचे पाय घट्ट धरले. त्याच्या डोळ्यांतून आनंदाश्रु वाहूं लागले. त्या अश्रूंनीं भगवंतांचे पाय धुऊन निघाले.

भगवंतांनीं राजाला वर उचललें. त्याला आपल्या हृदयाशीं कवटाळिलें. राजावर प्रेमाचा जणूं वर्षावच केला त्यांनीं.



आईला आपल्या मुलाला हृदयाशीं धरतांना जसा आनंद होतो तसाच आनंद भगवान् विष्णूंना होत होता. भक्ताचा आधार ईश्वरच असतो. भगवान् म्हणाले, "अंबरीषा, तुझ्या भक्तीनें

मी संतुष्ट झालों आहें. भक्तांचें रक्षण करणारें आणि दुर्जनांचा नाश करणारें माझें हें सुदर्शनचक्र तुझें सदैव रक्षण करील. तें तुझ्यावर आलेल्या कोणत्याही संकटाचें निवारण करील." एवढें बोलून भगवान् अंतर्धान पावले.

राजा समाधान पावला. त्यानें दानधर्म केला. सर्वांना संतुष्ट केलें.

★

## दुर्वासऋषि

अशा तऱ्हेनें यज्ञसमारंभ पार पडला. पण राजा देवाला विसरला नाहीं. वर्षामागून वर्षें गेलीं. पण राजानें विष्णूची उपासना पूर्वीप्रमाणें सुरू ठेवली. एकदां त्यानें साधन द्वादशी नांवाचें भगवान् विष्णूचें व्रत केलें. व्रतसमाप्तीच्या वेळीं त्यानें तीन दिवस उपोषण केलें. यमुनेमध्यें स्नान केलें. श्रीहरीला महाभिषेक केला. गंध, धूप, दीप इत्यादि षोडशोपचारांनीं त्याची यथाविधि पूजा केली. नंतर विद्वान्, निःस्पृह व भगवद्भक्त ब्राह्मणांचीही त्यानें पूजा केली. त्यांना सुग्रास भोजन घातलें. त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांना दक्षिणा दिली. पुष्कळ दूध देणाऱ्या सुंदर सुंदर गाई त्यांना दान दिल्या. ब्राह्मण प्रसन्न झाले. त्यांनीं राजाला आशीर्वाद दिले.

यानंतर ब्राह्मणांची अनुज्ञा घेऊन अंबरीष आपल्या व्रताची सांगता करण्याच्या तयारीला लागला. इतक्यांत दुर्वास मुनि

त्याच्याकडे आले. राजानें त्यांना सन्मानपूर्वक उच्चासनावर बसविलें. त्यांची पूजा केली. त्यांचा सत्कार केला. "मुनिवर, आतां दुपारची वेळ झाली आहे. आश्रमाला परत न जातां येथेंच भोजन करावें" अशी त्यानें त्यांची प्रार्थना केली.

दुर्वासांनीं राजाच्या विनंतीला मान दिला. ते म्हणाले, "राजा, नदीवर जाऊन स्नानसंध्या उरकतों. नंतर भोजन करूं." दुर्वास मुनि यमुनेवर स्नानाला गेले. त्यांनीं स्नान आटोपलें व गायत्री मंत्राचा जप करीत ध्यानस्थ बसून राहिले.

राजा ऋषि परत येण्याची वाट पहात होता. पण अजून-पर्यंत दुर्वास ऋषि परत आले नव्हते. त्यांची समाधि उतरली नव्हती. इकडे द्वादशी तर फक्त एकच घटका शिल्लक राहिली होती. द्वादशी संपण्यापूर्वीं व्रताची समाप्ति करणें आवश्यकच होतें. कारण द्वादशी असतांनाच व्रताची सांगता झाली पाहिजे असा नियम होता.

राजापुढें मोठा पेंच पडला. द्वादशी संपण्यापूर्वीं पारणा केली नाहीं तर व्रतभंग होतो. आणि दुर्वास परत येण्यापूर्वीं जर पारणा केली तर ते रागावतील अशी भीति! राजाला इकडे आड आणि तिकडे विहीर असें होऊन गेलें. काय करावें हेंच सुचेना त्याला.

त्यानें पुन्हा विद्वान् ब्राह्मणांचा सल्ला घेतला. अन् त्यांच्या विचारानें त्यानें असें ठरविलें कीं, जर न जेवतां नुसतें तीर्थच घेतलें तर पारणा होते आणि शिवाय उपासही मोडत नाहीं. राजाला आनंद झाला. कारण या उपायानें दुर्वास ऋषींचा

अपमानही होणार नव्हता आणि व्रतसमाप्तीसाठीं द्वादशीही साधणार होती.

याप्रमाणें निर्णय ऐकल्यावर राजानें भगवंताचें नामस्मरण केलें. तीर्थ घेतलें. व्रताची पारणा केली. अन् नंतर दुर्वास ऋषि परत येण्याची वाट पहात तो बसून राहिला.

★

## सुदर्शनचक्र

थोड्याच वेळानें दुर्वास ऋषि यमुनेवरून आपलें नित्यकर्म उरकून परत आले. अंबरीषानें पूर्वीप्रमाणेंच त्यांचें स्वागत केलें. पण राजानें व्रताची पारणा केली हें दुर्वास ऋषींना अंतर्ज्ञानानें समजलें होतें.

आधींच दुर्वास ऋषि म्हणजे रागीट. त्यांत त्यांचा अपमान झाला. जणूं निखाऱ्यावरील राख वाऱ्यानें उडून जाऊन अग्नि प्रज्वलित झाला. दुर्वासांचे डोळे रागानें लाल लाल झाले. त्यांचें सर्व शरीर थरथरां कांपूं लागलें. ते म्हणाले, "राजा! तूं माझा अपमान केलास. मला आतिथि म्हणून बोलाविलेंस आणि मी येण्यापूर्वींच तूं व्रताची पारणा केलीस. स्वतःला विष्णुभक्त म्हणवितोस आणि अशा तऱ्हेनें धर्माचा अवमान करतोस. हें तुला शोभत नाहीं. या तुझ्या वर्तनाबद्दल तुला कडक शासन करणें अवश्य आहे." असें म्हणून ऋषींनीं राजाला शाप दिला, "हे राजा! तुला दहा वेळां गर्भवास सोसावा लागेल."

दुर्वास ऋषींचा हा शाप ऐकून राजाला वाईट वाटलें. त्याचें हृदय दुःखानें भरून आलें. ऋषि शाप देतील

म्हणून तो भीत होता. अन् नेमकी तीच गोष्ट त्याच्यापुढें दत्त म्हणून उभी राहिली. आतां त्याला भगवान् विष्णूंचाच काय तो आधार होता. तो सद्गदित स्वरानें भगवंताचा धांवा करूं लागला. "हे माधवा ! हे श्रीहरि ! हे करुणाकरा ! मला ऋषींच्या या शापांतून मुक्त कर. हे देवा ! या संकटांतून मला सोडव."

भक्ताचा तो धांवा ऐकून भगवान् प्रकट झाले. ते म्हणाले, "अंबरीषा ! ऋषींनीं दिलेला शाप खोटा होणार नाहीं. त्यांनीं तपश्चर्या केली आहे. त्यांनीं उच्चारलेल्या शब्दामध्यें सामर्थ्य आहे. पण तूं घाबरूं नकोस. दहाही गर्भवासांचें दुःख मी स्वतः सोशीन. तूं काळजी करूं नकोस, स्वस्थ रहा." इतकें बोलून भगवान् अंतर्धान पावले.

याप्रमाणें भगवान् विष्णूंनीं राजाला आपल्या पाठीशीं घातलें. राजाला कोणतेंच शासन झालें नाहीं. त्याला कोणताच दंड सोसावा लागला नाहीं. हें पाहून दुर्वास ऋषींचा राग अधिकच चेतावला. त्या रागाच्या भरांत त्यांनीं आपल्या जटेंतील केस उपटून हातांत धरला. कांहीं मंत्र म्हटले. त्या मंत्राच्या सामर्थ्यानें तो केस धगधगीत दिसूं लागतांच त्यांनीं तो केस जमिनीवर आपटला.

त्याच क्षणीं त्या केसापासून एक भयंकर राक्षसी निर्माण झाली. तिच्या डोळ्यांतून ठिणग्या बाहेर पडत होत्या. तोंडांतून आगीच्या ज्वाला येत होत्या. तिची जीभ रक्तासाठीं आसुसल्यामुळें बाहेर लोंबत होती. तिच्या हातांत नागवी

तरवार होती. अशी ती महाभयंकर अक्राळविक्राळ राक्षसी राजाच्या अंगावर धांवली.

राक्षसी आपणावर चालून येत आहे म्हणून राजा घावरला नाहीं. उभ्या असलेल्या जागेवरून तिळमात्र हालला नाहीं. त्याला माहीत होतें, अनुभवानें पटलें होतें कीं, 'विष्णु-भक्तांना कशापासूनही भीति नाहीं.' त्याला विश्वास होता कीं, 'भगवान् आपलें रक्षण करतील.' भगवान् विष्णूंचें नामस्मरण करीत तो स्थिर उभा राहिला.

राजाचा नाश करण्यासाठीं ती राक्षसी राजाच्या अगदीं जवळ आली. तोंच वीज चमकल्याप्रमाणें प्रकाश पडला. एकाद्या चवताळलेल्या वाघाप्रमाणें भगवान् विष्णूंचें सुदर्शन-चक्र त्या राक्षसीवर चालून गेलें. अन् मग एका क्षणांत त्या राक्षसीचें भस्म झालें. पण एवढ्यानेंच त्या चक्राचें समाधान झालें नाहीं. भगवंतांच्या प्रिय भक्ताला विनाकारण त्रास देणाऱ्या दुर्वासऋषींच्याही अंगावर तें चक्र चालून गेलें.

★

## देवा, माझें रक्षण करा !

आपण निर्माण केलेल्या राक्षसीमुळें राजाचा नाश होईल अशा कल्पनेंत दुर्वासमुनि तेथेंच उभे होते. पण मध्येंच हें चक्र प्रकट झालें, त्यानें आपण उत्पन्न केलेल्या राक्षसीचा नाश केला. अन् आतां तें आपणावरच चालून येत आहे हें पाहून त्यांची घाबरगुंडी उडाली. प्राण वांचविण्यासाठीं ते वाट फुटेल तिकडे पळत सुटले. परंतु तें चक्रही त्यांचा

८८६६३

पाठलाग करीत त्यांच्या मागें लागलें होतें. सुदर्शनचक्राच्या तेजानें ऋषींचें अंग नुसतें भाजून निघत होतें.

राजवाड्यांतून निघून दुर्वास सर्व दिशांना पळत सुटले. पण जिकडे जिकडे ते गेले तिकडे तिकडे तें चक्रही त्यांच्या मागेंच होतें. ते पाताळांत गेले, स्वर्गात गेले, पण चक्र कांहीं त्यांचा पिच्छा सोडीना. सर्व त्रैलोक्यांत सुरक्षित अशी एकही जागा मुनींना आढळेना.

आतां मात्र त्यांचा धीर खचला. त्यांना कांहीं सुचेना. ह्या संकटांतून सुटण्यासाठीं त्यांनीं ब्रह्मदेवाला शरण जाण्याचें ठरविलें. ते सत्यलोकीं गेले. त्यांनीं ब्रह्मदेवाला वंदन केलें. सर्व हकीकत थोडक्यांत सांगून भगवंतांच्या तेजस्वी चक्रापासून आपला बचाव करण्याची ब्रह्मदेवाला त्यांनीं विनंति केली.

ब्रह्मदेव म्हणाले, "दुर्वासा! विष्णूंचें सामर्थ्य अपार आहे. विष्णूंना त्यांचे भक्त स्वप्राणापेक्षांही अधिक प्रिय आहेत. तूं त्यांच्या भक्ताचा छळ केलास म्हणून हें चक्र तुझ्यामागें लागलें. तुझें रक्षण करण्यास मी असमर्थ आहें. तूं शंकरांकडे जा. ते सामर्थ्यशाली आहेत. शिवाय विष्णूंची आणि त्यांची खूप मैत्री आहे. ते तुझा बचाव करतील."

दुर्वासऋषि तेथून निघाले. कैलास पर्वतावर आले. शंकरांच्या पायां पडले व म्हणाले, "महादेवा, श्रीविष्णूंचें सुदर्शनचक्र माझ्या पाठीमागें लागल्यामुळें माझ्या सर्वांगाची नुसती आग आग होत आहे. कैलासनाथा! कृपाळू होऊन माझें रक्षण करा."

शंकर म्हणाले, "दुर्वासा, आम्ही सर्व देव भगवान् विष्णूंच्या आज्ञेंत वागतों. सर्वशक्तिमान् विष्णूंच्या सुदर्शन-चक्राचें निवारण करून तुझा बचाव करण्याचें सामर्थ्य श्रीविष्णूं खेरीज कोणाच्याच अंगीं नाहीं. हा सर्व त्रास टाळण्यासाठीं तूं भगवान् विष्णूंनाच शरण जा. तेच तुझें रक्षण करतील."

दुर्वासऋषींना शंकराचा मोठाच भरंवसा वाटत होता. ते कांहीं तरी मार्ग काढतील अशी त्यांना आशा होती. परंतु त्यांनीं श्रीविष्णूंकडे बोट दाखविलें.

★

## पश्चात्ताप

दुर्वासऋषि कैलासाहून निघाले. महादेवापासून ते बाजूला होतांच सुदर्शनचक्र पुन्हां त्यांच्या मागें लागलें. त्याच्या तेजानें दुर्वासांना नको नकोसें होऊन गेलें होतें. शेवटीं हा त्रास सोशीत दुर्वास वैकुंठलोकीं आले.

भगवान् विष्णु सिंहासनावर बसले होते. दुर्वासऋषींनीं भगवंताच्या चरणांवर लोटांगण घातलें अन् ते म्हणाले, "हे देवाधिदेवा, तुझी योग्यता मीं ओळखली नाहीं. स्वतःच्या शक्तीच्या घमेंडीनें मीं राजाचा छळ केला. तुझें दुष्प्राप्य दर्शन घडलें, पण मला सुबुद्धि सुचली नाहीं. मी रागानें आंधळाच झालों होतों. तपश्चर्येनें मिळालेल्या सामर्थ्यानें मी उन्मत्त झालों. जगाच्या उद्धारासाठीं त्या सामर्थ्याचा उपयोग करण्याऐवजीं शाप देण्यासाठीं त्या सामर्थ्याचा उपयोग केला. लोकांचें कल्याण न करतां लोक आपणाला भितात

यांतच धन्यता मानली. हे भगवन् ! पण आतां माझे डोळे



उघडले. हे दयाघना, तूं माझ्यावर दया कर. माझें रक्षण कर. मी तुला सर्वस्वीं शरण आलों आहें."

भगवान् विष्णूंनीं दुर्वासाचें गाऱ्हाणें ऐकून घेतलें. नंतर ते म्हणाले, " दुर्वासा, मी सर्वस्वीं भक्तांच्या आधीन आहें.

शिवाय तें चक्र अंबरीषाच्याच आज्ञेंत आहे. तेव्हां तूं अंबरीषाकडे जा. तोच तुझें संकट नाहींसें करील, तुला दुःखमुक्त करील."

दुर्वासांचा भगवंताच्या बोलण्यावर विश्वास होता. पण पुन्हां अंबरीष राजाकडे जावयाचें, त्याची क्षमा मागावयाची, त्याच्यापुढें पदर पसरावयाचा ? छे! तो विचार त्यांना सहनच होईना.

पण काय करणार? सुदर्शनचक्रापासून बचाव करण्याचा तोच एक मार्ग होता. त्याच्यावांचून दुसरा कोणताच मार्ग त्यांना दिसत नव्हता. शेवटीं नाइलाजानें ते अंबरीषाकडे निघाले.

सुदर्शनाच्या पाठलागाची हकीगत राजाला मुळींच ठाऊक नव्हती. मुनि रागावून निघून गेले. आपल्या हातून अपराध घडला. बोलाविलेल्या अतिथीचा आपल्या हातून सन्मान राखला गेला नाहीं. अतिथी असंतुष्ट राहिला. भोजन न करतांच निघून गेला. याचें राजाला राहून राहून वाईट वाटूं लागलें. त्यानें स्वतःच्या अपराधाबद्दल स्वतःलाच शासन करण्याचें ठरविलें. म्हणून रागावून गेलेले दुर्वासऋषि परत येईपर्यंत न जेवण्याचा त्यानें निर्धार केला.

भगवान् विष्णूंना ठाऊक होतें कीं, राजा अजूनही उपाशी आहे. सुदर्शनचक्र येथेंच आवरून घेतलें तर दुर्वासांना राजाकडे जाण्याचें कांहींच कारण राहणार नाहीं. राजाला किती काळपर्यंत उपास घडेल याचाही अंदाज करतां येण्यासारखा नव्हता आणि उपासानें कितीही त्रास पडला तरी राजाचा निश्चय ढळला नसता.

शिवाय दुर्वास ऋषींच्या अहंकाराचा समूळ नाश होणें आवश्यक होतें. त्यांच्या अहंकाराचा समूळ नाश व्हावा, त्यांचें अंतःकरण निर्मळ व्हावें आणि क्रोधापासून त्यांची सुटका व्हावी ह्या हेतूनें त्यांनीं दुर्वासांना राजाकडे पाठविलें.

राजा अंबरीष राजवाड्यांत बसला होता. दुर्वास गेल्यापासून तो चिंतामग्न होता. अचानकपणें दुर्वासऋषि तेथें आले. त्यांना पाहून राजा उठला. आणि तो त्यांचें स्वागत करणार तोंच ऋषींनीं त्याचे पाय धरले. दुर्वासासारख्या अभिमानी तपस्व्यानें आपले पाय धरावे, हें चमत्कारिक वाटलें राजाला.

पण तो कांहीं बोलणार तोंच सर्व हकीगत त्याला सांगून दुर्वास ऋषि म्हणाले, " राजा ! सुदर्शन चक्रापासून होणारा त्रास मला अगदीं सहन होत नाहीं. 'हें चक्र तुझ्या आज्ञेंत आहे' असें भगवान् विष्णु मला म्हणाले. राजा ! हें चक्र आवरून घे. मला या त्रासापासून सोडव. माझी तुला काकुळतीची विनंती आहे ही. "

ऋषींनीं केलेली विनवणी ऐकून राजाच्या हृदयाला द्रव आला. ऋषींना होणाऱ्या त्रासाच्या कल्पनेनें त्याला त्यांच्याबद्दल अनुकंपा वाटूं लागली. त्यानें हात जोडले व अंतःकरणपूर्वक सुदर्शनाची स्तुति केली. दुर्वासांची संकटांतून मुक्तता व्हावी म्हणून त्यानें सुदर्शनाची प्रार्थना केली.

राजानें केलेल्या प्रार्थनेमुळें सुदर्शनचक्र शांत झालें. चक्रापासून होणाऱ्या त्रासांतून ऋषींची सुटका झाली. ते निर्भय झाले. त्यांनीं राजाला आशीर्वाद दिले व म्हणाले, " राजा, तूं माझ्या अपराधाकडे दुर्लक्ष केलेंस. सुदर्शनचक्राची

प्रार्थना केलीस. माझ्या अंगाची होणारी आग थांबविलीस. माझ्या प्राणाचें रक्षण केलेंस. अंबरीषा, खरोखरच तूं माझ्यावर अनंत उपकार केले आहेस."

★

## राजा, तूं धन्य आहेस !

ऋषींची सुदर्शनचक्रापासून सुटका झाल्यावर राजानें त्यांची पूजा केली. त्यांच्या जेवणाची व्यवस्था करण्याची त्यानें आज्ञा दिली. दुर्वास प्रसन्न झाले. आणि जेव्हां त्यांना कळलें कीं, आपण गेल्यापासून राजा उपाशीच आहे तेव्हां त्यांचें हृदय भरून आलें. ते प्रेमानें म्हणाले, "राजा ! तूंही भोजन कर."

भोजन आटोपलें. दुर्वासऋषि परत निघाले. जातांना ते म्हणाले, "राजा, मी तुझ्यावर अत्यंत संतुष्ट झालों आहें. आपल्या सामर्थ्याच्या दर्पानें उन्मत्त होऊन विष्णुभक्तांना, साधूंना त्रास दिल्यास त्याचें प्रायश्चित भोगावें लागतें याची तुझ्यामुळेंच मला जाणीव झाली.

परंतु राजेंद्रा ! मीं तुला शाप दिला. तूं माझ्यावर सूड घेतला नाहींस. माझ्यावर दया दाखविलीस. तूं प्रेमानें विष्णूला जिंकलेंस. इतकेंच नव्हे तर तुला शासन करण्यास सिद्ध झालेल्या मलासुद्धां प्रेमानें आपलेंसें केलेंस. राजा, खरोखरच तूं धन्य आहेस. तुझी धवलकीर्ति पृथ्वीतलावर सदैव गाजत राहील." इतकें बोलून दुर्वासऋषि आकाशमार्गानें निघून गेले.

★

# राजा शिबि

## नारदांचें आगमन

कोणाची तरी महालांत चाहूल ऐकूं आली. देवेंद्रानें चमकून वर पाहिलें. कांहीं कल्पनाही नसतांना देवर्षि नारद अचानकपणें तेथें आलेले पाहून आश्चर्यच वाटलें त्याला. तो चटकन् उठला. त्यानें नारदांचें स्वागत केलें. त्यांना अत्यंत आदरानें आसनावर बसविलें आणि त्यांची पूजा केली.

देवेंद्राच्या आश्चर्याचा भर अजूनही ओसरला नव्हता. नुकतेच तर नारद ऋषि मृत्युलोकीं गेले. त्यानंतर फारच थोडा काळ लोटला होता. त्याच्या नेहमींच्या अनुभवाप्रमाणें ते परत यावयाला अद्याप खूपच अवकाश होता. एवढ्या लवकर ते अगदीं क्वचितच परत येत. पण आज त्याच्या कल्पनेपेक्षां खूपच लवकर ते अमरावतीस परत आले होते.

शिवाय नारदमुनि यावयाचे म्हणजे त्यांच्या ब्रह्मवीणेचे मंजुळ स्वर प्रथम कानीं यावयाचे. हरिभजनानें कान पुनीत व्हावयाचे. जणूं त्यांच्या आगमनाची पूर्वसूचनाच ! पण आज त्यांच्या ब्रह्मवीणेचे मधुर ध्वनि त्याला ऐकूं आले नव्हते. हरिकीर्तन त्याच्या कानीं पडलें नव्हतें. अन् तरीसुद्धां नारदमुनि मात्र अचानकपणें येऊन समोर बसले होते. त्याच्या डोक्यांत विचारांचा एकच गोंधळ उडून गेला.

प्रार्थना केलीस. माझ्या अंगाची होणारी आग थांबविलीस. माझ्या प्राणाचें रक्षण केलेंस. अंबरीषा, खरोखरच तूं माझ्या-वर अनंत उपकार केले आहेस."

★

## राजा, तूं धन्य आहेस !

ऋषींची सुदर्शनचक्रापासून सुटका झाल्यावर राजानें त्यांची पूजा केली. त्यांच्या जेवणाची व्यवस्था करण्याची त्यानें आज्ञा दिली. दुर्वास प्रसन्न झाले. आणि जेव्हां त्यांना कळलें कीं, आपण गेल्यापासून राजा उपाशीच आहे तेव्हां त्यांचें हृदय भरून आलें. ते प्रेमानें म्हणाले, " राजा ! तूंही भोजन कर."

भोजन आटोपलें. दुर्वासऋषि परत निघाले. जातांना ते म्हणाले, " राजा, मी तुझ्यावर अत्यंत संतुष्ट झालों आहें. आपल्या सामर्थ्याच्या दर्पानें उन्मत्त होऊन विष्णु-भक्तांना, साधूंना त्रास दिल्यास त्याचें प्रायश्चित भोगावें लागतें याची तुझ्यामुळेंच मला जाणीव झाली.

परंतु राजेंद्रा ! मीं तुला शाप दिला. तूं माझ्यावर सूड घेतला नाहींस. माझ्यावर दया दाखविलीस. तूं प्रेमानें विष्णूला जिंकलेंस. इतकेंच नव्हे तर तुला शासन करण्यास सिद्ध झालेल्या मलासुद्धां प्रेमानें आपलेंसें केलेंस. राजा, खरोखरच तूं धन्य आहेस. तुझी धवलकीर्ति पृथ्वीतलावर सदैव गाजत राहील." इतकें बोलून दुर्वासऋषि आकाश-मार्गानें निघून गेले.

★

# रा जा शि बि

२८११४ ... २५७ ...

## नारदांचें आगमन

कोणाची तरी महालांत चाहूल ऐकूं आली. देवेंद्रानें चमकून वर पाहिलें. कांहीं कल्पनाही नसतांना देवर्षि नारद अचानक-पणें तेथें आलेले पाहून आश्चर्यच वाटलें त्याला. तो चटकन् उठला. त्यानें नारदांचें स्वागत केलें. त्यांना अत्यंत आदरानें आसनावर बसविलें आणि त्यांची पूजा केली.

देवेंद्राच्या आश्चर्याचा भर अजूनही ओसरला नव्हता. नुकतेच तर नारद ऋषि मृत्युलोकीं गेले. त्यानंतर फारच थोडा काळ लोटला होता. त्याच्या नेहमींच्या अनुभवाप्रमाणें ते परत यावयाला अद्याप खूपच अवकाश होता. एवढ्या लवकर ते अगदीं क्वचितच परत येत. पण आज त्याच्या कल्पनेपेक्षां खूपच लवकर ते अमरावतीस परत आले होते.

शिवाय नारदमुनि यावयाचे म्हणजे त्यांच्या ब्रह्मवीणेचे मंजुळ स्वर प्रथम कानीं यावयाचे. हरिभजनानें कान पुनीत व्हावयाचे. जणूं त्यांच्या आगमनाची पूर्वसूचनाच! पण आज त्यांच्या ब्रह्मवीणेचे मधुर ध्वनि त्याला ऐकूं आले नव्हते. हरिकीर्तन त्याच्या कानीं पडलें नव्हतें. अन् तरीसुद्धां नारदमुनि मात्र अचानकपणें येऊन समोर बसले होते. त्याच्या डोक्यांत विचारांचा एकच गोंधळ उडून गेला.

देवेंद्र आपल्या आसनावर जाऊन बसला. त्यानें नारदांकडे पाहिलें आणि तो त्यांच्याशीं कांहीं बोलणार तोंच नारद म्हणाले, "देवेंद्रा! पृथ्वीतलावर विष्णुकांति नांवाचें एक नगर



आहे. त्या नगरामध्यें उशीनराचा पुत्र शिबि राजा राज्य करीत आहे. त्या पुण्यश्लोक राजानें आतांपर्यंत नव्याण्णव यज्ञ पूर्ण केले आहेत. अन् आज शंभराव्या यज्ञाला आरंभ केला आहे त्यानें. यज्ञासाठीं विद्वान् ऋषि आले आहेत. ह्या यज्ञप्रसंगीं कोणीही कांहींही मागितलें तरी तें त्याला द्यावयाचें. कोणालाच विन्मुख पाठवावयाचें नाहीं, असा संकल्प सोडून त्यानें यज्ञदीक्षा घेतली आहे.

देवेंद्रा ! तुला माहीतच आहे कीं, हा त्याचा शंभरावा यज्ञ पुरा झाला म्हणजे शंभर यज्ञ केल्याच्या पुण्यबलानें शिबि राजा तेजस्वी होईल. अन् त्याच्या तेजापुढें तुझें तेज फिकें पडेल. आपल्या इंद्रपदाला तुला मुकावें लागेल. तेजस्वी व पुण्यवान् अशा शिबि राजाला इंद्रपदाचा मान दिला जाईल. तो इंद्रपदावर आरूढ होईल. देवेंद्रा ! ही बातमी तावडतोब तुझ्या कानावर घालण्यासाठींच मी मुद्दाम एवढ्या तांतडीनें तुझ्याकडे आलों आहें."

★

## नारदमुनि, तुम्हीच मार्ग काढा !

नारदांनीं सांगितलेला वृत्तांत ऐकून इंद्राच्या मुद्रेवर साठीं जाळें पसरलें. नारदांनीं सांगितलेली हकीकत खरी होती. त्यालाही माहीत होतें कीं, शिबि राजानें नव्याण्णव यज्ञ केले आहेत. पण शिबीचा शंभरावा यज्ञ पुरा झाला तर आपली काय अवस्था होईल याचा त्यानें कधीं विचारच केला नव्हता. पण आतां राजाचा शंभरावा यज्ञ सिद्धीस गेला तर आपला इंद्रपदाचा मान जाईल. आपणाला कोणीही 'देवेंद्र' म्हणणार नाहीं. या विचारानें तो व्याकुळ झाला. पण आतां दुःख वाटून काय उपयोग होता?

तो नारदांना म्हणाला, 'देवर्षे, खरोखर माझ्यावर हें एक मोठें संकट आलें आहे. माझ्या पुण्यबलावर इतके दिवस मीं ऐश्वर्य उपभोगिलें. पूर्वीं केलेल्या पुण्यानें इंद्रपदाची प्राप्ति

देवेंद्र आपल्या आसनावर जाऊन बसला. त्यानें नारदांकडे पाहिलें आणि तो त्यांच्याशीं कांहीं बोलणार तोंच नारद म्हणाले, "देवेंद्रा! पृथ्वीतलावर विष्णुकांति नांवाचें एक नगर



आहे. त्या नगरामध्यें उशीनराचा पुत्र शिबि राजा राज्य करीत आहे. त्या पुण्यश्लोक राजानें आतांपर्यंत नव्याण्णव यज्ञ पूर्ण केले आहेत. अन् आज शंभराव्या यज्ञाला आरंभ केला आहे त्यानें. यज्ञासाठीं विद्वान् ऋषि आले आहेत. ह्या यज्ञप्रसंगीं कोणीही कांहींही मागितलें तरी तें त्याला द्यावयाचें. कोणालाच विन्मुख पाठवावयाचें नाहीं, असा संकल्प सोडून त्यानें यज्ञदीक्षा घेतली आहे.

देवेंद्रा ! तुला माहीतच आहे कीं, हा त्याचा शंभरावा यज्ञ पुरा झाला म्हणजे शंभर यज्ञ केल्याच्या पुण्यबलानें शिबि राजा तेजस्वी होईल. अन् त्याच्या तेजापुढें तुझें तेज फिकें पडेल. आपल्या इंद्रपदाला तुला मुकावें लागेल. तेजस्वी व पुण्यवान् अशा शिबि राजाला इंद्रपदाचा मान दिला जाईल. तो इंद्रपदावर आरूढ होईल. देवेंद्रा ! ही बातमी तावडतोब तुझ्या कानावर घालण्यासाठींच मी मुद्दाम एवढ्या तांतडीनें तुझ्याकडे आलों आहें."

★

## नारदमुनि, तुम्हीच मार्ग काढा !

नारदांनीं सांगितलेला वृत्तांत ऐकून इंद्राच्या मुद्रेवर [illegible] साठीं जाळें पसरलें. नारदांनीं सांगितलेली हकीकत खरी होती. त्यालाही माहीत होतें कीं, शिबि राजानें नव्याण्णव यज्ञ केले आहेत. पण शिबीचा शंभरावा यज्ञ पुरा झाला तर आपली काय अवस्था होईल याचा त्यानें कधीं विचारच केला नव्हता. पण आतां राजाचा शंभरावा यज्ञ सिद्धीस गेला तर आपला इंद्रपदाचा मान जाईल. आपणाला कोणीही 'देवेंद्र' म्हणणार नाहीं. या विचारानें तो व्याकुळ झाला. पण आतां दुःख वाटून काय उपयोग होता ?

तो नारदांना म्हणाला, 'देवर्षे, खरोखर माझ्यावर हें एक मोठें संकट आलें आहे. माझ्या पुण्यबलावर इतके दिवस मीं ऐश्वर्य उपभोगिलें. पूर्वी केलेल्या पुण्यानें इंद्रपदाची प्राप्ति

झाली ; पण इंद्रपदावर असतांना अधिक पुण्य जोडावयाचा मीं कोणताच प्रयत्न केला नाहीं, साधुसंतांची सेवा केली नाहीं कीं ईश्वराची भक्ति केली नाहीं. मी अप्सरांच्या नाचांतच गुंगून राहिलों. छानछोकीची, सुखोपभोगांची हौसच काय ती भागवून घेतली. पण आतां या संकटकाळीं यांपैकीं माझ्या कांहींच उपयोगाला येणार नाहीं. मुनिश्रेष्ठ, मला कांहीं तरी उपाय सांगा. मी दीन झालों आहें."

"देवेंद्रा, निराश होऊं नकोस. शांतपणें विचार कर. अजूनही ह्या संकटांतून मार्ग निघेल. तूं संकटमुक्त होशील. संकटांचीं अभ्रें दूर होतील. आणि इंद्रपदावर राहशील तूं."

" नाहीं देवर्षे, मला कोणताच उपाय सुचत नाहीं. ह्या संकटामुळें माझी विचारशक्ति नष्ट झाली. मस्तक कसें बधिर झालें आहे. तुम्हीच मदत कराल तर बरें होईल. मला आशा आहे, नव्हे खात्रीच आहे कीं, तुम्ही कांहीं तरी मार्ग काढाल."

"देवेंद्रा ! प्रत्येक अपायाला उपाय असतोच. तुझें इंद्रपद टिकविण्यासाठींही मार्ग आहे. तूं शिवि राजाचें सत्त्व हरण कर. तरच तुझें इंद्रपद टिकेल. पण देवेंद्रा, हें काम सोपें नाहीं. विष्णुभक्त आहे तो राजा. सहजासहजीं सत्त्व सोडण्यास तयार होणार नाहीं तो. महान् प्रयास पडतील त्यासाठीं आणि इतकें करूनही यश मिळेलच असें नाहीं. पण आपला प्रयत्न करून पहा. कारण एवढा एकच काय तो उपाय दिसतो आहे मला."

इतकें बोलून नारद आसनावरून उठले. इंद्राजवळ गेले. अगदीं हळू आवाजांत त्यांनीं त्याला कांहीं तरी सांगितलें.

इंद्राची मुद्रा जराशी खुलली. देवर्षि नारदांनीं सांगितलेली युक्ति त्याला पसंत पडली.

देवेंद्राचा चिंताभार उतरलेला पाहून नारदांना समाधान वाटलें. त्यांनीं इंद्राचा निरोप घेतला व ते तेथून निघून गेले.

★

## शंभरावा यज्ञ

विष्णुकांति नगरामध्यें एकच गडबड उडाली होती. शिबि राजानें शंभराव्या यज्ञाला प्रारंभ केला होता. यज्ञाचें कार्य मोठ्या उत्साहानें चाललें होतें. प्रजेनेंही आपलें अपत्यवत् पालन करणाऱ्या राजाच्या या पवित्र यज्ञकर्माला आपल्याकडून हातभार लावला होता. राजानें भांडार उघडून सर्व द्रव्य या यज्ञासाठीं खर्च करण्याचें ठरविलें होतें. यज्ञासाठीं विस्तीर्ण यज्ञमंडप उभारला होता. निरनिराळ्या यज्ञसामग्रीचे पर्वतप्राय ढीग पडले होते. द्रव पदार्थांच्या जणूं नद्याच वहात होत्या.

या अपूर्व यज्ञासाठीं पराशर, मार्कण्डेय, वसिष्ठ वगैरे विद्वान् ऋषि ऋत्विज म्हणून आले होते.

शुभमुहूर्तावर यज्ञ सुरू झाला. यज्ञमंडप यज्ञाच्या पवित्र धुरानें भरून गेला. ऋत्विज मंत्र म्हणूं लागले. मंत्रघोषांनीं सर्व आकाश निनादून गेलें. सर्व वातावरण पवित्र झालें. स्वतः राजा यज्ञकुंडाजवळ बसून देवतांना आहुति देऊं लागला. राजानें आहुति दिली कीं देवता प्रत्यक्ष प्रकट होत. आहुतीचा स्वीकार करीत.

याप्रमाणें यज्ञकर्म सुरू होतें. इतक्यांत एक कपोत पक्षी त्या यज्ञमंडपांत शिरला. अगदीं घाबरून गेला होता तो. कावऱ्याबावऱ्या नजरेनें इकडे तिकडे पहात तो राजाच्या हातावर बसला अन् म्हणाला, “ राजन् ! माझ्या मागें एक भयंकर ससाणा लागला आहे. त्याच्यापासून माझें रक्षण व्हावें म्हणून मी तुझ्याकडे आलों आहें. आतां माझें जीवित सर्वस्वीं तुझ्याच हातांत आहे. ”

याप्रमाणें तो कपोत राजाची विनवणी करीत असतांना एक ससाणा यज्ञमंडपांत शिरला. मंडपांत शिरतांच त्यानें कपोतावर झडप घालण्याचा प्रयत्न केला. लोकांनीं कपोत पक्ष्याला वांचविण्यासाठीं एकच हाकाटी केली. कांहीं जणांनीं ससाण्याला मारण्याचा प्रयत्न केला.

ससाणा भ्याला. एका उंच सुरक्षित जागीं जाऊन बसला. आणि तो तेथून म्हणाला, “राजेंद्रा ! मी गेले तीन दिवस उपाशी आहें. गेल्या तीन दिवसांत मला कांहींही शिकार मिळाली नाहीं. मोठ्या कष्टानें हा कपोत मिळाला. पण तूं त्याला आश्रय दिलास. राजा, ही माझी शिकार आहे. मीं स्वपराक्रमानें मिळविली आहे. तूं ज्ञानी आहेस. तुला न्याय कळतो. म्हणून हा कपोत तूं माझ्या स्वाधीन कर. ”

ससाण्याचें हें बोलणें ऐकून बिचारा कपोत थरथरां कांपूं लागला. तो राजाला म्हणाला, “ राजा ! मी तुला शरण आलों आहें. शरणांगताला अभय देणें, त्याचें रक्षण करणें हें

तुझें कर्तव्यच आहे. शिवाय या यज्ञप्रसंगीं मी तुझ्याजवळ आश्रय मागत आहें. जीवदान मागत आहें. तूं जर मला या ससाण्याच्या हवालीं केलेंस तर स्वतः सोडलेला संकल्प मोडलास असें होईल. त्यामुळें तुझ्या सत्त्वाचा नाश होईल. इतकेंच नव्हे तर तुझा शंभरावा यज्ञही निष्फळ ठरेल."

तोंच ससाणा म्हणाला, "राजन्! मी तुला मघांशींच सांगितलें कीं, मी तीन दिवस उपाशी आहें. तूं या कपोताला आश्रय दिलास आणि माझे श्रम व्यर्थ झाले. तूं या यज्ञप्रसंगीं कोणालाही विन्मुख न पाठविण्याचा संकल्प सोडला आहेस. मी तुझ्याजवळ न्याय परंतु अगदीं क्षुल्लक मागणी करीत आहें. हा कपोत माझी शिकार आहे. माझें भक्ष्य आहे. तूं विलंब न लावतां हा कपोत मला परत दे. कारण याच्यावर माझाच अधिकार आहे.

"राजा, मी पुष्कळच बोललों. बोलतांना मला त्रास होत आहे. या कपोताचा पाठलाग करतांना मला खूप कष्ट झाले आहेत. भुकेनें माझा जीव व्याकुळ होत आहे. माझीं आंतडीं अन्नावांचून नुसतीं पिळवटून निघत आहेत. पोटांतून एकसारख्या कळा निघत आहेत. माझ्यानें त्या वेदना आतां सहन होत नाहींत. अयाई ग!" असें केविलवाण्या स्वरानें ओरडून तो ससाणा जमिनीवर पडला. त्याचे डोळे पांढरे झाले. पंख फडफडूं लागले. त्याला मूर्च्छा आली.

★

## राजा, मनुष्याचें मांस दे !

ससाण्याची ती अवस्था पाहून राजाला दुःख झालें. तो ससाण्याजवळ गेला. त्यानें त्याच्या अंगावरून हात फिरविला. आपल्या अंगावरील शेल्यानें तो ससाण्याला वारा घालूं लागला.

राजाच्या प्रयत्नांनीं थोड्या वेळानें ससाणा सावध झाला. त्यानें डोळे उघडून राजाकडे पाहिलें व हळू आवाजांत म्हणाला, “ राजा ! माझे प्राण भुकेनें व्याकुळ झाले आहेत. नुसता वारा घालून काय उपयोग ? मला जर तो कपोत पक्षी मिळाला नाहीं तर—” इतकें बोलून तो थांबला. बोलण्याच्या कष्टानें त्याला पुन्हां मूर्च्छा येऊं लागली. पुन्हां राजानें वारा घालून त्याला सावध केलें व म्हणाला, “ ससाण्या, तुला पाहिजे तेवढें ताजें मांस मी देतों. तें मांस तूं खा. तुझी भूक शांत कर. मग तुला बरें वाटेल. ”

“ राजा ! मी दुसऱ्या कोणींही कापलेलें, घाणेरडें किंवा शिळें मांस कधींही खात नाहीं. आतां तूं म्हणतोस म्हणून मी या कपोत पक्ष्याला खाणार नाहीं. पण त्याच्या वजनाइतकेंच उत्तम व सोज्वळ मनुष्याचें ताजें मांस मला दिलें पाहिजे. ”

ससाण्याची ही अनपेक्षित अन् चमत्कारिक मागणी ऐकून राजा विस्मयचकित झाला. काय करावें हें त्याला सुचेना.

इतक्यांत प्रधान म्हणाला, “ महाराज, देहांत शासनास पात्र असलेल्या एकाद्या कैद्याचें मांस या ससाण्याला द्यावें, असें मला वाटतें. ”

"राजा!" मध्येंच ससाणा म्हणाला, "ज्यानें महान् पातक केलें असेल त्यालाच देहान्ताची शिक्षा देतात. त्या मनुष्याचें मांसही अमंगळ असतें. तें अमंगळ व पापी मांस खाणाराची अधोगति होते. तेव्हां असलें मांस मला दिल्यानें तुला अधोगति प्राप्त होईल. परंतु आतां माझ्यानें फार वेळ हे कष्ट सहन होत नाहींत. माझ्या आहाराची त्वरित व्यवस्था कर."

राजानें खूप वेळ विचार केला. नंतर त्याला एक युक्ति सुचली. समाधानाच्या आनंदानें त्याचे डोळे फुलले. मोठ्या उत्साहानें तो ससाण्याला म्हणाला, "तुला मी माझ्याच शरिरांतील मांस कापून देतों. माझ्या समजुतीप्रमाणें माझें मांस अपवित्र नाहीं. तूं तें मांस सुखानें खा व संतुष्ट हो."

राजाच्या बोलण्याला ससाण्यानें संमति दर्शविली. परंतु राजमंडपांतील सर्व लोकांना ससाण्याची चीड आली. ह्या आगंतुक प्राण्याबद्दल त्यांना पराकाष्ठेचा राग आला. ते म्हणाले, "क्षुद्र पक्ष्यासाठीं राजानें आपल्या अंगावरील मांस काढून द्यावयाचें. स्वतःच्या जिवाला निष्कारण त्रास करून घ्यावयाचा. जीव धोक्यांत घालावयाचा. कांहींच आवश्यकता नाहीं हें सर्व करण्याची. या कपोताला ससाण्याच्या हवालीं करा, नाहीं तर ह्या ससाण्यालाच हाकलून द्या म्हणजे झालें."

राजानें सर्वांना शांत केलें. तो म्हणाला, "लोकहो! शांत व्हा. अविचारानें असें कृत्य करूं नका. पक्षी असो वा अन्य कोणीही क्षुद्र कीटक असो, माझ्या संकल्पाप्रमाणें त्याची इच्छा

पूर्ण करणें मी माझें कर्तव्य समजतों. शिवाय या यज्ञप्रसंगीं जरी माझा प्राणनाश झाला तरी तें पुण्यकारकच आहे. भगवान् सदैव आपलें कल्याणच करतील."

★

## विलक्षण पक्षी

राजानें आपल्या धर्मसेन नांवाच्या पुत्राकडून तेथें एक तराजू आणविला. राजाच्या आज्ञेप्रमाणें तराजू बांधण्यांत आला. तराजूच्या समोर एक आसन मांडून राजा त्या आसनावर बसला. त्यानें एक तरवार जवळ घेतली.



याप्रमाणें सर्व तयारी झाल्यावर राजानें एका पारड्यांत कपोत पक्ष्याला बसविलें आणि स्वतःच्या मांडींतील मांस

तरवारीनें कापून तो दुसऱ्या पारड्यांत टाकूं लागला. त्याला वाटत होतें कीं, चिमुकला कपोत पक्षी कितीसा जड असणार? आपल्या मांडीवरील मांसाचें वजन सहजच त्याच्या दुप्पट भरेल. तो आपल्या मांडीचें मांस तोडून टाकूं लागला. मांडीवरील सर्व मांस संपलें. पण काय आश्चर्य! कपोत पक्ष्याचें पारडें किंचितही वर उचललें गेलें नाहीं. राजाला आश्चर्य वाटलें.

त्यानें दुसऱ्या मांडींतील मांस कापून त्या पारड्यांत घातलें. परंतु त्याचाही कांहीं उपयोग झाला नाहीं. तेव्हां क्रमाक्रमानें दंड, हात वगैरे आपल्या अवयवांतील मांस कापून त्यानें त्या पारड्यांत घातलें. पण सर्व शरीरावरील मांस टाकूनही कपोत पक्ष्याचें पारडें खालींच होतें. तें वर उचललें गेलें नाहीं.

राजाच्या अंगांतून रक्ताच्या धारा वाहूं लागल्या. शरिरांतील मांस कापून घेतल्यामुळें त्याचें सुंदर शरीर विद्रुप दिसूं लागलें. तें भीषण व दुःखजनक दृश्य पाहून सगळ्यांनीं आपले डोळे मिटून घेतले.

राजाची शक्ति क्षीण होत होती. मांसाचे लचके तोडून टाकतांना त्याला अतिशय वेदना होत होत्या. पण त्यानें त्या सर्व वेदना मोठ्या धीरानें सहन केल्या. त्याच्या डोळ्यांतून एकही अश्रुबिंदु गळला नाहीं वा तोंडावरील हास्यही लोपलें नाहीं. कर्तव्यपूर्तीचा अननुभूत आनंद तो भोगीत होता.

परंतु राजाची ती अवस्था पाहून तेथें जमलेले लोक ससाण्यावर मनस्वी चिडले. त्यांच्या सहनशीलतेचा अंतच

पूर्ण करणें मी माझें कर्तव्य समजतों. शिवाय या यज्ञप्रसंगीं जरी माझा प्राणनाश झाला तरी तें पुण्यकारकच आहे. भगवान् सदैव आपलें कल्याणच करतील."

★

## विलक्षण पक्षी

राजानें आपल्या धर्मसेन नांवाच्या पुत्राकडून तेथें एक तराजू आणविला. राजाच्या आज्ञेप्रमाणें तराजू बांधण्यांत आला. तराजूच्या समोर एक आसन मांडून राजा त्या आसनावर बसला. त्यानें एक तरवार जवळ घेतली.



याप्रमाणें सर्व तयारी झाल्यावर राजानें एका पारड्यांत कपोत पक्ष्याला बसविलें आणि स्वतःच्या मांडींतील मांस

तरवारीनें कापून तो दुसऱ्या पारड्यांत टाकूं लागला. त्याला वाटत होतें कीं, चिमुकला कपोत पक्षी कितीसा जड असणार? आपल्या मांडीवरील मांसाचें वजन सहजच त्याच्या दुप्पट भरेल. तो आपल्या मांडीचें मांस तोडून टाकूं लागला. मांडीवरील सर्व मांस संपलें. पण काय आश्चर्य! कपोत पक्ष्याचें पारडें किंचितही वर उचललें गेलें नाहीं. राजाला आश्चर्य वाटलें.

त्यानें दुसऱ्या मांडींतील मांस कापून त्या पारड्यांत घातलें. परंतु त्याचाही कांहीं उपयोग झाला नाहीं. तेव्हां क्रमाक्रमानें दंड, हात वगैरे आपल्या अवयवांतील मांस कापून त्यानें त्या पारड्यांत घातलें. पण सर्व शरीरावरील मांस टाकूनही कपोत पक्ष्याचें पारडें खालींच होतें. तें वर उचललें गेलें नाहीं.

राजाच्या अंगांतून रक्ताच्या धारा वाहूं लागल्या. शरिरांतील मांस कापून घेतल्यामुळें त्याचें सुंदर शरीर विद्रुप दिसूं लागलें. तें भीषण व दुःखजनक दृश्य पाहून सगळ्यांनीं आपले डोळे मिटून घेतले.

राजाची शक्ति क्षीण होत होती. मांसाचे लचके तोडून टाकतांना त्याला अतिशय वेदना होत होत्या. पण त्यानें त्या सर्व वेदना मोठ्या धीरानें सहन केल्या. त्याच्या डोळ्यांतून एकही अश्रुबिंदु गळला नाहीं वा तोंडावरील हास्यही लोपलें नाहीं. कर्तव्यपूर्तीचा अननुभूत आनंद तो भोगीत होता.

परंतु राजाची ती अवस्था पाहून तेथें जमलेले लोक ससाण्यावर मनस्वी चिडले. त्यांच्या सहनशीलतेचा अंतच

झाला. राजाच्या प्राणनाशाची वेळ आली तरी कपोत पक्ष्याचें पारडें वर गेलें नव्हतें आणि तो लोभी ससाणा राजाच्या मांसाकडे आसुसलेल्या नजरेनें पहात होता. त्यांना हें सहन होईना. कांहीं जण तर ससाण्याला मारण्यासाठीं धांवून गेले. राणी सत्यवती तेथेंच होती. तिनें त्यांना अडविलें. त्यांची समजूत काढली.

नंतर ती राजाला म्हणाली, "महाराज! आपण आपल्या शरिरांतील बहुतेक सर्व मांस दिलें आहे. आतां आपण आणखी मांस देऊं नये. आपला प्राणनाश होईल. मी माझ्या शरिरांतील मांस घालून या ससाण्याला संतुष्ट करतें."

तोंच धर्मसेन पुढें होऊन म्हणाला, "बाबा! तुम्ही अधिक त्रास घेऊं नका. मी माझ्या शरिरांतील मांस देतों. तुम्ही व आई कुशल रहा. त्यांतच मला आनंद वाटेल. तुम्ही ससाण्याला दिलेल्या वचनाची पूर्ति करणें हाच धर्म आहे. सत्त्वरक्षणासाठीं कितीही वेदना झाल्या तरी मला त्यापासून किंचित्‌देखील दुःख होणार नाहीं."

★

## येतों मी आतां

आपल्या पत्नीचें व प्रिय पुत्राचें आपल्यावरील प्रेम पाहू: राजाला आनंद वाटला. त्याच्या मनांत दुसराही ए विचार आला. आपल्या प्रिय पत्नीनें किंवा लाडक्या पुत्रा

आपल्या शरिरांतील मांस खरोखरच दिलें तर त्यांना किती वरें वेदना होतील ? या विचारानें त्याचें हृदय कासावीस झालें. त्याच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले. आनंदाच्या भावना कुठल्या कुठें पार विरघळून गेल्या.

त्यानें संयम केला. विकारावर ताबा मिळविला. तो कांहीं तरी बोलणार इतक्यांत ससाणा म्हणाला, "राजा ! मी स्त्रियांचें मांस कधींच खात नाहीं. अर्थात् तुझ्या राणीचें मांस मला चालणार नाहीं. त्याचप्रमाणें धर्मसेनाचा व्रतबंध झाला नसल्यामुळें त्याचेंही मांस मी खाणार नाहीं.

"राजा, स्त्री काय किंवा पुत्र काय, दोन्ही तुला परकींच. त्यांना त्रास देऊन मला संतुष्ट करणें हा खऱ्या दात्याचा धर्म नव्हे किंवा यानें तुझें सत्त्वरक्षणही होणार नाहीं. आतां सत्त्व-रक्षण करावयाचें असेल तर स्वतःचेंच शिर टाकून कपोताचें पारडें वर नेण्याचा प्रयत्न कर."

"ससाण्या मी तुझा आभारी आहें. तूं मला माझ्या कर्तव्याची जाणीव करून दिलीस. तुझे अनंत उपकार आहेत माझ्यावर. आतां माझ्या शरिरावर असलेलें सर्व मांस व मस्तक मी पारड्यांत टाकतों. त्या मस्तकानें कपोत पक्ष्याचें वजन झालें तर ठीकच. पण तसें झालें नाहीं तर मात्र मला माझ्या ऋणांतून मुक्त कर."

नंतर प्रधानाकडे वळून राजा म्हणाला, "प्रधानजी, सत्त्वरक्षणासाठींच मी प्राणत्याग करीत आहें. वाईट वाटून घेऊं नका. माझ्या पश्चात् धर्मसेनाला गादीवर बसवा. तो लहान

आहे. त्याला योग्य शिक्षण द्या. चुकून माझ्या नकळत माझ्याकडून जर कुणाला त्रास झाला असेल तर मला क्षमा करा."

प्रधानाचा कंठ दाटून आला. त्याच्यानें कांहीं बोलवेना. त्यानें फक्त मानेनेंच संमति दिली.

नंतर राणी सत्यवती व धर्मसेन यांच्याकडे तो वळला. त्यांचा शेवटचा निरोप घेतांना त्याचे डोळे भरून आले. अश्रुपूर्ण नेत्रांनीं त्यानें त्या दोघांकडे पाहिलें. त्याच्या करुण अश्रूंत कोट्यवधि शब्दांचें सार सांठवलें होतें. धर्मसेनाला त्यानें जवळ घेतलें. त्याच्या तोंडावरून हात फिरविला व तो म्हणाला, "बाळ, येतों मी आतां. रडूं नकोस. मला ह्या पवित्र यज्ञप्रसंगीं मरण येत आहे. स्वतःचा संकल्प पुरा करण्यासाठीं माझी आहुति पडत आहे. आनंदच आहे त्यांत.

"माझ्या पश्चात् प्रजेचें सदैव कल्याण कर. कोणाला दुखवूं नकोस. सर्वांना आनंदी ठेव. त्यांचे आशीर्वाद घे. गोरगरिबांनीं दिलेला दुवा तुझें कल्याणच करील. माझी तुला जेव्हां आठवण होईल तेव्हां ही तुझी आई आहे. तिच्याकडे पहा. ती तुला कांहींही कमी पडूं देणार नाहीं."

★

## पारडीं समतोल झालीं

याप्रमाणें सर्वांचा निरोप घेतल्यावर राजानें फिरून तरवार हातांत घेतली. तो आसनावर नीट बसला. अंगावरील सर्व

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. २७९२ नों दि ..........
वि. ........ पा.बा. ........
IRBK-0102792
IRBK-0102792